CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६१ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जीवनात आपल्यासमोर जेव्हा एखादे ध्येय असते तेव्हा आपल्या स्वातंत्र्यावर बंधने येतात आणि ही बंधने आणणारे असते आपले ध्येय. जी गोष्ट आपल्या ध्येयप्राप्तीमध्ये अडथळा ठरते, ती टाळली पाहिजे. ती गोष्ट निषिद्ध ठरते आणि जीवनात काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे असा खेळ सुरू होतो. ध्येय आपल्या संपूर्ण जीवनाचा नियन्ता बनतो आणि यालाच अनुशासित जीवन म्हणतात.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# राज्यपाल-राष्ट्रपतींसाठी ‘कालमर्यादा’ शक्य नाही



### घटनापीठाचा एकमताने निर्णय
### विधेयक रोखण्याचा राज्यपालांना अनिर्बंध अधिकार नाही

◆ **नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

राज्यांच्या विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांच्या मंजुरीसाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेचे कोणतेही बंधन लादणे शक्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. घटनेने कलम २०० अन्वये दिलेल्या अधिकारांच्या पलीकडे जाऊन राज्यपालांना विधेयक रोखून धरता येणार नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने एकमताने दिलेल्या निर्णयात म्हटले आहे.

राज्य विधानसभांनी पारित केलेली विधेयके रोखून धरण्याचा अनिर्बंध अधिकार राज्यपालांना आहे, असे आम्हाला वाटत नसल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई प्रमुख तसेच न्या. सूर्य कांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. ए. एस. चांदुरकर यांचा समावेश असलेल्या घटनापीठाने म्हटले.

भारतासारख्या लोकशाही देशात राज्यपालांसाठी वेळापत्रक निश्चित करणे हे संविधानाने प्रदान केलेल्या लवचीकतेच्या विरोधात आहे. कलम २०० अंतर्गत राज्यपालांकडे तीन पर्याय आहेत. पहिला विधेयकांना मान्यता देणे आणि ते राष्ट्रपतींकडे पाठवणे किंवा मंजुरी रोखून ठेवणे आणि त्यांच्या टिप्पण्यांसह विधानसभेत पाठवणे, असे निकालाचा महत्त्वपूर्ण भाग वाचून दाखवताना सरन्यायाधीशांनी सांगितले.

संवैधानिकरीत्या निर्धारित वेळेच्या मर्यादा आणि राज्यपालांच्या अधिकारांच्या वापराची पद्धत अस्तित्वात नसताना कलम २०० अंतर्गत अधिकारांच्या वापरासाठी कालमर्यादा न्यायालयाने निश्चित करणे योग्य ठरणार नाही, असे घटनापीठाने म्हटले. (वृत्तसंस्था)

### द्रौपदी मुर्मू यांनी उपस्थित केले होते १४ प्रश्न

या मुद्यावर तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर या वर्षी एप्रिलमध्ये न्या. जे. बी. पार्डीवाला प्रमुख असलेल्या न्यायासनाने निर्णय देत, राज्य विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांना मान्यता देण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींसाठी तीन महिन्यांचा कालावधी निश्चित केला होता. या निर्णयावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १४ महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. त्यावर पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने सुनावणीस सहमती दर्शवली होती.

### राष्ट्रपतींनी वापरला कलम १४३ (१) चा अधिकार

सद्यस्थितीत कायद्याचा प्रश्न उद्‌भवल्याचे दिसत आहे. हे दोन्ही मुद्दे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे मत घेणे योग्य राहील, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी क्वचितच वापरल्या जाणाऱ्या कलम १४३(१) अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करता म्हटले. कलम १४३ (१) सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेण्याच्या राष्ट्रपतींच्या अधिकाराशी संबंधित आहे.

# नितीशकुमारांनी दहाव्यांदा घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ

### पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री यांची सोहळ्याला उपस्थिती



पाटणा येथील गांधी मैदानावर शपथविधी सोहळ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गमछा फिरवून नागरिकांना अभिवादन केले. यावेळी त्यांच्या सोबत उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, राज्यपाल आरिफ मोहम्मद, मुख्यमंत्री नितीशकुमार, उपमुख्यमंत्री विजयकुमार सिन्हा

◆ **पाटणा, २० नोव्हेंबर**

सर्वाधिक काळ बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवलेले नितीशकुमार यांनी येथे गुरुवारी आयोजित भव्य समारंभात विक्रमी दहाव्या कार्यकाळासाठी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि रालोआ शासित अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि आघाडीचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.

गांधी मैदानावर नितीशकुमार यांना शपथ देण्यात आली. येथे शपथविधी सोहळ्यासाठी एक भव्य तात्पुरता व्यासपीठ उभारण्यात आला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा शपथविधी सोहळ्यासाठी बुधवारी रात्री पाटण्याला आले होते.

बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर नितीशकुमार यांचे अभिनंदन. ते एक अनुभवी प्रशासक आहे. त्यांचा अनेक वर्षांपासून सुशासनाचा सिद्ध इतिहास आहे. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी माझ्या शुभेच्छा, अशी प्रतिक्रिया नरेंद्र मोदी यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये व्यक्त केली. रालोआ सरकारच्या शपथविधीसाठी परत येईल, असे नरेंद्र मोदी यांनी प्रचारादरम्यान मतदारांना सांगितले होते. त्यावेळी त्यांनी गमछा फिरवला. लोकांनी त्यांच्या या कृतीला प्रचंड प्रतिसाद दिला होता.

नितीशकुमार यांच्यासोबत २६ मंत्र्यांनीही शपथ घेतली. यात १४ भाजपा, आठ जदयू, लोजपाचे (आरव्ही) दोन, हम आणि आरएलएमच्या प्रत्येकी एका आमदाराचा समावेश आहे. मागील सरकारमधील उपमुख्यमंत्रिद्वय उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजयकुमार सिन्हा यांचा समावेश होता. त्यांना निवडणुकीनंतर अनुक्रमे भाजपाचे विधिमंडळ पक्षनेते आणि उपनेते म्हणून निवडण्यात आले.

८९ आमदारांसह बिहार विधानसभेत भाजपा सर्वाधिक मोठा पक्ष ठरला आहे. मंत्रिमंडळात या पक्षाचा सिंहाचा वाटा ठरला ठरला आहे. (वृत्तसंस्था)

### सर्वाधिक काळ सेवा देणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या यादीत नितीशकुमार


(पान ३ वर)

### इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**तेदेपाचे प्रमुख आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह रालोआ शासित अनेक राज्यांचे नेते या सोहळ्यासाठी विमानाने आले होते.**

## महत्त्वाचे

### शेअर बाजार विक्रमी पातळीवर



**मुंबई :** भारतीय शेअर बाजार गुरुवारी वाढीसह बंद झाले. निर्देशांक आणि निफ्टीमध्ये मोठी वाढ होत सप्टेंबर २०२४ मध्ये नोंदवलल्या त्यांच्या विक्रमी पातळीच्या जवळ पोहोचले आहेत. निर्देशांक दिवसअखेर ४४६ अंकांनी वाढून ८५,६३२ वर बंद झाला तर निफ्टीने ५२ आठवड्याचा उच्चांक नोंदवत २६,२४७ चा टप्पा गाठला. त्यात शेवटी १३९ अंकांची वाढ झाली. निर्देशांकातील बजाज फायनान्स, बजाज निफसर्व्ह आणि रिलायन्स हे सर्वाधिक फायद्यातील शेअर्स होते. याउलट, एशियन पेण्ट्स, टायटन आणि एचसीएल यांना सर्वाधिक तोटा सहन करावा लागला.

### ‘काश्मीर टाईम्स’च्या कार्यालयावर छापेमारी

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी आणि देशविरोधी कारवायांवर सातत्याने प्रहार करणाऱ्या सुरक्षा यंत्रणांनी गुरुवारी एक मोठी कारवाई केली. जम्मू-काश्मीर पोलिस आणि स्टेट इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने येथील इंग्रजी वृत्तपत्र काश्मीर टाईम्सच्या कार्यालयावर छापा टाकला. देशविरोधी कारवायांना प्रोत्साहन देणे, देशाविरुद्ध द्वेष पसरवणे आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण करण्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही छापेमारी न्यायालयाच्या वॉरंटनंतर केली. तपासादरम्यान, अधिकाऱ्यांनी कार्यालयाच्या परिसराची आणि संगणकांची कसून तपासणी केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, झडतीमध्ये सुरक्षा दलांना एके-४७ रायफलच्या काही गोळ्या, पिस्तूलचे राऊंड आणि ग्रेनेडचा एक लिव्हर जप्त करण्यात आला आहे. वृत्तपत्रावर देशाच्या हितांविरुद्धच्या कृत्यांचे महिमामंडन केल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी एसआयएने एफआयआर दाखल केली असून, काश्मीर टाईम्सच्या संपादकाचे नावही त्यात समाविष्ट आहे. दिल्लीतील स्फोटाच्या घटनेनंतर जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादविरोधी कारवायांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, त्यातीलच ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.

### ताम्हिणी घाटात ५०० फूट खोल दरीत कोसळली थार

**पुणे :** पुण्याहून पर्यटनासाठी कोकणात निघालेल्या तरुणांच्या एका ग्रुपवर काळाने घाला घातल्याची अत्यंत दुर्दैवी घटना रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटात उघडकीस आली आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ’थार’ कार ५०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले असून, कारमधील अन्य दोन बेपत्ता व्यक्तींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील काही तरुण मंगळवारी रात्री कोकणात फिरायला निघाले होते. मात्र, रात्रीच्या सुमारास ताम्हिणी घाटातील अवघड वळणावर हा अपघात झाला. मंगळवारपासून हे तरुण संपर्कात नसल्याने त्यांच्या नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. मोबाईल लोकेशन तपासले असता, ते रायगड आणि पुणे जिल्ह्याला जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात असल्याचे निदर्शनास आले.

# साखळी बॉम्बस्फोटाशी होता अल-फलाहचा संबंध

### जयपूर, अहमदाबादमध्ये घडविले स्फोट




◆ **नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

राजधानी दिल्लीतील कार बॉम्बस्फोटाचा कट व्हाईट कॉलर्ड दहशतवादी मॉड्युलने अल-फलाह विद्यापीठातूनच रचला होता. यापूर्वीदेखील अल-फलाह विद्यापीठातील बी.टेक.च्या एक विद्यार्थी २००८मध्ये गुजरात आणि राजस्थानमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात सहभागी होता आणि त्याचा संबंध इंडियन मुजाहिद्दीन या संघटनेशी असल्याचे तपास यंत्रणाच्या चौकशीत उघड झाले होते. विशेष असे की तत्कालीन काँग्रेस सरकारने त्यावेळी या विद्यापीठावर कोणतीही कारवाई केलेली नव्हती.



मिर्झा बेग

दहशतवादी कारवायांमध्ये अडकलेला डॉ. नबी हा विद्यापीठाशी संबंधित पहिला व्यक्ती नाही, तर २००८ मध्ये राजस्थानची राजधानी जयपूर आणि गुजरातच्या राजधानीत साखळी स्फोटांमध्येही विद्यापीठाची संशयित भूमिका समोर आली आहे. अल-फलाहचा माजी विद्यार्थी मिर्झा शादाब बेग हा इंडियन मुजाहिदीनचा सदस्य होता आणि त्याचा साखळी स्फोट प्रकरणात समावेश होता.

बेगने २००७ मध्ये फरिदाबाद येथील अल-फलाह अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्स्ट्रुमेंटेशनमध्ये बी. टेक. केले. त्यानंतर एका वर्षानंतर, तो २००८ च्या अहमदाबाद साखळी स्फोटांमध्ये सहभागी असल्याचे आढळून आले. बेग अनेक वर्षांपासून फरार आहे आणि सध्या तो अफगाणिस्तानात लपून बसला असल्याचे मानले जाते. (वृत्तसंस्था)

### दहशतवादी डॉ. उमरच्या ७० चित्रफिती उघड

दिल्ली स्फोटापूर्वी तरुणांना भडकवण्यासाठी दहशतवादी डॉ. उमरने ७० चित्रफिती बनवल्या होत्या. यापैकी १२ त्याने मोबाईलवरून बनवल्या. आत्मघाती हल्ला घडवून आणण्यापूर्वी काही दिवस तो नूहमध्ये एका भाड्याच्या घरात राहत होता आणि तेथेच त्याने चित्रफिती बनविल्या होत्या, असे तपासात समोर आले.

### दहशतवाद्यांना पुरवले साहित्य

२००८ च्या जयपूर स्फोट आणि २००७ च्या गोरखपूर साखळी स्फोटांमध्येही बेगचे नाव समोर आले. जयपूर हल्ल्यापूर्वी, तो स्फोटके खरेदी करण्यासाठी उडुपीला गेला होता. बेगने आयईडी तयार करण्यासाठी रियाझ आणि यासिन भटकळ यांना डेटोनेटर आणि बॉल बेअरिंग पुरवले होते. अहमदाबाद बॉम्बस्फोटाच्या १५ दिवस आधी त्याने शहराची रेकी केली होती आणि त्याच्या दहशतवादी साथीदारांसह रसद, आयईडी फिटिंग आणि स्फोट नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली होती. गोरखपूर पोलिसांनी त्याची मालमत्ता जप्त केली. २००८ मध्ये इंडियन मुजाहिदीन नेटवर्क उघडकीस आल्यापासून तो फरार आहे. त्याच्या शिरावर १ लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर करण्यात आले आहे.



### एचडीएफसी बँक देशातील सर्वांत महागडा ब्रॅण्ड

**नवी दिल्ली :** भारतातील सर्वांत मौल्यवान ब्रॅण्डच्या क्रमवारीत मोठा बदल झाला आहे. कँटर ब्रॅण्डझेडच्या २०२५ च्या ताज्या अहवालानुसार, देशातील आघाडीची आयटी कंपनी टीसीएसला मागे टाकत एचडीएफसी बँक पुन्हा देशातील सर्वांत महागडा ब्रॅण्ड ठरला आहे. २०२२ मध्ये टीसीएसने एचडीएफसीला मागे टाकले होते. पण, विलीनीकरणानंतर बँकेने पुन्हा पहिले स्थान पटकावले आहे. एफचडीएफसी बँकेची सध्याची ब्रॅण्ड व्हॅल्यू ४४.९ अब्ज डॉलर्स म्हणजे ३७ लाख कोटी रुपये झाली.

# १०० उठाबशा काढल्यामुळे मुलीचा झाला मृत्यू

### शिक्षा देणाऱ्या शिक्षिकेला अटक

**पालघर, दि. २० नोव्हेंबर -**

पालघर जिल्ह्यात, सहावी इयत्तेत शिकणाऱ्या काजलच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांनी गुरुवारी महिला शिक्षिका ममता यादव हिला अटक केली. तिच्यावर मुलीला १०० उठाबशा काढायला लावल्याचा आरोप होता. तिच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वालीव पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही घटना ८ नोव्हेंबर रोजी घडली, शिक्षिकेने मुलीला १० मिनिटे उशिरा आल्याबद्दल १०० उठाबशा काढाण्याची शिक्षा दिली. यामुळे तिची तब्येत बिघडली आणि पाच दिवसांनी १३ नोव्हेंबर रोजी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर, बीईओने चौकशीचे आदेश दिले. शिक्षिका ममता हिला सातीवली येथील खाजगी शाळेतून आधीच काढून टाकण्यात आले होते. मुलीच्या मृत्यूनंतर, स्थानिक रहिवासी आणि मनसे कार्यकर्त्यांनी निषेध केला, ज्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. काजलची आई शीला यांनी सांगितले की, शाळेत उशिरा आल्यामुळे इतर मुलांसह तिच्या मुलीलाही पाठीवर स्कूलबॅग घेऊन १०० उठाबशा काढायला लावल्या. काहींनी ५० ते १०० उठाबशा काढल्या. मुलीने घरी आल्यानंतर पाठदुखीची तक्रार केली आणि तिची प्रकृती आणखी बिकट झाली. तिला प्रथम आस्था रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी सांगितले की, तिची पाठ दुखतेय, परंतु कोणताही आजार नाही. परंतु, तिला तीव्र वेदना होत होत्या.

# सराफ व्यापाऱ्यांच्या दुकानातील दुसऱ्या दिवशीही तपासणी सुरुच

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर -**




शहरातील आपटे व नारायणपेठकर सोन्याच्या दुकानामध्ये आयकर विभागाची दुसऱ्या दिवशीही तपासणी मोहीम सुरु होती. दुकाने बंद करून पथकाचे कागदपत्रे तपासण्याचे काम सुरु होते. बुधवारी ही रात्री उशिरापर्यंत तपासणीचे काम झाल्यानंतर पथक दुकानात मुक्कामी होते.

रात्री उशिरा महिला पोलिस अंमलदार वगळता पुरुष अंमलदार ही त्या दुकानामध्ये कर्तव्यावर हजर होते. शहरातील बांधकाम व्यवसायिक, वकिल, सराफाची दुकाने व त्याच्या राहत्या घरी अचानक आयकर विभागाचा छापा पडल्यामुळे दिवसभर चर्चा विषय होता. मधला मारुती, जुने विठ्ठल मंदिर व सात रस्ता, सम्राट चौक, गांधी नगर चौक, येथील घरीही दिवसभर शुकशुकाट होता. गुरुवारी दिवसभर ही आयकर विभागाकडून तपासणीचे काम सुरु होते. गुरुवारी दिवसभर आपटे ज्वेलर्स दुकानातील सुरक्षा रक्षक दुकानाच्या बाहेरील बाजूस बसलेले दिसत होते. दुकानाच्या पोर्चमध्ये पोलिस अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात होते. आतमध्ये पथकाचे अधिकारी व कर्मचारी तपासणीचे काम सुरु होते. उत्तर कसबा येथील नारायण पेठकर यांच्या जुन्या घरी तपासणी सुरु होती. मात्र आयकर विभागाकडून कोणत्या गोष्टींचा तपास करत आहेत, याबाबत अद्याप कोणतीही माहिती अधिकाऱ्यांकडून मिळालेली नाही.

## कुनोतील आनंदवार्ता

# मूळ भारतीय ‘मुखी’च्या पोटी पाच शावकांचा जन्म

◆ **भोपाळ, २० नोव्हेंबर**

मूळ भारतीय असणारी मादी चित्ता मुखी हिने पाच शावकांना जन्म दिल्याने कुनो राष्ट्रीय उद्यान नव्या सदस्यांच्या आगमनाच्या आनंदाने न्हाऊन निघाले. विशेष म्हणजे, मुखी ही भारतातच जन्माला आलेली असल्याने तिच्या पोटी जन्मलेल्या शावकांचे आगमन अधिक उल्लेखनीय ठरले आहे.

केंद्रीय वनमंत्री भूपेंद्रसिंह आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी कुनोतील चमूचे यासाठी अभिनंदन केले असून भारतीय वन्यजीव इतिहासात हा मैलाचा दगड ठरला आहे, असे म्हटले आहे. कुनो व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार, शावक आणि माता पूर्णपणे स्वस्थ आहेत.

माता मुखीची आतापर्यंतची वाटचाल फारच संघर्षाची राहिली आहे. जवळपास ३३ महिन्यांपूर्वी कुनोमध्ये जेव्हा दक्षिण आफ्रिकेतून चित्ता आणण्यात आला तेव्हा त्यांच्या पोटी तीन शावकांनी जन्म घेतला. त्यापैकी दोन शावक येथील नैसर्गिक वातावरणात तग धरू शकले नाहीत. त्यातील फक्त एकटी मुखी बचावली होती. तिची प्रकृती अतिशय नाजूक होती आणि ती कितपत जिवंत राहू शकेल, याची शाश्वती नव्हती.

कुनोतील वन कर्मचाऱ्यांनी दिवसरात्र तिची काळजी घेतली. मात्र, तरीही एका मर्यादेनंतर सारे काही निसर्गावरच अवलंबून होते. हळुहळू मुखीची प्रकृती स्थिर व्हायला लागली आणि ती संपूर्ण बळ एकवटून उभी राहिली. नुसती उभी राहिली नाही तर तिच्या ठायी चित्त्यांच्या अंगी असणारे चपळतेचे सर्व गुण दिसायला लागले. तिने शिकार करणे सुरू केले आणि संपूर्ण परिसरात आपली ओळख प्रस्थापित केली. याचाच अर्थ तिने येथील वातावरणासोबत पूर्णपणे जुळवून घेतले होते.



विशेष म्हणजे, ती पूर्णतः भारतीय परिस्थितीतच जन्मली आणि वाढली असल्याने अन्य चित्त्यांच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक मजबूत बनली. तज्ज्ञांच्या मते, स्थानिक वातावरणात अनुकूल राहून यशस्वीपणे प्रजननक्षम बनलेली मुखी पहिली मूळ भारतीय मादी चित्त ठरली आहे. (वृत्तसंस्था)

### ‘प्रोजेक्ट चित्ता’साठी अभूतपूर्व क्षण

**मुखीच्या पोटी पाच शावकांचा जन्म होणे हा कुनोतील ‘प्रोजेक्ट चित्ता’साठी अभूतपूर्व क्षण ठरला आहे. कारण याद्वारे कुनोतील आवास, भोजन, पर्यावरण आणि सुरक्षा व्यवस्था चित्त्यांसाठी अनुकूल ठरल्याची पावती मिळाली आहे. तज्ज्ञांच्या भाषेत सांगायचे तर नैसर्गिक प्रजनन हे कोणत्याही पुनर्वसन योजनेतील सर्वात कठीण आव्हान असते. या कसोटीवर आता कुनोतील वातावरण उत्तीर्ण झाले आहे. या उपलब्धीनंतर भारत चित्त्यांची संख्या वाढविण्याच्या बाबतीतही लवकरच आत्मनिर्भर होईल, असे संकेत मिळत आहेत.**



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अनिल अंबानींची १४०० कोटींची मालमत्ता जप्त



**नवी दिल्ली** : रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी आणि त्यांच्या कंपन्यांशी संबंधित मनी लाँड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने १,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची नवीन मालमत्ता जप्त केली आहे, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले. संघीय तपास यंत्रणेने या प्रकरणात यापूर्वी ७,५०० कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्या होत्या. देशातील विविध भागांमध्ये असलेल्या मालमत्तेसाठी मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत नवीनतम तात्पुरती जप्तीचा आदेश जारी करण्यात आला आहे, असे सूत्रांनी सांगितले. रिलायन्स ग्रुपकडून उत्तराची वाट पाहत आहे.

### विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी शिक्षिकेला अटक

**पालघर** : पालघरमधील शाळेत उशिरा आल्याने १०० उठाबशा करण्यास भाग पाडलेल्या सहावीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. या मृत्यूप्रकरणी एका महिला शिक्षिकेला अटक करण्यात आली आहे, असे एका अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. वसई परिसरातील सातिवली येथील खाजगी शाळेतून काढून टाकण्यात आलेल्या शिक्षिकेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे वालीव पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्याने सांगितले. ८ नोव्हेंबर रोजी शाळेत उशिरा पोहोचल्यानंतर मुलीला १०० उठाबशा काढायला लावण्यात आल्याचा आरोप आहे. शिक्षिकेने दिलेल्या अमानुष शिक्षेमुळे मुलीचा मृत्यू झाला, असा आरोप मृत विद्यार्थीनीच्या आईने केला आहे. तिला तिच्या शाळेच्या बॅग पाठीवर ठेवून उठाबशा काढायला लावले, असे तिने सांगितले. १३ वर्षीय मुलीला आरोग्याच्या समस्या होत्या आणि ती शिक्षा सहन करू शकत नव्हती. ती आजारी पडली आणि तिला मुंबईतील रुग्णालयात नेण्यात आले. तिथे सात दिवसांनी तिचा मृत्यू झाला.

### वादात अडकली मिस युनिव्हर्स स्पर्धा

**बँकॉक** : मिस युनिव्हर्स २०२५ च्या सौंदर्य स्पर्धेभोवतीचा वाद अजूनही सुरूच आहे. ग्रँड फिनालेच्या एक दिवस आधी, मिस युनिव्हर्स निवड समितीच्या अध्यक्षा इटालियन राजकुमारी कॅमिला डी बोर्बन यांनी ज्युरी पॅनेलमधून राजीनामा दिला आहे. पॅनेल सोडणारी ती तिसरी न्यायाधीश आहे. प्रसिद्ध संगीतकार ओमर हरफोश आणि माजी फ्रेंच फुटबॉलपटू क्लॉड मेकलेले यांनीही ज्युरी सोडली. ओमर यांनी आरोप केला की, आयोजकांनी जजिंग कमिटी स्थापन होण्यापूर्वीच अनधिकृतपणे टॉप ३० स्पर्धकांची निवड केली होती. आयोजकांशी वैयक्तिक संबंध असलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

### ताम्हिणी घाटात कार कोसळून सहा तरुणांचा मृत्यू

**पुणे** : रायगड आणि पुणे जिल्ह्यांना जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात कार दरीत पडली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. हवेली तालुक्यातील कोंडवे धावडे गावातील सहा तरुण कारने कोकण फिरण्यासाठी जात होते. या तरुणांची कार मंगळवारी पहाटे घाटातील ५०० फूट खोल दरीत कोसळली. यामधील चार जणांचे मृतदेह शोधण्यात बचाव पथकाला यश आले. उर्वरित दोघांचा शोध अजूनही सुरू आहे. २० दिवसांपूर्वी फिरायला गेलेल्या या तरुणांपैकी एकाने नवी कोरी कार घेतली होती. तो कार घेऊन आपल्या मित्रांसमवेत कोकणात फिरायला निघाला होता. मात्र, वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात घडला.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,६३२.६८ (+४४६.२१) |
| निफ्टी | २६,१९२.१५ (+१३९.५०) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२३,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५७,१०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.१ | १५.४ |
| अमरावती | ३१.० | १२.७ |
| भंडारा | २८.० | १०.० |
| बुलडाणा | २८.८ | १३.० |
| चंद्रपूर | ३०.४ | १४.२ |
| गडचिरोली | ३०.० | १२.६ |
| गोंदिया | २८.० | ११.६ |
| नागपूर | २९.० | १२.२ |
| वर्धा | २९.० | १३.० |
| वाशीम | ३०.० | ११.० |
| यवतमाळ | २९.५ | ११.६ |

# अमेरिकेकडून भारताला मिळणार जॅव्हेलीन क्षेपणास्त्रे

## ७७५ कोटींच्या संरक्षण कराराला डीएससीएची मंजुरी

◆ **वॉशिंग्टन, २० नोव्हेंबर**

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेचे समकक्ष नेते पीटे हेगसेथ यांच्यात नुकताच संरक्षण करार झाला होता. त्याचाच भाग म्हणून बुधवारी अमेरिकेने भारताला १०० जॅव्हेलीन क्षेपणास्त्र प्रणालीची विक्री करण्यास मंजुरी दिली. एकूण ९३ मिलियन डॉलर्स अर्थात् ७७५ कोटींच्या कराराला अमेरिकेच्या 'डिफेन्स सिक्युरिटी कॉर्पोरेशन एजन्सी' ने मान्यता दिली आहे.



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या ५० टक्के व्यापारी शुल्कानंतर अमेरिकेसोबत झालेला हा पहिलाच लष्करी करार आहे. डीएससीएने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की. अमेरिकेने भारतासाठी दोन प्रमुख लष्करी खरेदी प्रस्तावांना मान्यता दिली आणि त्यांच्या विक्रीसाठी आवश्यक असलेल्या मंजुरी आणि तपशील अमेरिकन काँग्रेसला सादर करण्यात आले. ही शस्त्रे भारताला सध्याच्या आणि भविष्यातील धोक्यांना तोंड देण्यास मदत करतील. भारत आणि अमेरिकेच्या संरक्षण मंत्र्यांनी संरक्षण क्षेत्राशी संबंधित करार केले होते, त्याचाच भाग म्हणून 'एक्सकॅलिबर प्रोजेक्टाइल' आणि जॅव्हेलीन क्षेपणास्त्र प्रणालीची विक्री करण्यास मान्यता देण्यात आली. जाव्हेलीन क्षेपणास्त्र प्रणाली ही रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली आहे. यासाठी ४०० कोटींचा करार झाला. प्रस्तावित संरक्षण उपकरणाच्या विक्रीमुळे अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा उद्दिष्टे बळकट होईल आणि अमेरिका-भारत धोरणात्मक भागीदारी मजबूत होईल, तसेच एक प्रमुख संरक्षण भागीदार असलेल्या भारताची सुरक्षा क्षमता वाढेल. भारत इंडो-पॅसिफिक आणि दक्षिण आशिया प्रदेशात राजकीय स्थिरता, शांतता आणि आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो, त्यामुळे त्यांचे सुरक्षा हित लक्षात घेता हा करार करण्यात आला.

#### लष्कराची अचूक प्रहार क्षमता वाढणार

भारताला २१६ एम ९८२ए१ एक्सकॅलिबर टॅक्टिकल प्रोजेक्टाइल्सची विक्री केली जाणार आहे. या करारासाठी मुख्य कंत्राटदार आर्लिंग्टन, व्हर्जिनिया येथे स्थित आरटीएक्स कॉर्पोरेशन असणार आहे. करारात अनेक प्रमुख संरक्षण उपकरणे आणि त्याला सहाय्यक वस्तूंचादेखील समावेश आहे. प्रोजेक्टाइल भारताच्या लष्कराची अचूक प्रहार क्षमता वाढवेल. (वृत्तसंस्था)

#### लष्करी उपकरणांची अशी आहे वैशिष्ट्ये

- एफजीएम-१४८ जॅव्हेलीन रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र आहे जे चिलखती वाहने आणि बंकर नष्ट करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.
- क्षेपणास्त्राची मारक क्षमता २५०० मीटर असून, प्रतिकूल हवामानातही ते लक्ष्यांवर मारा करण्यास सक्षम आहे. क्षेपणास्त्र खांद्यावरून डागता येते.
- २१६ एम ९८२ए१ एक्सकॅलिबर तोफ स्मार्ट बॉम्बसारखी काम करते. परंतु तो तोफेतून डागला जातो.
- सामान्य तोफेची रेंज १५-२० किलोमीटर असते, तर एक्सकॅलिबर ४०-५० किलोमीटर अंतरापर्यंतच्या लक्ष्यांवर अचूकपणे मारा करू शकते.

# नक्षलवादी विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहेत

### राष्ट्रपती मुर्मू यांचे वक्तव्य

◆ **अंबिकापूर, २० नोव्हेंबर**

देशभरातील नक्षलवादी हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात सामील होत आहेत, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारांच्या सामायिक प्रयत्नांमुळे डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाचे उच्चाटन शक्य होईल, असे त्या म्हणाल्या.

आदिवासी समुदायांनी इतर सामाजिक गटांसह टप्प्याटप्प्याने पुढे जावे, असे छत्तीसगडमधील सुरगुजा जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अंबिकापूर येथे जनजाती गौरव दिवस कार्यक्रमाला संबोधित करताना त्या म्हणाल्या. लोक (नक्षलवादी) डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाचा मार्ग सोडून छत्तीसगड तसेच देशभरातील विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या समन्वित प्रयत्नांमुळे, वामपंथी उन्मूलन शक्य होईल. केंद्र आणि राज्ये हे ध्येय साध्य करण्यासाठी संयुक्तपणे पावले उचलत आहेत आणि या प्रयत्नांना एक अतिशय समाधानकारक बदल, असे राष्ट्रपती म्हणाल्या. नुकत्याच झालेल्या बस्तर ऑलिंपिकमध्ये १,६५,००० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता, ही खूप आनंदाची बाब होती, असे त्या म्हणाल्या. आदिवासी नायकांच्या आदर्शांचे पालन करून, छत्तीसगडमधील रहिवासी एक मजबूत, स्वावलंबी आणि विकसित भारत (विकसित भारत) निर्माण करण्यासाठी अमूल्य योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिला या समाजाचा पाया आहेत आणि जेव्हा त्या प्रगती करतात तेव्हा समाज पुढे जातो, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)



### आरोग्य विमा स्वस्त होणार?

**नवी दिल्ली** : आरोग्य विम्याच्या प्रीमियममध्ये दरवर्षी होणाऱ्या मोठ्या वाढीतून काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. या समस्येचे निराकरण करण्यासाठी सरकारने अनेक प्रस्ताव मांडले आहेत, ज्यात एजंट कमिशन २०% पर्यंत मर्यादित करणे आणि रुग्णालयातील उपचार पॅकेज दर कमी करणे समाविष्ट आहे. हे प्रस्ताव विमा नियामक, आयआरडीएआय कडे सादर केले गेले आहेत.



**सोलापूर : मल्लिकार्जुन मंदिरात गुरुवारी रात्री नंदीध्वज पूजन करण्यात आले. त्याप्रसंगी टिपलेले छायाचित्र.**

# इंट्याक सोलापूरतर्फे 'वारसा फेरी'चे आयोजन उद्यापासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २० नोव्हेंबर-**

भारतीय राष्ट्रीय कला व सांस्कृतिक वारसा न्यास, इंट्याक सोलापूर शाखेच्या वतीने, 'जागतिक वारसा सप्ताहा'चे उदात्त औचित्य साधून, सोलापूरच्या भूमीत सुप्त असलेल्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी रोज एक 'वारसा फेरी' आयोजित करण्यात आली आहे.

आपला भूतकाळ जपून, आपल्या भविष्याला प्रेरणा देणे' या स्फूर्तिदायक संकल्पनेवर आधारित, हा द्विदिवसीय उपक्रम शनिवार, २२ नोव्हेंबर आणि रविवार, २३ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. सोलापूरचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संचित केवळ इमारतींच्या ढाच्यात नव्हे, तर तेथील प्रत्येक वास्तूच्या कहाणीत आणि त्या वास्तूशी जोडल्या गेलेल्या महान विभूतींच्या चरित्रात दडलेले आहे. याच अमूल्य ठेव्याचे दर्शन समस्त सोलापूरकरांना व्हावे, या उदात्त हेतूने इंट्याक, सोलापूर शाखेने ही अद्वितीय वारसा फेरी नियोजित केली आहे.

या वारसा फेरीचे उपक्रमाचे संवादक म्हणून डॉ. सीमंतिनी चाफळकर व नितीन अनवेकर असणार आहेत. इंट्याक, सोलापूरच्या वतीने समन्वयक डॉ. नरेंद्र काटीकर (संपर्क: ९४२२६४४२४६) आणि सहसमन्वयक आर्किटेक्ट श्वेता कोठावळे (संपर्क: ९८९०८०२५२६) यांनी सोलापूरकरांना या ऐतिहासिक व सांस्कृतिक ज्ञान-यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन सोलापूरच्या वारसा संवर्धनाच्या चळवळीला बळ द्यावे, असे आवाहन केले आहे.

#### फेरीतील प्रमुख ठिकाणे

**शनिवार, २२ नोव्हेंबर :** बारड पुस्तक संग्रहालय, नवी पेठ (सकाळी ८.३० वाजता), श्री राम मंदिर, नवी पेठ (सकाळी ९.१५ वाजता), श्री शुभराय महाराज मठ, दक्षिण कसबा पेठ (सकाळी १०.०० वाजता)

**रविवार, २३ नोव्हेंबर :** आंतरराष्ट्रीय आणि प्रशासकीय वारसा दर्शन : डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मृती संग्रहालय (सकाळी ८.०० वाजता), एक्साईज ऑफिस (एम्प्लॉयमेंट चौक, डी.आर.एम. ऑफिस समोर) (सकाळी १०.०० वाजता)

# अफगाणचे उद्योगमंत्री भारताच्या दौऱ्यावर

### जयशंकर यांच्यासोबत द्विपक्षीय संबंधावर चर्चा

◆ **नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारचे उद्योग व वाणिज्य मंत्री अलहज नूरुद्दीन अजीजी पाच दिवसाच्या भारत दौऱ्यावर आले. त्यांनी गुरुवारी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली आणि द्विपक्षीय संबंधावर चर्चा केली.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत शुक्रवारी त्यांची बैठक होणार आहे. द्विपक्षीय व्यापार वाढ, भारतीय गुंतवणूक व औद्योगिक सहकार्य, चाबहार बंदराचा अधिक प्रभावी वापर आणि प्रादेशिक दळवळणाच्या पर्यायावर चर्चा करणार आहे. अफगाणिस्तानच्या दूतावासाने म्हटले की, द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्याचा भाग म्हणून नूरुद्दीन अजीजी भारताच्या दौऱ्यावर आले आहे. त्यांनी गुरुवारी दिल्लीतील भारत मंडपम् येथे आयोजित व्यापार मेळाव्याला भेट दिली. यावेळी त्यांनी भारतातील अफगाण व्यवसायांशी चर्चा केली. दरम्यान ऑक्टोबरमध्ये मुत्ताकी यांच्या भेटीदरम्यान, भारत आणि अफगाणिस्तानने खनिज, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणुकीच्या संधींचा शोध घेण्यासाठी द्विपक्षीय व्यापार समिती स्थापन करण्याचे मान्य केले होते. भारताने अलिकडेच काबूलमध्ये आपला दूतावास पूर्ण क्षमतेने पुन्हा स्थापित केला. अफगाणिस्तान आता खाणकामासह अनेक प्रकल्पांमध्ये भारतीय गुंतवणूक शोधत आहे. भारत सध्या अफगाणिस्तानच्या प्रमुख व्यापारी भागीदारांपैकी एक आहे. (वृत्तसंस्था)

# विरोधी पक्षांना सोबत घेणे गरजेचे : सुळे

◆ **मुंबई, २० नोव्हेंबर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्व विरोधी पक्षांना सोबत घेणे गरजेचे आहे. याबाबत त्यांच्याशी चर्चा करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार)च्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रितपणे लढण्याबाबत आणि महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीबाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करतील, असे सुळे म्हणाल्या. मुंबईत युतीबाबत आम्ही पुढील आठवड्यात काँग्रेसशी बोलू. मुंबईत त्यांचा पक्ष काँग्रेससोबत जाईल की उद्धव बाळासाहेब ठाकरे गटासोबत जाईल असे विचारले असता, आम्हाला सर्वांना सोबत घ्यायचे आहे. मुंबईतील महानगरपालिका निवडणुकांसाठी एकटे जाण्याची घोषणा करणाऱ्या मुंबई काँग्रेसच्या नेत्यांनी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन पक्षाच्या मित्रपक्ष सोबत आघाडी करण्याबाबत चर्चा केली. (वृत्तसंस्था)



केरळमधील कोच्ची येथे वृश्चिकोलसवम् महोत्सवाला प्रारंभ झाला आहे. यानिमित्त काढण्यात येणाऱ्या यात्रेसाठी हत्तींना सुशोभित करण्यात आले

### संघ स्वयंसेवकाच्या मुलाच्या हत्येतील मुख्य आरोपीला अटक

**फिरोजपूर** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेत्याच्या मुलाच्या हत्येत सहभागी असलेल्या मुख्य आरोपीला गुरुवारी पहाटे आरिफके गावात अटक करण्यात आली. १५ नोव्हेंबर रोजी फिरोजपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते बलदेव राज अरोरा यांचा मुलगा नवीन अरोरा याची दोन मोटारसायकलस्वारांनी गोळ्या घालून हत्या केली. त्याच्यावर दोघांनी गोळीबार केला की केवळ एकाने हे स्पष्ट झाले नाही. पोलिसांना हत्येतील मुख्य आरोपींपैकी एक, गुरसिमरन सिंग उर्फ जतिन काली याची आरिफके गावातील सोढीवाला जवळच्या हालचालींबद्दल माहिती मिळाली होती. (वृत्तसंस्था)

# आठवड्यातून तीन दिवस धावणार अमृत भारत एक्सप्रेस

### गोंदिया रेल्वेस्थानकांवर थांबा

◆ **गोंदिया, २० नोव्हेंबर**

ब्रह्मपूर (ओडिशा) ते उधना (गुजरात) दरम्यानच्या साप्ताहिक अमृत भारत एक्सप्रेसमध्ये श्रेणीसुधारणा करण्यात आली आहे. ही एक्सप्रेस आता आठवड्यातून तीन दिवस धावणार आहे. त्यामुळे बह्मपूर ते उधणा दरम्यानच्या गोंदिया स्थानकासह अन्य स्थानकांतून प्रवास करणाऱ्यांना सोयीचे होणार आहे.

उधना-ब्रह्मपूर अमृत भारत एक्सप्रेस १९ नोव्हेंबरपासून आठवड्यातील दर रविवार, बुधवार आणि शुक्रवारी सकाळी ७.१० वाजता उधना येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १.५५ वाजता ब्रह्मपूर येथे पोहोचेल.

ही गाडी आग्नेय मध्य रेल्वेच्या गोंदिया स्थानकावर रात्री ९.४० वाजता पोहोचेल आणि रात्री ९.४५ वाजता सुटेल, दुर्ग स्थानकावर रात्री ११.५३ वाजता पोहोचेल आणि ११.५८ वाजता सुटेल, तर सकाळी १२.३५ वाजता रायपूर स्थानकावर पोहोचणार असून, १२.४५ वाजता सुटेल आणि आपल्या स्थानकाकडे रवाना होईल. त्याचप्रमाणे ही रेल्वेगाडी २० नोव्हेंबरपासून दर सोमवार, गुरुवार आणि शनिवारी ब्रह्मपूरहून रात्री ११.४५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी सकाळी ८.४५ वाजता उधना येथे पोहोचेल. ही गाडी आग्नेय मध्य रेल्वेच्या रायपूर स्थानकावर दुपारी २.५५ वाजता पोहोचेल, दुपारी ३.०५ वाजता सुटेल आणि दुपारी ३.५० वाजता दुर्ग स्थानकावर पोहोचेल. ३.५५ वाजता प्रस्थान आणि ५.५५ वाजता गोंदिया स्थानकावर आगमन आणि ६ वाजता निर्गमन आपल्या स्थानाकडे जाईल.

#### ट्रेनची वैशिष्ट्ये

ओडिशा ते गुजरात थेट आणि जलद रेल्वे कनेक्टिव्हिटी, प्रवास वेळ कमी करणे, आधुनिक एलएचबी कोचसह सुसज्ज, सुधारित आसन आणि सुविधांसह आरामदायी प्रवासाचा अनुभव प्रवाशांना मिळणार आहे. ही ट्रेन छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा आणि गुजरातमधील वाहतूक आणि सामाजिक-सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करेल. (तभा वृत्तसेवा)

# २०२५ हे वर्ष शेतीसाठी ठरले संकटाचे

### पिकांबरोबर जीवितहानी आणि आर्थिक नुकसान

◆ **नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

भारतातील हवामान संकट अधिकच गंभीर झाले आहे. जानेवारी ते सप्टेंबर २०२५ मधील ९९ टक्के दिवस निसर्गाचे दृष्टचक्र सुरू राहिले. देशात उष्णतेच्या लाटा, थंडीच्या लाटा, वादळे, मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलन या घटना घडल्या. विज्ञान आणि पर्यावरण केंद्र तसेच डाऊन टू अर्थ यांच्या वार्षिक अहवालानुसार, या घटनांमुळे जीवितहानी आणि आर्थिक नुकसान झाले.



अहवालानुसार, या नऊ महिन्यात, या तीव्र हवामान घटनांमुळे ४,०६४ लोकांचा मृत्यू झाला. तो मागील चार वर्षांच्या तुलनेत ४८ टक्क्यांनी वाढला आहे. या हवामान घटनांचा कृषी क्षेत्राला सर्वात जास्त फटका बसला आहे. सुमारे ४७ दशलक्ष एकर पीक जमिनीवर परिणाम झाला. ही चार वर्षांतील वाढ ४०० टक्के एवढी आहे. याशिवाय ९९,५३३ घरे उद्ध्वस्त झाली तर ५८,९८२ प्राण्यांचा यात मृत्यू झाला. २०२५ मध्ये १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २०२२ नंतरचे सर्वात तीव्र हवामान दिवस नोंदवले गेले. देशभरातील ३० पेक्षा अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये खराब वातावरणाचा फटका बसला.

हिमाचल प्रदेशात २५७ दिवस हवामान खराब होते तर सर्वाधिक मृत्यू हे मध्य प्रदेशात झाले. तेथे ५३२ मृत्यू झाले असल्याची नोंद आहे. मान्सूनचा हंगाम सर्वात विनाकारी होता, असे अहवालात म्हटले आहे. सलग चौथ्या वर्षी म्हणजेच जून ते सप्टेंबर या कालावधीतील १२२ मान्सून दिवस खराब हवामानामुळे प्रभावित झाल. यामुळे ३००७ मृत्यू झाले. एकूण ४,०६४ मृत्यूंपैकी, मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलन हे सर्वात प्राणघातक होते. यामध्ये २,४४० मृत्यू झाले. वीज पडणे आणि वादळामुळे १,४६५ मृत्यू झाले. (वृत्तसंस्था)

#### २०२५ मध्ये मोडले हवामानाचे अनेक विक्रम

अहवालानुसार, २०२५ या वर्षी हवामानाचे अनेक विक्रम मोडले. जानेवारी हा १९०१ नंतरचा पाचवा सर्वात कोरडा महिना होता, तर फेब्रुवारी हा १२४ वर्षांतील सर्वात उष्ण महिना होता. सप्टेंबरमध्ये देशातील सातव्या क्रमांकाचे सरासरी तापमान नोंदवले गेले. ८.४ दशलक्ष हेक्टर क्षेत्रासह पीक क्षेत्राच्या नुकसानीच्या बाबतीत महाराष्ट्र सर्वात जास्त प्रभावित राज्य होते. प्रादेशिकदृष्ट्या, वायव्य भागात सर्वाधिक घटना घडल्या, तर मध्य भागात सर्वाधिक १,०९३ मृत्यू झाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अमेरिकेकडून पुन्हा पाकिस्तानची स्तुती



## म्हणे, चार दिवसांच्या संघर्षात भारतावर वरचढ

### अमेरिकन सुरक्षा अहवालातील माहिती ● काँग्रेसची केंद्र सरकारवर टीका



**◆ वॉशिंग्टन, २० नोव्हेंबर**

पहलगाल हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या चार दिवसीय संघर्षात पाकिस्तान भारतावर वरचढ ठरला, अशी माहिती अमेरिकन सुरक्षा अहवालात देण्यात आली आहे. तथापि, याबाबत एकाही पुराव्याचा उल्लेख करण्यात आला नाही. या अहवालानंतर काँग्रेसने पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारवर टीका केली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संघर्ष थांबल्याचा दावा भारताने अमान्य केल्यानंतर अमेरिका सातत्याने पाकिस्तानची तळी उचलताना दिसते आहे.

मे २०२५ मध्ये झालेल्या संघर्षात लष्करीदृष्ट्या पाकिस्तान विजयी झाला. दोन्ही देशांनी एकमेकांच्या प्रदेशात खोलवर घुसून मारा केला. गेल्या ५० वर्षांतील दोन्ही देशांदरम्यानचा हा सर्वात मोठा संघर्ष होता. विशेष म्हणजे यावेळी चीनच्या एचक्यू-९ हवाई संरक्षण यंत्रणा, हवेतून हवेत मारा करणारे पीएल-१५ क्षेपणास्त्र आणि जेएफ-१० या लढाऊ विमानांचा प्रथमच वापर करण्यात आला. दोन्ही देशातील संघर्षाचा फायदा घेताना चीनने आधुनिक शस्त्रास्त्रांची चाचणी घेतली. चीनकडून मिळत असलेल्या गुप्त माहितीच्या बळावर पाकिस्तान लढत होता, असा दावा भारताने केला. पाकिस्तानने हा दावा फेटाळला असला तरी चीनने यावर चुप्पी साधली, असे अहवालात म्हटले आहे. चिनी शस्त्रास्त्रांच्या मदतीने भारतील लढाऊ विमाने पाडल्याबद्दल चीनच्या दुतावासांनी सार्वजनिकपणे कौतुक केले. याचा परिणाम म्हणजे चिनी शस्त्रांस्त्रांच्या मागणीत वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे. ८०० पानांच्या या अहवालात पान क्र. १०८ आणि १०९ वर संघर्षाची माहिती देण्यात आली.

'अमेरिका-चीन आर्थिक आणि सुरक्षाविषयक पुनरावलोकन आयोग-२०२५' ने अमेरिकन काँग्रेसला आपला अहवाल सादर केला. त्यात भारत-पाकिस्तान संघर्षावर माहिती देण्यात आली आहे. ◀(वृत्तसंस्था)

**भारतासाठी धक्का असल्याची काँग्रेसची टीका**

मोदी सरकारची परराष्ट्र नीती अपयशी ठरल्याची टीका काँग्रेसने केली आहे. अमेरिकन अहवालातील पान क्रमांक १०८ आणि १०९ वरील माहिती आश्चर्यकारक आहे. पाकिस्तानने आखलेल्या पहलगाम हल्ल्याला बंडखोरांचा हल्ला संबोधले आहे. माझ्यामुळे युद्ध थांबल्याचा दावा ट्रम्प यांनी आतापर्यंत ६० वेळा केला पण पंतप्रधान मोदी यावर एक शब्दही बोलत नसल्याचे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटले आहे. ■

# ३५० टक्के शुल्काच्या धमकीने भारत-पाक युद्ध थांबवले

**डोनाल्ड ट्रम्प पुन्हा बरळले**

**◆ वॉशिंग्टन, २० नोव्हेंबर**

भारत-पाकिस्तान युद्ध थांबविण्यासाठी मी दोन्ही देशांना व्यापारबंदीची धमकी दिली, आणि संघर्ष न थांबल्यास ३५० टक्के शुल्क लादण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे दोन्ही देश घाबरले आणि त्यांनी युद्धबंदीचा निर्णय घेतला, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी केला.

अमेरिका-सौदी अरब व्यापार परिषदेत संबोधित करताना ट्रम्प म्हणाले, भारत आणि पाकिस्तान एकमेकांवर आण्विक शस्त्रांनी हल्ला करणार होते. मी दोन्ही देशांच्या प्रमुखांना फोन केला आणि सांगितले, त्यांनी संघर्ष सुरूच ठेवल्यास मी दोन्ही देशांवर ३५० टक्के शुल्क लावेल आणि त्यांच्यासोबत कोणताही व्यापार करणार नाही. यानंतर दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी अमेरिकेच्या समकक्षांशी संपर्क साधला आणि युद्ध थांबविण्याची तयारी दर्शवली. युद्ध थांबल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी फोन करून माझे आभार मानले आणि म्हटले की, त्यांनी लाखो लोकांचे जीव वाचवले. दरम्यान, ट्रम्प यांनी युद्ध थांबवल्याचा दावा करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही त्यांनी अनेकदा हा दावा केला आहे. मात्र, भारताने यापूर्वीच स्पष्ट केले की, भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध थांबवण्यात तिसऱ्या देशांचा सहभाग नव्हता. पाकिस्तानच्या विनंतीवरुन भारतीय सैन्याने हल्ले थांबवले. ◀(वृत्तसंस्था)

# इस्रायलचा गाझावर कहर; ३२ पॅलेस्टिनी ठार

### युद्धबंदीवर प्रश्नचिन्ह, निवासी भागात बॉम्बचा मारा, ८० जखमी



**◆ गाझा, २० नोव्हेंबर**

अमेरिकेच्या मध्यस्थीने दहशतवादी हमास आणि इस्रायलमध्ये झालेल्या युद्धबंदी कराराच्या महिनाभरातच गाझात पुन्हा हल्ले सुरू झाले. बुधवारी रात्री इस्रायली लष्कराने मध्य गाझात बॉम्बचा मारा आणि गोळीबार केला, त्यात ३२ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ८० पेक्षा अधिक जण जखमी आहे. मृतकांमध्ये नऊ मुलांचा समावेश आहे.

गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, मध्य पूर्व भागात इस्रायली लष्कराच्या पथकाने हमासच्या अड्ड्यांना लक्ष करीत टँकने बॉम्बचा मारा केला, याशिवाय गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यात निर्वासितांच्या छावण्यास इमारती, शाळा व एका रुग्णालयाचे मोठे नुकसान झाले. बचाव पथकाने ढिगाऱ्यातून ३२ मृतदेह बाहेर काढले, तर ८० नागरिकांना रुग्णालयात हलविले. अजूनही ढिगाऱ्यात काही नागरिक अडकले असून, त्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकाकडून मोहीम सुरू आहे. इस्रायली लष्कराने म्हटले की, हमासच्या दहशतवाद्यांनी सुरुवातीला त्यांच्या पथकावर गोळीबार केला, त्यानंतर प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. दुसरीकडे हमासने इस्रायलवर युद्धबंदीच्या उल्लंघनाचा आरोप केला आहे, मात्र इस्रायली लष्कराने त्यांचा आरोप फेटाळून लावला. उत्तर गाझामधील संयुक्त राष्ट्रांच्या मदत केंद्राच्या इमारतीवरही हल्ला करण्यात आला.

**युद्धबंदीनंतर ३०० नागरिकांना मारले**

हमासच्या प्रवक्त्याने समाज माध्यमावर चित्रफित जारी केली, त्यात म्हटले की, गाझात युद्धबंदी लागू झाल्यापासून इस्रायली सैन्याने ३०० हून अधिक पॅलेस्टिनी ठार झाले आहेत. हल्ल्यात अनेक घरे उद्ध्वस्त झाले असून, शेकडो नागरिक जखमी आहे. इस्रायलचे हल्ले सुरू राहिल्यास हमासदेखील प्रत्युत्तर देणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारत-जर्मनी विकसित करणार हेलिकॉप्टर अपघात रोखणारे तंत्रज्ञान

**एचएएल, हेन्सोल्ड यांच्यात करार**



**◆ नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

हेलिकॉप्टर इंटरसेप्शन अव्हॉइडन्स प्रणाली विकसित करण्यासाठी भारताची सरकारी कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड अर्थात् एचएएल आणि जर्मन संरक्षण उपकरण उत्पादक कंपनी हेन्सोल्ड सेन्सर्स यांच्यात दुबई येथे करार झाला. अत्याधुनिक हेलिकॉप्टरची निर्मिती, त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान, उत्पादन आणि दुरुस्तीसाठी दोन्ही कंपन्या एकत्र काम करणार आहे.

कमी दृश्यमानता आणि कमी उंचीच्या उड्डाणादरम्यान हेलिकॉप्टरच्या अपघातांचा धोका कमी करण्यासाठी इंटरसेप्शन अव्हॉइडन्स प्रणाली विकसित केली जाणार आहे.


एचएएलने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात या कराराची माहिती देताना सांगितले की, दोन्ही कंपन्यांमधील करारामध्ये प्रणाली विकसित करणे, तंत्रज्ञान हस्तांतरण, बौद्धिक संपदा अधिकार, उत्पादन आणि दुरुस्तीचा समावेश आहे. एचएएलचे कार्यकारी संचालक रवी प्रकाश आणि हेन्सोल्ड विक्री प्रमुख युजेन मेयर यांनी या करारावर स्वाक्षरी केली. याप्रसंगी बोलताना एचएएलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. डी.के. सुनील म्हणाले की, ही भागीदारी भारतातील हेलिकॉप्टर उड्डाणातील अडथळे टाळण्यासाठी अत्याधुनिक प्रणाली विकसित करेल, या करारामुळे स्वावलंबनाला बळकटी मिळेल. ◀(वृत्तसंस्था)

**अपघात टाळण्यासाठी होणार मदत**

हिमालय, ईशान्य, दाट लोकवस्ती असलेले शहरी भाग, वाळवंट आणि किनारी भाग यासारख्या आव्हानात्मक भूभागात लष्करी, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी हेलिकॉप्टरद्वारे मोहिमा राबवाव्या लागतात. वैमानिकांना हवामानातील जलद बदल आणि कमी दृश्यमानता तसेच केबल्स आणि टॉवर्ससारख्या इतर धोक्यांचा सामना करावा लागतो. ही प्रणाली १ किमीच्या आत तारा, रिजलाइन आणि इतर अडथळे शोधते आणि ताबडतोब वैमानिकाला सतर्क करते. ■

# लष्कराने लढाऊ गणवेशाचे घेतले पेटंट

**नक्कल केल्यास दंड, खटलाही दाखल होणार**



**◆ नवी दिल्ली, २० नोव्हेंबर**

भारतीय लष्कराने नवीन कॉम्बॅट कोटच्या डिझाइनचे (डिजिटल प्रिंट) पेटंट घेतले आहे. हा तीन-स्तरीय गणवेश सैनिकांना सर्व हवामानात आराम देतो. याचा अर्थ असा की कोणीही लष्कराच्या परवानगीशिवाय या डिझाइनचा वापर करून गणवेश तयार करू, विकू किंवा वापरू शकणार नाही. असे केल्याने कायदेशीर कारवाई आणि दंड होऊ शकतो.

हा नवीन कोट कॉम्बॅट दिल्लीतील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) ने आर्मी डिझाईन ब्युरोच्या सहकार्याने डिझाइन केला आहे. लष्कराने जानेवारी २०२५ मध्ये नवीन लढाऊ गणवेश सादर केला. अधिकाऱ्यांच्या मते, हा गणवेश प्रगत कापड आणि तंत्रज्ञानाचा वापर करून बनवला आहे. त्याची अर्गोनॉमिक डिझाइन सर्व हवामानात आरामदायी आहे आणि गतिशीलतेला अडथळा आणत नाही.

भारतीय लष्कराने नवीन कोट कॉम्बॅट (डिजिटल प्रिंट) चे डिझाइन २७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या डिझाइन ॲप्लिकेशन क्रमांक ४४९६६७-००१ अंतर्गत कोलकाता येथील पेटंट्स, डिझाईन्स आणि ट्रेडमार्कच्या नियंत्रकांकडे नोंदणीकृत केले आहे. ते ७ ऑक्टोबर २०२५ रोजी पेटंट ऑफिसच्या अधिकृत जर्नलमध्ये प्रकाशित झाले होते, असे लष्कराच्या निवेदनात म्हटले आहे. या नोंदणीसह, भारतीय लष्कराकडे नवीन डिझाइन आणि कॅमफ्लाज पॅटर्नचे पेटंट असेल. पेटंटचे कोणतेही उल्लंघन केल्यास खटला आणि दंड आकारला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

# १७ नोव्हेंबर रोजीच्या आरक्षण सोडत प्रक्रियेस स्थगिती द्यावी

**▶▶ सोलापूर महापालिका आरक्षण सोडतीवर हरकत**

**▶▶ भाजपा माजी अध्यक्षासह दोघांची निवडणूक कार्यालयात हरकत**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महापालिका प्रशासनाने दिनांक १७ नोव्हेंबर रोजी काढलेली फेर आरक्षण सोडत या प्रक्रियेस स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी भाजपाचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे आणि राम वाकसे अशा दोघांनी महापालिका निवडणूक कार्यालयात लेखी स्वरूपात केली आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जी आरक्षण सोडत प्रक्रिया राबविण्यात आली त्या ११ नोव्हेंबर रोजीच्या पहिल्या प्रक्रियेमध्ये प्रथम अनुसूचित जातीचे आरक्षण काढण्यात आले त्यामध्ये प्रभाग २४ (अ) मध्ये अनुसूचित जाती सर्वसाधारण असे आरक्षण पडले होते. २४ (ब) मध्ये अनुसूचित जमातीची महिला हे थेट आरक्षण काढण्यात आले. २४ (क) हे नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी सोडत मधून काढल्यानंतर २४ ड सर्वसाधारण महिलेसाठी सोडत निघाली. परंतु १४ नोव्हेंबरच्या पत्रानुसार २४ (क) ही जागा नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिलेसाठी थेट राखीव करण्यात यावी असे महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे पत्र आले वास्तविक पाहता २४ (ब) ही जागा महिलेसाठी राखीव करण्यात आली होती. अशावेळी एकाच प्रभागात दोन जागा दोन प्रवर्गासाठी थेट आरक्षित करणे हे अन्यायकारक आहे. तसेच आरक्षण निश्चित करताना नियम क्रमांक ६ (३) (ब) नुसार असे करता येत नाही. २६ प्रभागातील फक्त एकाच प्रभागात थेट दोन महिलांसाठी दोन प्रवर्गातून जागा आरक्षित करणे हे संशयास्पद आहे यासाठी राज्य निवडणूक आयोगाबद्दल चुकीचे मत तयार झाले आहे हे बदल होण्यासाठी प्रक्रिया पुन्हा राबविण्यात यावी असेही त्यांनी आपल्या लेखी तक्रार- हरकतीमध्ये नमूद केले आहे.

**निवडणूक आयोगाचे अधिकारी उपस्थित नव्हते ही गंभीर बाब**

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडतीची प्रक्रिया राबवत असताना राज्य निवडणूक आयोगाचे कोणतेही अधिकारी यावेळी उपस्थित नव्हते ही गंभीर बाब आहे. म्हणून ही प्रक्रिया बेकायदेशीरपणे राबविण्यात आली आहे असे आमचे मत आहे. यामुळेच आता दि. १७ नोव्हेंबरच्या काढलेल्या आरक्षण सोडतील स्थगिती देण्यात येऊन ही आरक्षण सोडतीची प्रक्रिया पुन्हा एकदा राबविण्यात यावी अशी मागणी या हरकतीमध्ये दोघांनी केली आहे.

# सर्वाधिक काळ सेवा देणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या यादीत नितीशकुमार



७४ वर्षांचे नितीश कुमार कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यासोबतच त्यांचा मुख्यमंत्री म्हणून एकूण कार्यकाळ १९ वर्षांचा झाला आहे. त्यामुळे सर्वाधिक काळ सेवा देणाऱ्या राष्ट्रीय आघाडीच्या दहा सरकार प्रमुखांच्या यादीत स्थान मिळवून आणखी एक टप्पा गाठला.

कुमार यांनी पाटण्याच्या गांधी मैदानात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक वरिष्ठ एनडीए नेत्यांच्या उपस्थितीत एका भव्य शपथविधी सोहळ्यात मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली.

१९५१ मध्ये बिहारच्या बख्तियारपूर येथे जन्मलेल्या कुमार यांनी जेपी चळवळीदरम्यान राजकारणात प्रवेश केला. ते जनता पक्षात सामील झाले आणि १९७७ मध्ये त्यांची पहिली विधानसभा निवडणूक अयशस्वी ठरली. त्यांचा पहिला विजय १९८५ मध्ये झाला. त्यांच्या जवळजवळ पाच दशकांच्या राजकीय कारकिर्दीत वारंवार पक्ष बदलल्यामुळे त्यांना पलटू राम असे टोपणनाव मिळाले, तर त्यांच्या सुशासनासाठी त्यांना सुशासन बाबू असेही म्हटले जाते.

नितीश कुमार हे देशातील सर्वाधिक काळ काम करणाऱ्या दहा मुख्यमंत्र्यांच्या यादीत सामील झाले आहेत,

या यादीत सिक्कीमचे पवन कुमार चामलिंग आणि ओडिशाचे नवीन पटनायक यांसारख्या दिग्गजांनी दशकांपासून वर्चस्व गाजवले आहे. ■

**दीर्घकाळ काम करणाऱ्या मुख्यमंत्र्यांची यादी**

| राज्य | मुख्यमंत्री | कार्यकाळ |
|---|---|---|
| १. सिक्कीम | पवन कुमार चामलिंग (२५ वर्षांहून अधिक) | १२ डिसेंबर १९९४ - २६ मे २०१९. |
| २. ओडिशा | नवीन पटनायक (२४ वर्षांहून अधिक) | ५ मार्च २००० - ११ जून २०२४. |
| ३. पश्चिम बंगाल | ज्योती बसू (२३ वर्षांहून अधिक) | २१ जून १९७७ - ५ नोव्हेंबर २०००. |
| ४. अरुणाचल प्रदेश | गेगॉन्ग अपांग (२२ वर्षांहून अधिक) | १८ जानेवारी १९८० - १९ जानेवारी १९९९; ३ ऑगस्ट २००३ - ९ एप्रिल २००७. |
| ५. मिझोराम | लाल थनहवला (२२ वर्षांहून अधिक) | ५ मे १९८४ - २१ ऑगस्ट १९८६; २४ जानेवारी १९८९ - ३ डिसेंबर १९९८ ११ डिसेंबर २००८ - १५ डिसेंबर २०१८. |
| ६. हिमाचल प्रदेश | वीरभद्र सिंह (२१ वर्षांहून अधिक) | ८ एप्रिल १९८३ - ५ मार्च १९९० ३ डिसेंबर १९९३ - २४ मार्च १९९८ ६ मार्च २००३ - ३० डिसेंबर २००७ २५ डिसेंबर २०१२ - २७ डिसेंबर २०१७. |
| ७. त्रिपुरा | माणिक सरकार (१९ वर्षांहून अधिक) | ११ मार्च १९९८ - ९ मार्च २०१८ |
| ८. बिहार | नितीश कुमार (१९ वर्षे) | ३ मार्च २००० ते ११ मार्च २००० २४ नोव्हेंबर २००५ ते २० मे २०१४ आणि २२ फेब्रुवारी २०१५ ते १९ नोव्हेंबर २०२५. |
| ९. तामिळनाडू | एम. करुणानिधी (१८ वर्षांहून अधिक) | १० फेब्रुवारी १९६९ - ३१ जानेवारी १९७६ २७ जानेवारी १९८९ - ३० जानेवारी १९९१ १३ मे १९९६ - १४ मे २००१ १३ मे २००६ - १६ मे २०११. |
| १०. पंजाब | प्रकाशसिंग बादल (१८ वर्षांहून अधिक) | २७ मार्च १९७० - १४ जून १९७१ २० जून १९७७ - १७ फेब्रुवारी १९८० १२ फेब्रुवारी १९९७ - २६ फेब्रुवारी २००२ १ मार्च २००७ - १६ मार्च २०१७. |

# महापालिका प्रारुप मतदार यादीत मोठी गडबड झाल्याची चर्चा

## एका प्रभागातील नावे दुसऱ्याच प्रभागात घुसडल्याचा आरोप

**▶▶ महापालिका निवडणूक कार्यालयात पहिल्या दिवशी एकही हरकत दाखल नाही**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादीत मोठी गडबड असल्याची चर्चा विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. दरम्यान हरकती व सूचना दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी एकही हरकत व सूचना दाखल झाली नाही.महापालिका प्रशासनाने गुरुवारी प्रारूप मतदार यादी जाहीर केली. ही यादी पाहिल्यावर विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी या यादींमध्ये घोळ आपल्याच आरोप केला.

प्रभाग क्र. १२ मधील मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर प्रभाग क्रमांक ९ मध्ये घुसडण्यात आल्याची तक्रार आहे. यामुळे प्रभाग १२ मधील निवडणूक लढण्यासाठी इच्छुकांमध्ये मोठी अस्वस्थता पसरल्याचे चित्र दिसून आले. या संदर्भात हरकत दाखल करणार असल्याचे अभिषेक चिंता यांनी सांगितले. नेमकी अशी चूक कशी झाली? याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.



अनेक प्रभागांच्या मतदार यादीत घोळ आहे. अनेक मतदारांची नावे गडप करण्यात आली असून काही प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्याच प्रभागात समाविष्ट करण्यात आल्याचे तक्रारीवरून दिसून येते.

महापालिकेच्या कौन्सिल हॉलमध्ये मतदारयादी पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली असूननागरिक आणि कार्यकर्ते गुरुवारी आपली नावे तपासताना दिसून आले. विविध प्रभागांमधील मतदारयादी संदर्भात झालेल्या चुका आणि विसंगती पाहता दुरुस्तीची प्रक्रिया कितपत पारदर्शक होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**प्रभाग क्र. १८ च्या सोसायटीतील सुमारे ३५० नावे गायब**

दरम्यान, प्रभाग क्र. १८ मधील एका सोसायटीची संपूर्ण मतदार नावे यादीतून गायब झाल्याचे कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. या सोसायटीमध्ये ३०० ते ३५० मतदार असून ही नावे पूर्णपणे वगळण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप पसरला आहे. मतदार यादी पाहताना अनेक जणांनी ''यादी पाहिली आणि अक्षरशः डोळेच फिरले!'' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# प्रायश्चित्ताची संधी...!

गेल्या जवळपास वर्षभरापासून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसच्या झेंड्याखाली इंडिया आघाडी किंवा महागठबंधन या नावाने एकत्र आलेले भाजपाविरोधी पक्ष यांनी एकमुखाने चालविलेल्या 'मतचोरी' या निरर्थक आरोपाचा गदारोळ थांबवून गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची संधी या आघाडीकडे आता चालून आली आहे. गेल्या सुमारे साडेअकरा वर्षांत देशात आणि वेगवेगळ्या राज्यांत झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये एकामागून एक पराभवाचे फटके बसल्यानंतर कोणत्याही समंजस आणि परिपक्व राजकीय नेत्याने व त्याच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेल्या प्रत्येक राजकीय पक्षाने आत्मपरीक्षण केले असते. पण, राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाने तसेच महागठबंधनातील जवळजवळ सर्वच पक्षांनी डोळ्यावर कातडे ओढून मतचोरीचा एकच मुद्दा सातत्याने लावून धरला आणि जनादेशाच्या जोरावर निवडणुका जिंकलेल्या पक्षांवरील जनतेच्या विश्वासावर प्रश्नचिन्ह उमटवले. लोकशाहीमध्ये जनतेचा कल आणि कौल हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. जनतेने एखाद्या राजकीय पक्षाच्या हाती सत्तेची सूत्रे सोपविली की, त्या पक्षावर जनतेचा संपूर्ण विश्वास आहे, असे मानले जाते. असा जनादेश अन्य सर्व पक्षांनी समंजसपणे स्वीकारावयाचा असतो. मात्र, राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाने किंवा महागठबंधन व इंडिया आघाडी नावाने केवळ भाजपाविरोधाच्या एकाच समान मुद्द्यावर एकत्र आलेल्या पक्षांनी लोकशाहीचा हा संकेत स्वीकारला नाही; जनादेशाचा आदरही केला नाही, असेच त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट झाले. जनतेने प्रचंड विश्वासाने निवडून दिलेल्या भाजपप्रणीत रालोआच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे जनतेचा कौल नाकारण्यासारखेच आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकांमधील निकालातून जनतेने पुन्हा एकदा या खेळात रस नसल्याचा निर्वाळा देऊन महागठबंधनास स्पष्टपणे नाकारले.

आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांची रणधुमाळी सुरू झाली आहे. बिहारच्या निवडणुकीत जनतेने दिलेला स्पष्ट कौल आणि ज्या असमंजस आरोपांच्या आधारावर राजकारण करण्याचा खेळ महागठबंधनाने सुरू केला, त्यामधील फोलपणा स्पष्ट झाल्याने महाराष्ट्रातील महागठबंधनात सहभागी पक्षांस पुरेसे शहाणपण आले असावे, असे दिसत आहे. तसे काही संकेत या आघाडीतील घटक पक्षांच्या भूमिकेवरून मिळू लागले आहेत. मतचोरीचा मुद्दा फोल ठरल्यावर पराभवाची कारणे शोधण्यासाठी आता काही नवा मुद्दा निर्माण करावा लागेल. कारण याआधी मतदान यंत्रे, व्हीव्हीपॅट यंत्रे आदींबाबतच्या शंकांना परस्पर उत्तरे मिळाली आहेत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढविल्यास महागठबंधनातील घटक पक्षांना यशाची खात्री नाहीच; उलट यश मिळण्याबाबत शंकाच वाटू लागली आहे. त्यामुळे आता महागठबंधनाच्या तंबूतून एक एक पक्ष काढता पाय घेऊ लागल्याचेही दिसत आहे. हीच स्थिती महाराष्ट्रातही पाहावयास मिळत आहे. या आघाडीला पहिला रामराम ठोकण्याचा मान समाजवादी पार्टीने पटकावला आहे. महाराष्ट्रात हा पक्ष काँग्रेससोबत निवडणुका लढविणार नाही, हे जाहीर झाले आहे. महाराष्ट्रात याच आघाडीने महाविकास आघाडी या नावाने आपला राजकीय अवतार धारण केला होता. त्याचे नेतृत्व काँग्रेसकडेच होते आणि महायुतीमधून बाहेर पडलेल्या उद्धव ठाकरे यांना या आघाडीचा आयता आधार मिळाल्याने त्यांचा पक्ष काही निवडणुकांत तरला होता. आता या आघाडीतील काँग्रेसनेच उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला झिडकारून टाकले आहे. ठाकरे गटासोबत आघाडी नाही, ही स्पष्ट भूमिका काँग्रेसने घेतली आहे. महाविकास आघाडी खिळखिळी झाली आहे. काँग्रेसकडे स्वबळावर निवडणुका जिंकण्याची ताकद नाही, याची जाणीव या पक्षाच्या नेत्यांनाही आहे. असे असतानाही आघाडीतील एका पक्षास, म्हणजे ठाकरे यांच्या गटास बाहेरची वाट दाखविण्याचे धाडस काँग्रेसने दाखविले आणि स्वबळावर निवडणुका लढविण्याचा पवित्रा घेऊनही, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडीसाठी त्यांची मनधरणी सुरू केली. मतचोरीच्या मुद्द्यावर पुढच्या निवडणुका लढविता येणार नाहीत, याचा साक्षात्कार झाल्याचा हा पूर्ण परिणाम म्हणावा लागेल. राज्यात काँग्रेसकडून हा मुद्दा आता मागे टाकला जाईल, त्याचे अनुकरण करून काँग्रेसच्या राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांकडूनही हा मुद्दा गुंडाळण्यासाठी बेमालूम कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू होतील, असे संकेत मिळत आहेत. या मुद्द्यावरून उभा पक्ष वेठीस धरून राहुल गांधींनी पक्षाचे मोठे नुकसान केले व त्या नकारात्मक राजकारणाचा थेट फायदा मात्र भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीस झाला, अशी कुजबूज काँग्रेसमध्ये सुरू झाल्याची चर्चा आहे. मतचोरीच्या नावाने मोठमोठे गौप्यस्फोट केल्याच्या आविर्भावात राहुल गांधी यांनी समोर आणलेल्या प्रत्येक मुद्द्याचे सनदशीर मार्गाने संबंधित यंत्रणांनी वारंवार खंडन केले होते. या काळात निवडणूक आयोगासह अन्य संबंधित यंत्रणांनी दाखविलेल्या समंजसपणाचे कौतुकच करावे लागेल. कारण अशा निरर्थक व बिनबुडाच्या खेळात स्वतःहून उडी न घेता योग्य वेळी त्यातील फोलपणा दाखवून देत निवडणूक आयोगाने आपल्या भूमिका स्पष्ट केल्याने राहुल गांधी यांचे कथित हॅड्रोजन बॉम्बदेखील निकामी ठरल्याचे स्पष्ट झाल्यावर महागठबंधनास गळती लागणे अपरिहार्य होते.

आता त्यानुसार या आघाडीची घसरगुंडी सुरू झाली आहे. राहुल गांधींनी निवडणुकांच्या तोंडावर निरर्थक आरोपांची राळ उडवून वाया घालविलेल्या वेळामुळे गमावलेल्या संधींचे गाठोडे पुन्हा एकदा नव्याने जोडण्याची जाणीव काँग्रेसजनांस होऊ लागली आहे, असे दिसते. गेल्या वर्षभरात झालेल्या या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी काही पोषक वातावरण तयार होण्याची काँग्रेसजनांस प्रतीक्षादेखील होती. ते वातावरण आता तयार झाले आहे. कालपरवापर्यंत राहुल गांधींच्या आरोपसत्रांतील फोलपणा लक्षात येऊनही तो त्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी व लोकशाही संस्थांविषयी जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याची खेळी योग्य नसल्याचे जाणवून देण्यासाठी पक्षातून किंवा महागठबंधन आघाडीतील कोणीच पुढे येत नव्हते. भाजपकविरोधाच्या व्याधीने ग्रासलेल्या समाजघटकांनीही यावर मौनच पाळून राहुल गांधींच्या भूमिकेचे अंध समर्थन करीत संभ्रमाच्या फुग्यात हवा भरण्याचा उद्योग चालविला होता. समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच त्यासाठी सज्ज ठेवले गेले होते. आता या फुग्यास टाचणी लागली आहे आणि मतचोरीच्या आरोपाची हवा पुरती काढून घेण्याचे कामही सोपे झाले आहे. देशातील समंजस समाजातील काही नामवंत घटकांमधील प्रतिष्ठितांनी पुढे येऊन अखेर या आरोपांचा फुगा फोडण्याकरिता पुढाकार घेतल्याने काँग्रेसजनांनी व महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनीही सुटकेचा निःश्वास सोडला असेल. जे काम पक्षाच्या अंतर्गत मंचावरून व्हावयास हवे होते, त्या कामाची सुरुवात या मान्यवरांनी करून दिली आहे. मतचोरीच्या मुद्द्यावर निवडणूक आयोगावर वारंवार केलेली टीका निरर्थक असून निषेधार्ह आहे, अशा स्पष्ट शब्दांत राहुल गांधी यांना सुनावणारे खुले पत्र देशातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील २७२ नामवंतांनी प्रसिद्ध केले आहे. असे निरर्थक आरोप करून आपल्या राजकीय पराभवाला लोकशाहीवरील संकट असल्याचे भासविण्याचा हा प्रयत्न म्हणजे वारंवार होत राहिलेल्या पराभवातून आलेला हताशपणा असून या पक्षांचे जनतेशी असलेले नाते संपुष्टात आल्याने जनतेच्या अपेक्षा समजून घेण्यात आलेल्या अपयशाचे प्रतिबिंब आहे, अशी भावना या नामवंतांनी या खुल्या पत्रात व्यक्त केली आहे. हे आरोप फोल आहेत, जनतेस ते मान्य नाहीत व जनतेने ते धुडकावून लावले आहेत, याची जाणीव होऊनही तसे उघडपणे बोलण्याचे धाडस दाखविता न आल्याने झालेले पक्षाचे नुकसान भरून काढण्याकरिता चुकांची दुरुस्ती करावी लागते. ती संधी या पत्रामुळे काँग्रेसला मिळाली आहे आणि काँग्रेससोबत असलेल्यांचे महागठबंधनाच्या तंबूतून बाहेर पडून त्या चुकांचे परिणाम भोगण्याचे प्राक्तनही संपले आहे. शुद्ध आणि प्रामाणिक राजकारणाची जुनी परंपरा पुन्हा सुरू करण्याची संधी या निमित्ताने राजकारणास मिळाली, तर ते चांगलेच होईल. ▮

## प्रासंगिक

# श्रीराम मंदिर; राष्ट्रीय संकल्प-सिद्धीची पूर्तता

प्रमोद मुजुमदार

या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याने संपूर्ण देशभर 'शताब्दी वर्ष' साजरे केले जात आहे आणि याच शताब्दी वर्षात अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमीवर भव्य मंदिर पुनर्निर्माण करण्याचा राष्ट्रीय संकल्प पूर्तता समारोह २५ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य संकल्प-सिद्धी सोहळा पूर्ण होत असल्याने याचे एक विशेष महत्त्व आहे आणि योगायोगही आहे. आपणा सर्वांना हेसुद्धा चांगलेच स्मरत असेल की, या मंदिराच्या पुनर्निर्माण कार्याचे भूमिपूजनही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. मंदिराचे बांधकाम इतके युद्धपातळीवर झाले की अगदी नियोजित वेळेनुसार अयोध्या येथे गेल्या वर्षी २२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान मोदी आणि सरसंघचालक डॉ. भागवत यांच्या हस्ते श्रीरामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत संपन्न झाली.

पाहता पाहता आज एक वर्षापेक्षा जास्त झाले आहे. या मंदिराच्या पुनर्निर्माणाचे उर्वरित बांधकाम, परकोटा म्हणजे आजच्या भाषेत कंपाऊंड वॉल आणि आसपासच्या परिसरातील काही प्रमुख मंदिरांचे बांधकामही पूर्ण झाले आहे. गेल्या वर्षीप्रमाणे प्राणप्रतिष्ठा सोहळा जेवढ्या भव्य प्रमाणात आयोजित केला होता तेवढा हा २५ नोव्हेंबरचा सोहळा मोठा नसणार, परंतु पंतप्रधान व सरसंघचालक यांच्या व्यतिरिक्त उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह प्रमुख धर्माचार्य, महंत, विविध संप्रदाय प्रमुख आणि मुख्यत्वे करून पूर्व उत्तर प्रदेशातील सुमारे १० ते १५ हजार लोक या मंदिराच्या पुनर्निर्माण कार्याच्या पूर्तता सोहळ्यास उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सोहळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे श्रीराम मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करून संपूर्ण विश्वाला श्रीराम जन्मभूमीवर मंदिर पुनर्निर्माण कार्याची पूर्णता झाल्याचा संदेश देणे आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज यांनी सांगितले की, मंदिराच्या कळसावर लावला जाणारा हा ध्वज भगव्या रंगाचा असून, त्यावर वाल्मीकि रामायणात वर्णन केलेल्या रघुवंशाचे प्रतीक सूर्य व कोविदार वृक्षाचे प्रतीकही दर्शविण्यात आले आहेत. ध्वजाची लांबी २२ फूट आणि रुंदी ११ फूट असेल. हा ध्वज १६१ फूट उंच शिखरावर लागणार आहे. याप्रसंगी मंदिराच्या बांधकामात अगदी सुरुवातीच्या काळातील मजूर, कामगार, तंत्रज्ञ, अभियंता आदींचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. मंदिरातील रामललाची मूर्ती तयार करणारे कर्नाटकमधील म्हैसूर येथील युवा मूर्तिकार अरुण योगिराज यांचाही गौरव होणार आहे.



श्रीराम जन्मभूमीवर मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्ण होत असताना, यासाठी आपल्या अगोदरच्या पिढीने सुमारे ५०० वर्षे प्रचंड संघर्ष केला, अनेकांनी अन्याय, अत्याचार सहन केला. हा संघर्ष केवळ रस्त्यावर नाही तर न्यायालयातही कित्येक वर्षे चालला होता. रामभक्त हिंदू समाजाला अनेकदा अग्निपरीक्षा द्यावी लागली. प्रामुख्याने संघ परिवाराच्या सामूहिक एकजुटीचे प्रयत्न आणि समाजातील सर्व स्तरांतील घटकांचा भरपूर पाठिंबा यामुळे आज श्रीराम जन्मभूमीवर मंदिराचे पुनर्निर्माण कार्य पूर्ण होत आहे. आज मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्णत्वास पोहोचले आहे तेव्हा याअगोदर विश्व हिंदू परिषदेचे ज्येष्ठ नेते दिवंगत अशोक सिंघल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक मोरोपंत पिंगळे, कारसेवक कोठारी बंधूंसह इतर अनेक ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे स्मरण होणे अगदी स्वाभाविक आहे.

देशवासीयांना व विशेषतः रामभक्तांना मुद्दाम आठवण करून देणे आजच्या दिवशी प्रासंगिक आहे, कारण न्यायालयासमोर कायदेशीर संघर्ष, वाद-प्रतिवाद, तार्किक युक्तिवाद, विचार तर होत होते परंतु त्यासोबत बाहेर सामाजिक स्तरावर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. यात १९८९ मध्ये शिलापूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रत्येकाने एक-एक वीट दिलेली आहे आणि अशा देशभरातून एकत्र करण्यात आलेल्या विटा (शिला) मंदिराच्या बांधकामात उपयोगी पडल्या, हे येथे नमूद करण्यासारखे आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वात १९९० मध्ये सोमनाथ (गुजरात) ते अयोध्या अशी राम रथयात्रा काढण्यात आली. या राम रथयात्रेच्या माध्यमातून देशभरातील वातावरण राममय झाले होते. या अगोदर १९८२-८३ दरम्यान एकात्मता यात्रा देशातील तीन स्थानांहून काढण्यात आली. तीनही यात्रा आपल्या नियोजित कार्यक्रमानुसार एका निश्चित दिवशी नागपुरात पोहोचल्या. अशा काही घटनांमुळे देशांतील सर्व साधारण हिंदू जनमानसामधे प्रभू श्रीराम व आपल्या आराध्यासाठी आस्था, श्रद्धाभाव जागृत होतो. सोबतच हिंदू एकजुटीच्या कार्यक्रमामध्ये समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी आपला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सक्रिय सहभाग घेऊन विश्वास व्यक्त केला. अनेक वर्षे कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने जवळपास ४० दिवस आणि सुमारे १७० तासपर्यंत नियमित सुनावणी केल्यानंतर ९ नोव्हेंबर २०१९ रोजी श्रीराम जन्मभूमी अर्थात रामललाच्या बाजूने निर्णय दिला.

न्यायालयाच्या निकालानंतर मोदी सरकारने वेगाने पावले टाकत एक न्यास (ट्रस्ट) स्थापन केला आणि रामजन्मभूमीवर मंदिराच्या पुनर्निर्माणाचे कार्य वेगाने सुरू झाले. मंदिर परंपरागत नागर शैलीमध्ये बांधण्यात आले आहे. एक महत्त्वाची उल्लेखनीय बाब अशी की मंदिराच्या बांधकामासाठी लागणारा पैसा केवळ कोट्यधीश श्रीमंतांकडून नाही तर देशभर अगदी पंचायत समितीच्या पातळीवर जाऊन जमविला आणि यामुळे येथे दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भाविकाला एक वेगळेच आत्मिक समाधान मिळते. सोबतच आणखी एका गोष्टीची आठवण आपल्या सर्वांना होईल की असाच धनसंग्रह कन्याकुमारी येथे विवेकानंद शिला स्मारक बांधण्यात आले त्यावेळी देखील करण्यात आला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघ परिवारातील सर्व आनुषंगिक संघटनांच्या संयुक्त प्रयत्नाने देशवासीयांनी आपला सहभाग घेतला होता.

आता मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्ण झाले असून या व्यतिरिक्त इतर अन्य कामे जसे परकोटाच्या आतील भागात भगवान सूर्य, भगवती देवी, गणपती व भगवान शंकर याशिवाय माता अन्नपूर्णा, तर दक्षिण बाजूस हनुमानाचे मंदिर बांधून तयार आहे. मंदिर परिसरात निषादराज, शबरी देवी, अहिल्या देवी, संत तुलसीदास, महर्षी वाल्मीकि, वशिष्ठ, विश्वामित्र, अगस्त्य, कुबेर टेकडीवर भगवान शंकराच्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला आहे आणि तेथे जटायूची मूर्ती स्थापित केली आहे. अत्यंत छोटा जीव असलेली परंतु फार महत्त्वाचे अतुलनीय काम करणारी खारूताईची भव्य मूर्ती स्थापित केली आहे आणि ती सर्व भाविकांचे आकर्षण केंद्र बनली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनातून विश्व हिंदू परिषदेने पुढाकार घेऊन हिंदू समाजातील विविध धर्म, मत, पंथ संप्रदायाचे प्रमुख धर्माचार्य, महंताच्या नेतृत्वाखाली रामजन्मभूमी मुक्ती आंदोलन झाले आणि समाजातील सर्व स्तरांतील घटकांचा सक्रिय पाठिंबा मिळाला. हा सक्रिय सहभाग पाहता मंदिर पुनर्निर्माण संकल्पाचे राष्ट्रीय संकल्पामध्ये रूपांतर झाले आणि म्हणूनच यांस राष्ट्रीय संकल्प पूर्तता म्हणणे सर्वथा योग्य व उपयुक्त ठरेल. पाचशे वर्षांच्या संघर्षानंतर आपल्या संकल्पाची पूर्तता होत असल्याचा अनुभव सर्व रामभक्त देशवासीयांना निश्चितच गौरवान्वित करील यात यत्किंचितही शंका नाही. ▮

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# सवय राजीनामा मागण्याची

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मोजकेच बोलतात आणि तेवढेच हसतात! त्यांच्या शेपटावर कोणी पाय देत नाही तोपर्यंत ते आपण बरे आणि आपले राजकारण बरे असा त्यांचा स्थायीभाव! पण, त्यांच्या शेपटाला कोणी स्पर्श केला की, ते कोणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. राज्यात सकाळी उठून सत्ताधाऱ्यांविरोधात टीका करण्यासाठी 'दांडेकर' पत्रकारांना बाईट देणारे खासदार संजय राऊत यांना मुख्यमंत्री फडणवीसांनी 'सकाळी नऊचा भोंगा' अशी पदवी बहाल केली. त्यांना ती तंतोतंत लागू झाली आणि अनेकांना ती भावलीही! संजय राऊत यांच्या खालोखाल सुषमा अंधारे आहेत. पण, त्यांना अजून पाहिजे तसा राजकीय प्रकाश गवसला नाही. राऊत आणि अंधारे या दोघांमध्ये एक नवीन 'धूमकेतू' आहे. राज्यात कुठेही आणि कोणताही विषय राजकारणासोबत जोडून आला की त्या अचानक प्रकटतात! ब्रेकिंगच्या नादात बातमी 'किंग' त्यांच्याकडे जातात. त्याही कोणताही आवाकावा न बघता थेट नेत्यांच्या राजीनाम्याची मागणी करून मोकळ्या होतात. त्या म्हणजे राजीनामा मागण्याची एकप्रकारे सवय असलेल्या अंजली दमानिया! त्या वादग्रस्तच आहेत. राज्यात अनेक नेत्यांचे त्यांनी राजीनामे मागितले. त्या पत्रकार परिषद घेऊन पुरावे देण्याची भाषा करतात. परंतु, त्यांनी अद्याप कोणाचे पुरावे दिले ना कोणाचा विषय तडीस नेला. अंजली दमानिया यांची प्रसार माध्यमांपुढे येण्याची तळमळ बघता त्या विशिष्ट परिस्थितीत आणि विशिष्ट व्यक्तींच्या विरोधात अचानक उगवतात. त्यांनी केलेल्या आजपर्यंतच्या एकाही आरोपात कोणाकडूनही राजीनामा घेतला गेला नाही. तरीही त्या राजीनामा मागण्याचा राग आळविल्याशिवाय राहत नाहीत. त्यामुळे दमानिया कोणाची तरी सुपारी घेतात का, असा प्रश्न उपस्थित होतो. ग्रामीण भागात प्रसिद्धीची खूप हौस असणाऱ्यांना 'छप्पासची बिमारी' असे उपरोधिकपणे म्हटले जाते. असाच काहीसा आजार दमानिया यांना झाला की काय, असे वाटू लागते. राजकारणात प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद आहे. पण, कधी कधी काही प्रश्न इतक्या वारंवार विचारले जातात की, ते अर्थहीन वाटू लागतात. आक्रमक, आवाज उठवणारी आणि हट्टाने लढा देणारी कार्यकर्ती अशी त्यांची काही वर्षांपूर्वी ओळख झाली होती. मात्र, आता त्यांनी 'राजीनामा मागण्याची' चळवळच हाती घेतली की काय, असे वाटून जाते. राजीनामा मागण्याचा प्रवास पार्थ पवार यांच्या जमीन खरेदी प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा इथपर्यंत पोहोचला आहे. त्यांची मागणी कायम एकच- संबंधिताने राजीनामा द्यावा. परिस्थिती बदलली, पण, दमानियांच्या मागणीत बदल झाला नाही. त्यांनी राजीनामा मागितलेल्या नेत्यांची यादीही काही छोटी नाही. त्यांनी अनेकांना टार्गेट केले. अत्यंत ठोस पुरावे आणि गंभीर निष्कर्षाशिवाय दाबून मागणी होत असल्याने त्याचा प्रभावच मंदावत चालला आहे. सतत आणि सर्वांकडून राजीनामा मागितल्याने कुणाचे उत्तरदायित्व खरोखर वाढते की या मागणीचे सामर्थ्यच क्षीण होते? लोकशाहीत टीकाकारांचा आवाज महत्त्वाचा आहे. पण, तो आवाज विश्वासार्हतेवर आणि तर्कांवर उभा असायला हवा. दमानिया यांच्या आवाजात दम आहे, निर्भीडता आहे.☐ पण जेव्हा प्रत्येक प्रकरणाचा शेवट 'राजीनामा' मागणीनेच होतो तेव्हा ती सवय वाटू लागते आणि जनताही त्यांना एवढेच धंदे आहेत, असे म्हणून मोकळी होते. तक्रार, आरोप, चौकशी, निष्कर्ष याशिवाय जर 'राजीनामा' हाच मुद्दा येत असेल तर ही लढाई सत्यासाठीच काय, असा प्रश्न उपस्थित केल्याशिवाय राहणार नाही. अंजली दमानिया यांच्या शैलीतील राजीनाम्याचे सातत्य इतके ठळक झाले आहे की, त्यावर टीका होऊ लागली आहे. प्रश्नांमध्ये तथ्य असतात तेव्हा आवाज प्रभावी असतो. अंजली दमानिया यांच्या आरोपांत विषय असू शकतो, तर्क असू शकतो. पण, त्यांची मागणी जर नेहमी एकाच दिशेने जात असेल तर लोकशाहीकडून अपेक्षित असलेली गंभीरता कमी झाल्याशिवाय राहणार नाही. नेत्यांनी उत्तरदायी असलेच पाहिजे. पण, मागण्यांनाही वजन असलं पाहिजे. अंजली दमानिया आरोपांच्या अखंड मोहिमेतील 'राजीनामा'चा राग गडकरींपासून फडणवीस, शिंदे, दरेकर आणि कालच्या ताज्या घडामोडीत अजित पवारांपर्यंत आवळला असला, तरी त्यांना ना सूर गवसला ना या सवयीवर इलाजही! ▮

९८८१९०३७६५

## विशेष

# कोण फोडेल काँग्रेस... प्रियांका गांधी?

मोरेश्वर बडगे

बिहार निवडणुकीच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांपुढे भाषण केले. या भाषणात मोदींनी एक मोठी भविष्यवाणी केली. 'काँग्रेस पुन्हा एकदा फुटेल' असे मोदी म्हणाले. काँग्रेस केव्हा फुटेल? कोण फोडेल? हे त्यांनी सांगितले नाही. पण मोदी बोलतात तेव्हा त्यांच्याकडे ठोस माहिती असणार. त्या जोरावरच त्यांनी हे संकेत दिले असणार. काँग्रेसमध्ये फूट ही नवी गोष्ट नाही. या आधी पाच वेळा काँग्रेस फुटली आहे. पहिल्यांदा काँग्रेस फोडली ती नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी. १९३९ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून ते निवडले गेले होते. मात्र, नेहरूंची माणसे त्यांना काम करू देत नव्हती. त्यामुळे बोस वैतागून बाहेर पडले. त्यावेळी पहिल्यांदा काँग्रेस फुटली होती. नेताजींनी पुढे स्वतःचा 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा पक्ष स्थापन केला होता. काँग्रेस १४० वर्षे जुनी आहे. या १४० वर्षांत वेगवेगळ्या कारणांनी काँग्रेस फुटली. सध्या मल्लिकार्जुन खडगे अध्यक्ष आहेत, पण पडद्यामागून राहुल गांधीच सारी सूत्रे हलवतात. राहुल गांधी यांच्या संमतीशिवाय काँग्रेसमध्ये पानही हालत नाही. राहुलबाबाच्या नेतृत्वात लोकसभेच्या तीन निवडणुका काँग्रेस लढली. तिन्ही हरले. आता बिहार हरले. त्यांनी काँग्रेसचे काय हाल करून ठेवले आहेत ते देश जाणतो. काँग्रेसवालेही राहुलबाबाला कंटाळले आहेत, पण कोणी हिंमत करीत नाही. शशी थरूर अधूनमधून आवाज उठवतात, पण एकटे पडतात. काँग्रेसला पूर्णवेळ देणारा अध्यक्ष पाहिजे, असे काँग्रेसवाल्यांना वाटते. बिहार निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत राहुल गांधी विदेशात निघून गेले होते. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने हरलेली बिहारची ही ९६ वी निवडणूक आहे. काँग्रेसमध्ये असंतोषाचा ज्वालामुखी धुमसतो आहे; पण बोलणार कोण? त्या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदी यांचे वक्तव्य महत्त्वाचे आहे. काँग्रेस फुटेल असे ते म्हणतात; कोण फोडेल?

गांधी कुटुंबातला माणूसच काँग्रेस फोडू शकतो. दुसऱ्या कोणात ती ताकद नाही. मग कोण आहे तो? एक आहे, प्रियांका गांधी-वढेरा काँग्रेस फोडू शकतात. प्रियांका या राहुल गांधी यांच्या भगिनी आहेत. सुरुवातीपासून प्रियांकाकडे दुर्लक्ष झालं. सोनिया गांधींनी मुलीला मागे ठेवले. राहुल गांधींना पुढे करण्यात आले. राहुलमुळे प्रियांकाला पुढे येऊ दिले गेले नाही. तीन वर्षांपूर्वी त्यांच्याकडे उत्तर प्रदेशची जबाबदारी देण्यात आली होती. तिथे मार मिळाला. त्यांच्या नेतृत्वात उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त दोन जागा मिळाल्या. त्यानंतर त्या रिकाम्याच आहेत. बिहारच्या निवडणुकीतही कुठे चमकल्या नाहीत. म्हणायला त्या काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीस आहेत; पण कुठलीही जबाबदारी नाही. देशातल्या लोकांना प्रियांका गांधींमध्ये इंदिरा गांधींचा भास होतो. राहुलबाबा या आपल्या



लाडक्या बहिणीला पुढेच घुसू देत नाहीत. प्रियांका यांचा पती रॉबर्ट वढेरा यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्यातून ढील मिळाली तर प्रियांका धूम करू शकतात. शेवटी त्यांनाही राजकीय महत्त्वाकांक्षा असणार. लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबात सुरू यादवी आपण पाहत आहोत. तिकडे तामिळनाडूमध्ये करुणानिधी परिवारात घमासान सुरू आहे. आपल्या महाराष्ट्रात काका-पुतण्यातला संघर्ष देशाने पाहिला. अजित पवारांनी काका शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्षच पळवला. मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेपोटी उद्धव ठाकरे यांनी भाजपासारखा विश्वासू मित्र गमावला. तेव्हा राजकीय महत्त्वाकांक्षा अजब चीज आहे. ती काहीही करायला लावू शकते. आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे प्रियांका यांना कळत नसेल का? कळते. पण वळेल तेव्हा काँग्रेसमध्ये महाभूकंप होईल.

महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. २ डिसेंबरला मतदान आहे. दुसऱ्या दिवशी निकाल हाती येतील. काय होणार या स्थानिक पातळीवरच्या निवडणुकांमध्ये? बिहारचा विरोधकांचा अजेंडा इकडे चालेल? मतदार याद्यांमधील घोळाच्या मुद्द्यावर ठाकरे बंधूंनी मुंबईत 'सत्याचा मोर्चा' नावाने एक मोर्चा काढला होता. याद्या दुरुस्त होत नाहीत तोवर निवडणुका होऊ देणार नाही, अशी गर्जना राज ठाकरे यांनी केली होती. तेच ठाकरे बंधू आज निमूटपणे आखाड्यात उतरले आहेत. स्वतःला हास्यास्पद करून घेतले आहे या विरोधकांनी. किती खोटे बोलावं? विश्वासार्हताच गमावून बसले आहेत आजचे विरोधक. विश्वास नसेल तेव्हा निवडणुका जिंकणे अवघड होते. उद्धव ठाकरे यांचेच उदाहरण घ्या. गेली २५ वर्षे मुंबई महापालिका घरची दुभती गाय समजत होते. आज दमछाक सुरू आहे. पाच वर्षांत शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन तुकडे पडले. या दोघांच्या कुबड्या मिळायची मारामार आहे. भाजपाने दोन महिने आधीच निवडणुकीची तयारी सुरू केली. स्थानिक पातळीवर ज्याची ताकद जास्त त्याच्या नेतृत्वात महायुती लढेल, अन्यथा मैत्रीपूर्ण लढती होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेच जाहीर केले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात मित्रपक्षही एकमेकांविरुद्ध लढत असल्याचे चित्र काही जागी आहे. पण निकालानंतर सर्वांनी महायुतीकडेच आले पाहिजे, अशी रणनीती आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक लागायला नवे वर्ष उजाडले असेल. मुंबई महापालिकेची निवडणूक साऱ्याच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केली आहे. राजाचा जीव पोपटात असतो, अशी एक कथा आहे. तसा उद्धव ठाकरे यांचा जीव मुंबई महापालिकेत आहे. प्रथमच त्यांना मोठे आव्हान मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे ९ खासदार निवडून आले होते. विधानसभा निवडणुकीत उद्धवसेना २० जागांवर थांबली. यातले १० आमदार एकट्या मुंबईतून निवडणूक आले आहेत. या अगोदर मुंबईसाठी २०१७ मध्ये निवडणूक झाली होती. तेव्हा युतीचे सरकार होते. पण भाजपा आणि अखंड शिवसेना वेगवेगळे लढले. शिवसेनेला ८४ जागा तर भाजपाला ८२ जागा जिंकता आल्या. मुंबईत एकूण २२७ वॉर्ड आहेत. बहुमतासाठी किमान ११४ नगरसेवक खिशात हवेत. भाजपकने तेव्हा रस दाखवला नाही म्हणून शिवसेनेने मुंबईत महापौर बसवला. यावेळी मात्र सर्कस आहे. महाविकास आघाडीमधला मित्रपक्ष काँग्रेसने स्वबळावर लढायचा निर्णय जाहीर केला आहे. ठाकरे सेनेचे ओझे काँग्रेसने उतरवले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा अद्याप निर्णय व्हायचा आहे. पाच वर्षांपूर्वीची मुंबई आणि आजची मुंबई यात मोठा फरक आहे. आज मुंबईत भाजपाचे १५ आमदार आहेत तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ६ आमदार आहेत. ठाकरे सेनेचे फक्त १०. काँग्रेस स्वतंत्र लढत असल्याने उद्धव राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेऊ पाहत आहेत. सध्या मुंबईत मनसेचा कोणीही आमदार किंवा नगरसेवक नाही. महाराष्ट्र हित, मराठी अस्मिता, ठाकरे ब्रँड या जोरावर ठाकरे बंधू किती जोर मारू शकतील, हा प्रश्नच आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काँग्रेस सोबत असल्याने ठाकरे सेना म्हणजे उबाठाला मुसलमानांची चांगली मतं मिळाली होती. आता ती मिळणार नाहीत. उद्धव यांच्यासाठी हा मोठा खड्डा असेल. राज ठाकरे हा खड्डा किती भरून देतात ते पाहायचे. मुळात राज ठाकरे यांनी अजून भावासोबत युतीची गोष्ट केलेली नाही. जागावाटपात किती आणि कोणत्या जागा वाट्याला येतात, ते पाहून राज ठाकरे निर्णय करतील असे दिसते. जागावाटपावर एकमत झाले नाही तर भावांची युती फिसकटूही शकते? ▮

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-४९

शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५

### चला निघू या सरसावोनी देशाच्या उद्धरणी

चला निघू या सरसावोनी देशाच्या उद्धरणी ॥धृ.॥

विसकटलेले अवघे जीवन, खंत जयांना याची
पडती स्वप्ने उत्थानाची, उज्ज्वल भवितव्याची
जागरूक अभिमानी असले, असती जे जे कोणी ॥१॥

उधानलेल्या जलधीसंगे यावा झंझावात
तशी देउनी पराक्रमाला अभिमानाची साथ
परक्यांची या टाकू पुसुनी येथिल नावनिशाणी ॥२॥

त्रिखंडात दुमदुमुनी जावी जरि राष्ट्राची कीर्ती
कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती
भेद विरावे स्फुरण चढावे नवशुभ आकांक्षांनी ॥३॥

ईर्ष्या अमुची कधी नसावी क्षणिक पुराचे पाणी
कसे व्हायचे अशी नसावी खचलेली जनवाणी
हासत जावे काट्यावरुनी तरुणांनी अनवाणी ॥४॥

उठता आपण नमतिल विघ्ने महाभयंकर आता
काय न केला आपण मर्दन तुंग हिमाचल माथा?
विलंब का मग आणू वैभव लीलेने जिंकोनी ॥५॥

## वाचक पत्रे

### निवडणूक सुरक्षा हीच राष्ट्रीय सुरक्षा

एसआयआर म्हणजे मतदारसूची अद्ययावत करून त्यांना अधिक निर्दोष आणि पारदर्शक करण्यासाठीची राष्ट्रीय मोहीम. बिहारमध्ये ही मोहीम अतिशय यशस्वी ठरली. लाखो अवैध नावे वगळल्याने मतदानाचा टक्का विक्रमी म्हणजे ६६.९० इतका वाढला. एवढे असतानाही अनेक विरोधी पक्ष या मोहिमेला तीव्र विरोध करताना दिसत आहेत. बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांनी या मोहिमेला स्थगिती मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सुद्धा धाव घेतली. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ही मोहीम थांबवण्यास नकार देत लोकशाही टिकवण्यासाठी मतदारसूची शुद्ध ठेवणे अत्यावश्यक असल्याचे ठासून सांगितले. मतदारसूची अद्ययावत् करण्याचे काम मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यावर असते. अनेक राज्यात विशेषतः बंगालमध्ये या अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी मिळत आहेत.

विशिष्ट मतदारांची नावे ठेवणे अथवा वगळणे यासाठी दबाव टाकण्यात येत असल्याची बाब म्हणजे लोकशाही प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप आहे. बंगालमध्ये अनुमाने एक कोटीहून अधिक घुसखोर वास्तव्यास असल्याचे अनेक स्रोत सांगतात. ज्यामुळे मतदारसूचीची शुद्धता राखण्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आज मतदारसूचीची शुद्धता, डिजिटल संरक्षण आणि मुक्त निष्पक्ष मतदान प्रक्रिया या गोष्टी केवळ प्रशासकीय नसून राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. विरोधकांनी राजकीय हेतूपोटी एसआयआरला विरोध करण्याऐवजी लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा आदर करणे अपेक्षित आहे. भारताचा लोकशाही प्रवास मजबूत करायचा असेल, तर मतदारसूची शुद्ध ठेवणे, हिंसाचार रोखणे आणि निवडणूक आयोगावर विश्वास ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संजय चौधरी**/९४२३३००४८५

●● ●●

### माझा भारत खरच महान होईल का?

'मेरा भारत महान' नक्कीच आहे; प्रत्येकाला त्याचा अभिमान वाटला पाहिजे; पण जेव्हा जेव्हा परदेश प्रवासाचा विचार येतो तेव्हा या मंत्राचा खोलवर विचार करावा लागतो. राजा आणि तत्सम व्यक्तींची कार्यशक्ती मानसिकता आणि भारतातील व्यक्ती आणि राजकीय संघटना यांच्या कार्यशक्ती मानसिकतेत खूप फरक आहे. त्यांच्याकडून शिस्त, स्वच्छता, आपुलकी, संस्कृतीचे धडे घेतले, तर मेरा भारत महान म्हणता येईल. आम्ही दारूच्या दुकानांना परवानगी देतो आणि त्या भागात दारूचे एकही दुकान नाही; ते तंबाखू, पान आणि धूर खाऊन रस्ते खराब आणि दुर्गंधीयुक्त करत नाही, कचरा उचलण्याची पद्धतशीर योजना आहे. त्यांच्या कोणत्याही प्रार्थनास्थळावर दानपेट्या नाहीत, पण आमच्याकडे दानपेट्यांची लूट सुरू आहे. वालुकामय क्षेत्रे असून लहान उद्याने आहेत. ही इच्छा आपण भारतीयांपर्यंत पोहोचवू शकत नाही का?

नक्कीच शक्य आहे व होईल सुद्धा; पण स्वातंत्र्यानंतर राज्यकर्त्यांमध्ये देशाचा विकास करण्याची इच्छाशक्ती असती तर भारत अधिक समृद्ध झाला असता. प्रत्येक व्यक्ती भारताला वंदे मातरम् म्हणून सुजलाम सुफलाम म्हणून वंदन करताना दिसली असती, आज तसे होत नाही. मी भारतीय आहे पण वंदे मातरम् म्हणणार नाही असे जेव्हा कोणत्याही धर्माचा, जातीचा राजकीय नेता सहज म्हणू शकतो आणि ते खपवून घेतले जाते तर आपण खरोखर महान कसे होणार? ▮

**अमोल करकरे** /९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### शरद पवार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष निशांत सावळे कार्यकर्त्यांसह करणार भाजप प्रवेश



**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शहर उत्तर मधील शरद पवार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष निशांत सावळे हे शेकडो कार्यकर्त्यासह भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वी माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी आपल्या सहकारी नागरसेवकांसंवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. आता शहर उत्तरमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातील युवक भारतीय जनता पक्षाच्या वाटेवर आहेत, दरम्यान हा प्रवेश झाल्यास शहर उत्तर मधील भारतीय जनता पक्ष आणखी मजबूत होणार आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे यांच्या शहर आणि मतदारसंघ विकासाच्या कामाच्या पद्धतीमुळे सध्या युवकांमध्ये मोठया प्रमाणात क्रेझ असून, अन्य पक्षातील अनेक युवक भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत. येणाऱ्या काही दिवसात श्री. सावळे हे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत.

### जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेची निवडणूक होणार ३० नोव्हेंबरला

सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक दोन मर्यादित सोलापूर संस्थेची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज मागे घेण्याची तारीख १७ नोव्हेंबर पर्यंत होती. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी ९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. तत्पूर्वी दि.१८ नोव्हेंबर रोजी मतदार यादी जाहीर करण्यात आली. पतसंस्थेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष तसेच संचालक मंडळाच्या जागांसाठी दि.३० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. त्याच संध्याकाळी मतमोजणी संपन्न होणार आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गजानन वडेकर यांनी दिली. दरम्यान, पतसंस्थेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु सोलापूर शहर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे सदरची निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. नैसर्गिक आपत्तीमुळे ही निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. आता दिवाळीनंतर पतसंस्थेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक दोन मर्यादित सोलापूर या संस्थेच्या निवडणुकीसाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील निवडणूक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. लवकरच मतदान स्थळ निश्चित करण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले.

### शुध्द ऊर्जा अवलंबनाला गती देण्यासाठी सोलापूरसह तीन जिल्ह्यात एक्स्पीरिअन्स सेंटर्स लाँच

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर -**


सोलापूर महाराष्ट्रातील ग्रामीण उदरनिर्वाहामध्ये शुद्ध ऊर्जेसह परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने पाऊल उचलत कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोन्मेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू) आणि व्हिलग्रो यांचा संयुक्त उपक्रम पॉवरिंग लाइव्हलीहूड्सने नुकतेच महाराष्ट्रातील सोलापूर, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये तीन नवीन एक्स्पीरिअन्स सेंटर्स लाँच केले आहेत. या नवीन लाँच करण्यात आलेल्या केंद्रांना सखी युनिक रिसोर्स एंटरप्राइझ (एसयूआरई)चे पाठबळ असून त्यांच्याद्वारे ऑपरेट केले जातात.एसयूआरई पॉवरिंग लाइव्हलीहूड्स उपक्रमाची प्रत्यक्ष सहयोगी आहे, जेथे हा उपक्रम प्रदेशातील ग्रामीण भागामधील महिलांचे सक्षमीकरण करण्याप्रती सक्रियपणे काम करत आहे. एकत्रित, तिन्ही सेंटर्स १००० हून अधिक गावांपर्यंत पोहोचतील आणि २५० हून अधिक सखी या एसयूआरईद्वारे प्रशिक्षित ग्रामीण स्तरावरील महिला उद्योजकांशी संलग्न होतील, ज्या स्थानिक तंत्रज्ञानाला प्रगत करत आहेत आणि शुद्ध ऊर्जा अवलंबनाचे नेतृत्व करत आहेत. यावेळी महाराष्ट्र स्टेट रूरल लाइव्हलीहूड्स मिशन (एमएसआरएलएम) मधील वनिता डोंगरे (जिल्हा व्यवस्थापक) व गोरक्षनाथ भांगे (लाइव्हलीहूड मिशन मॅनेजर), शुक्राचार्य भोसले (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर), महिला आर्थिक विकास महामंडळ (एमएव्हीआयएम)चे मन्सूर पटेल (मुख्य अधिकारी), राम वखराडे (जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, सोलापूर), शुभदा सुतार (जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर) आणि रांगडे यांची उपस्थिती होती.

# दहा महिन्यात गांजा कारवाईचे ४६ गुन्हे दाखल

## पोलिसांकडून तब्बल ९१ किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर -**

सोलापूर शहरात गांजाची नशा वाढत असून मागील १० महिन्यात पोलिसांत सुमारे ४६ गुन्हे दाखल आहेत. या कारवाईत सोलापूर शहर पोलिसांनी तब्बल ९१ किलो गांजा जप्त केला आहे. त्याची अंदाजे किंमत २० लाखांपर्यंत आहे. चोरी, हाणामारी, शिवीगाळ, कौटुंबिक वादासह इतर किरकोळ गुन्ह्यातील काही संशयित आरोपी गांजाची नशा करतात, असेही आढळून आले आहे.



सोलापूर शहरातील सुपर मार्केट परिसर, भवानी पेठ व अन्य ठिकाणी गांजा मिळतो असे सांगितले जाते. जिल्ह्यातील ग्रामीण भागातून व शेजारील कर्नाटकातून शहरात अवैधरीत्या गांजा विक्रीसाठी येतो. विजापूर नाका, फौजदार चावडी, सदर बझार, जेलरोड, जोडभावी पेठ, एमआयडीसी पोलिसांनी त्यासंदर्भात यापूर्वी कारवाया केल्या आहेत. पोलिसांना त्या कारवायांमध्ये तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आढळला. अल्पवयीन मुलांपासून अगदी खूपच तरुण मुले या अवैध व्यवसायाने बिघडत आहेत.

दुसरीकडे काही दिवसांपूर्वी कर्णिक नगर परिसरातील एका नामांकित महाविद्यालयाजवळ एका तरुणावर पोलिसांनी कारवाई केली होती. त्याच्याकडे एमडी ड्रग्ज सापडले होते. दरम्यान, अवैध ताडी, हातभट्टी दारू, गांजाची नशा करणारे व मावा-गुटखा खाणाऱ्यांची संख्या शहरात लक्षणीय असल्याचे पोलिस खासगीत सांगतात.

**जानेवारी ते ऑक्टोबरपर्यंतची स्थिती**

| | |
|---|---|
| एकूण गुन्हे | - ४६ |
| एकूण आरोपी | - ४९ |
| जप्त केलेला गांजा | - ९१ किलो |
| जप्त केलेले एमडी ड्रग्ज | - २९ ग्रॅम |

**पान टपऱ्यांवर राजरोसपणे गुटखा विक्री**

सोलापूर शहरात सुमारे दहा हजारांवर पान टपऱ्या आहेत. बहुतेक पान टपऱ्यांवर ओला-सुका मावा, गुटखा, पानमसाला विकला जातो. ग्रामीणमध्येही अशीच स्थिती आहे. सोलापूरचा मावा प्रसिद्ध असल्यासंदर्भात सोशल मीडियावर अनेकांचे व्हिडिओ देखील पाहायला मिळतात. वास्तविक पाहता महाराष्ट्रात २०१२ मध्येच गुटखा विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. दुसरीकडे शाळा-महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरात गुटखा विक्री नकोच म्हणूनही निर्बंध आहेत. तरीदेखील त्याचे पालन होत नसल्याची वस्तुस्थिती सोलापूर शहर-जिल्ह्यात पाहायला मिळते.



## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने ज्येष्ठांसाठी मार्गदर्शनपर शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर -**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व माननीय महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी 'Awareness {rogram of maintenance and welfare of {arents and senior citizens act, 2007' या विषयावर कायदेविषयक जनजागृती शिबिर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर यांचे अध्यक्षतेखाली पार पडली.

या शिबिरात ज्येष्ठ वकील लक्ष्मण मारडकर यांनी पालक व ज्येष्ठ नागरिक यांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम २००७ बाबत मार्गदर्शन केले तसेच विलास मोरे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक संघ शिखर समिती यांनी ज्येष्ठ नागरिकानी कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा न्यायालयाचे माजी प्रबंधक व सोलापूर राष्ट्रवादी ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष दौलत सिताफळे व ज्येष्ठ नागरिक संघ, शिखर समितीचे अध्यक्ष विलास मोरे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. किणगी व आभार प्रदर्शन अँड रेवण पाटील यांनी केले. कार्यक्रमास सुनील दावडा, बळीराम पावडे, बासुदे, पी. के. जाधव, एम. बी. कदम, ससाणे, गुंजाळ, विठ्ठल टकले, हत्तुरे वगैरे ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## ॲट्रॉसिटी प्रकरणातील आरोपीला बार्शी न्यायालयाकडून जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२० नोव्हेंबर-**

टेंभुर्णी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दाखल प्रकरणातील आरोपी श्रीकृष्णा पंडित जगताप (वय ४४, रा. कन्हेरगाव, ता. माढा) यांना बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने हा आदेश दि. १८ नोव्हेंबर रोजी दिला. या प्रकरणात टेंभुर्णी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता. ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत आरोपीवर कारवाई करण्यात आली होती. आरोपीच्या वकिलांनी दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. जामीन मंजूर करताना न्यायालयाने आरोपीने कोणत्याही नवीन गुन्ह्यात गुंतू नये यासाठी अटी लावल्या आहेत. तसेच आरोपीने सुनावणीसाठी दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. योगेश साखरे आणि ॲड. भैरुनाथ चव्हाण यांनी बाजू मांडली.




# औराद संजवाड पुल बनला धोकादायक

## पुलाची दुरूस्ती करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद संजवाड येथील सीना नदीवरील पूलाजवळ दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे धोकादायक अवस्थेत आहे. महापुरामुळे पुलावरील दोन्ही बाजूचे लोखंडी सुरक्षा अँगल (संरक्षक कठडे) वाहून गेले असून पुलावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. तसेच, पुलाच्या दोन्ही बाजूचे जोड रस्ते खचले असल्याने या मार्गावरील प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

हा पूल औराद आणि संजवाड या दोन गावांना जोडतो. त्यामुळे या मार्गावरून दिवस-रात्र अवजड वाहनांची वर्दळ असते. ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर आणि एनटीपीसी राख वाहतूक करणारे मोठे डंपर यासह इतर अवजड वाहने सातत्याने या पुलावरून जातात.

गेल्या वर्षी बसवलेले लोखंडी संरक्षक कठडे अतिवृष्टीच्या महापुरात वाहून गेल्याने पुलाला सध्या कोणतेही संरक्षण नाही. या बंधाऱ्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत.

चारचाकी वाहने जाताना दुचाकीस्वारांना बाजूला थांबणेही धोकादायक बनले आहे. या गंभीर स्थितीमुळे परिसरातील नागरिक आणि वाहनधारक त्रस्त झाले आहेत. पुलाची दुरवस्था आणि सुरक्षेचा अभाव पाहता, ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून दुरुस्तीची मागणी होत आहे.

**संरक्षक कठडे बसवावेत**



''येथील वाहतूक दिवसेंदिवस वाढत आहे, मात्र ती धोकादायकपणे सुरू आहे. प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने कोणताही मोठा अपघात होण्याची वाट न पाहता, लवकरात लवकर पुलाची दुरुस्ती करून संरक्षक कठडे बसवावेत.''

**-रामचंद्र बिराजदार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष, संजवाड**

## काडादी प्रशालेच्या माजी विद्यार्थी संघाकडून वडकबाळच्या गोशाळेला पत्रे भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

अण्णप्पा काडादी हायस्कुल एस. एस. सी. १९७४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी अतिवृष्टी ग्रस्तांना मदतीसाठी संकलित केलेल्या निधीतून सेवा भारतीच्या माध्यमातून वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळेस टाटा कंपनीचे २१ लोखंडी पत्रे गोशाळेच्या अध्यक्षा उमा बिराजदार यांचेकडे देण्यात आले.

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सीना नदीला आलेल्या महापुरात वडकबाळ येथील गोशाळेचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई मिळाले नसले तरी या गोशाळेच्या पुनर्वसनाचे काम चालू आहे. याच कामात मदतीचा हात देण्यासाठी काडादी हायस्कूल सोलापूरच्या एस.एस. सी. १९७४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला .

यावेळी माजी विद्यार्थी प्रतिनिधी पदम राका,बंडू अनाळकर, अप्पू पाटील, शिरीष गांधी तसेच संघ परिवाराचे राजेंद्र काटवे, सेवा भारतीय सोलापूर जिल्हा शाखेचे पदाधिकारी प्रविण तळे, शिरीष गोळवलकर, संगप्पा शरणार्थी आणि गोशाळेचे संस्थाचालक रुद्रप्पा बिराजदार उपस्थित होते.



सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून या माजी विद्यार्थी वर्ग मित्रांनी एकत्र येत अतिवृष्टी ग्रस्तांना सहाय्यासाठी एक लाख ३५ हजारांचा निधी संकलित केला होता. त्यातून गेल्या महिन्यात जिल्हा परिषद शाळा, औराद येथील पहिली ते चौथीच्या १७५ पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दप्तरासह शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले असून त्याकरिता एक लाख रुपये खर्च झाला होता.उर्वरित रकमेतून या गोशाळेला मदत करण्यात आली.

या संघटनेने यापूर्वीही काडादी शाळेच्या विकासासाठी गणित प्रयोगशाळा, ग्रंथालय व क्रीडा साहित्यांची दुरुस्ती, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदि माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री चंद्रशेखर इंडी, श्रीनिवास भुतडा, संजीवनी साबळे, शैलेश पटेल आदिंनी परिश्रम घेतले.



## छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने शहिद टिपू सुलतान जयंती साजरी

**२७५ गरजूंना चादर वाटप**

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूरच्यावतीने शहिद टिपू सुलतान यांच्या २७५व्या जयंतीनिमित्त टिपू सुलतान चौक येथे शिवजन्मोसत्व मध्यवर्ती महामंडळ विश्वस्थ पद्माकर काळे, परिवहन समितीचे सभापती राजन जाधव, सकल मराठा संघटनेचे माऊली पवार, मराठा सेवा संघाचे राम गायकवाड, शिवालय सामाजिक संघटेचे संस्थापक प्रकाश शिंदे, मातंग कृती समितीचे अध्यक्ष युवराज पवार, सुरेश ननवरे, मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे, राजा बागवान, लतीफ शाब्दी, सैफूदिन मनियार, हारुण शेख यांच्या प्रमुख उपस्थित टिपू सुलतान यांच्या नामफलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी टिपू सुल्तानच्या २७५ व्या जयंतीनिमित्त २७५ गरिब गरजूंना चादर वाटप करण्यात आले.

# संशोधन, उद्योग व नवकल्पनांना संरक्षणाची दिशा

## सिंहगडमध्ये आंतरराष्ट्रीय आयपीआर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात ''बौद्धिक संपदा हक्क : पेटंट आणि त्यापलीकडे एक सूक्ष्म समज'' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक आणि उद्योजक यांच्याकडून मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविण्यात आला.

कार्यशाळेचे प्रमुख अतिथी डॉ. उमेश बनकर (बनकर कन्सल्टिंग सर्व्हिसेस, गोवा) यांनी पेटंटची मूलभूत तत्वे, पेटंटयोग्यता, संशोधनाचे आविष्कारात रूपांतर, पेटंट क्लेम कन्स्ट्रक्शन तसेच एआय आणि आयपी यातील परस्परसंबंध यावर सखोल मार्गदर्शन केले.

या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत ओमान, तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधील एकूण १०६ जण सहभागी उपस्थित होते. पेटंट प्रक्रियेत केवळ बाजारपेठेची दृष्टी पुरेशी नसून तंत्रज्ञान, नवकल्पना आणि व्यवसाय यांचा योग्य समन्वय आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी तसेच वैज्ञानिकांसाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली आहे.



**पेटंटबिलिटी : काय पेटंट होऊ शकते ?**

कार्यशाळेत बौद्धिक संपदा क्षेत्रातील अद्यावत माहिती, संकल्पना आणि अभ्यास सत्रे अनुभवता आली. नवीन तंत्रांकडे, कायदेशीर बाबीकडे आणि व्यावहारिक ज्ञानाकडे पाहण्याची आणि शिकण्याची संधी या उपक्रमात मिळाली. बौद्धिक संपदा हक्कांची मूलभूत माहिती, पेटंटबिलिटी : काय पेटंट होऊ शकते? वैज्ञानिकांच्या दृष्टिकोनातून संशोधनाचे रूपांतर पेटंट प्रणाली या विषयी सविस्तर माहिती मिळाली.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, सीआरटीडीचे डायरेक्टर डॉ. एस. एच. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रथमवर्ष विभागप्रमुख प्रा. के. एस. पाटील, संयोजक डॉ. आय. एम. चंदरकी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्या प्रयत्नाने यशस्वी झाली.

समारोप सत्रात सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थी, संशोधक आणि उद्योजकांच्या बौद्धिक संपदा हक्काविषयीची समज वाढून नवकल्पना, संशोधन व व्यवसाय सुरक्षित ठेवण्यास निश्चितच मदत लाभणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मानसी जाधव यांनी केले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय स्टोअर ऑफिस मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहे. निविदा क्रमांक 96255634. वर्णन: आरडीएसओ डीआरजीला पीएससी स्लीपरवर बीजी (1673 मिमी) 60 किलोसाठी 6400 मिमी ओ/आर (वक्र) पंख्याच्या आकाराचे स्विच 1 इंच 8.5, टी/आउटचे उत्पादन आणि पुरवठा. क्रमांक टी-4966 पर्यायी 7. प्रमाण: 30 संच. बयाणा रक्कम (INR): रु. 2,50,560/-. www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 01.12.2025 रोजी 11.30 नंतर. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**सीनियर डिव्हिजनल मटेरियल मॅनेजर**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-73

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. 1. ई-टेंडर सूचना क्रमांक: 42-2025-SrDENC. कामाचे नाव: KWV-MRJ मध्ये LC 31,70 आणि SUR-WD विभागात LC 03 वर रबरीकृत तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 89,45,687.25. बयाणा रक्कम: 1,78,900/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 महिने. देखभाल खर्च: 60 महिने. 2. 43-2025-SrDENC. कामाचे नाव: LUR-KWV, KWV-MRJ, BRB-KWV विभागातील विविध रेल्वे वसाहती, कार्यालये आणि सेवा इमारतींमध्ये वनस्पती आणि जंगल साफसफाईचा प्रस्ताव दोन वर्षांसाठी वर्षातून दोनदा Sr. DEN (C) SUR अंतर्गत. कामाची अंदाजे किंमत: 2,55,56,017.28. बयाणा रक्कम: 2,77,800/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी 24 महिने. देखभाल कालावधी: Nil. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 08/12/2025 दुपारी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 08/12/2025 दुपारी 15.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्कस्)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-74

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे पांगरी, शहर बार्शी, ता बार्शी व जि. सोलापूर येथील आणि आसपासचे परिसरातील लोकांना कळिवण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. सोलापूर, सब डी. ता. बार्शी, पैकी मौजे पांगरी (५६२०४६) येथील ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत क्र. १८६५ आहे. याचे क्षेत्रफळ ४६५.१ चौमी (५००० चौफुट) आहे. सदर मिळकत ही रहिवासी असून त्याचा प्लॉट क्रमांक ४ आहे व तो गट क्रमांक १५/१ मधील आहे. याचे मोजमाप पुर्व-पश्चिम बाजू :- ५० फुट, दक्षिण उत्तर बाजू: १०० फुट आहे, यासी चतुःसिमा पुर्वेसः बाशा व मुसा आतार, दक्षिणेसः ग्रामपंचायत जागा, पश्चिमेस : आकलाक महमद पठाण, उत्तरेस : लातूर रोड आहे. याचे पाणी व वागणुक उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. सदर मिळकती मधील आरसीसी बांधकाम याचे क्षेत्रफळ ९१.१६ चौमी (९८० चौफूट) आहे. येणेप्रमाणे चतुः सिमा पूर्वक ग्रामपंचायत मिळकत आतिल दगड, माती वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह जाणेयेणेचे वहिवाटीचे हक्कासह मिळकत. यासी ७/१२ प्रमाणे गट न. १५/१ असा आहे. ७/१२ उताऱ्या प्रमाणे क्षेत्रफळ ४४५.०० चौमी आहे.

सदरचा प्लॉट (मिळकत) हा श्री प्रकाश उर्फ रोहिदास शांतीनाथ नारकर याचे प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे व सदर मिळकतीच्या ७/१२, ८अ (खाते क्र. ११८३५) व ग्रामपंचायत हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचा प्लॉट ते विक्री करू इच्छितात. सदर प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किमत देऊ केलेने श्री प्रकाश उर्फ रोहिदास शांतीनाथ नारकर यांनी सदरचा प्लॉट विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम रोख स्वरुपात स्वीकारली आहे व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशीला बरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाचे आत आमचे अशिल यांचे वकिल म्हणून आमच्याकडे खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क साबीत व सिद्ध करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लेअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. २०/११/२०२५.

**सही/-**
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर**
ऑफिस पत्ता: गाळा नं. २७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, भीम नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर,
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### डेफलिम्पिक : गोल्फमध्ये दीक्षाने जिंकले सुवर्णपदक

**टोकियो** : भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने शेवटच्या फेरीत ११ अंडरचा उत्कृष्ट गुण मिळवत मोठ्या फरकाने विजय मिळवला व येथे आयोजित डेफलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. २०१७ च्या डेफलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २४ वर्षीय गोल्फर दीक्षाने आपल्या कौशल्यपूर्वक खेळाच्या बळावर वाकासू गोल्फ लिंक्समध्ये अव्वल स्थान पटकावले. भारतीय खेळाडूने पहिल्या दिवशी चार अंडर ६८ गुण मिळवले होते, जे २१ खेळाडूंच्या क्षेत्रात एकमेव उप-समान गुण होते. २०१८ च्या जकार्ता येथील आशियाड स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरलेली आणि त्यानंतर एका वर्षानंतर १८ व्या वर्षी लेडीज युरोपियन टूर जिंकणारी अदिती अशोक नंतरची दुसरी भारतीय महिला गोल्फर ठरली. तिने दुसऱ्या फेरीत ११ अंडरचा शानदार शॉट मारला आणि मैदान गाजविले. टोकियो येथे २०२० च्या ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय गोल्फ महासंघाकडून अचानक आमंत्रण मिळालेल्या या भारतीय खेळाडूने ११ अंडरचा आणखी एक अद्भूत शॉट मारला आणि ५४ होलमध्ये २६ अंडरचा शॉट मारला.



# गिल दुसऱ्या कसोटीला मुकणार; पंत कर्णधारपदी



♦ **गुवाहाटी, २० नोव्हेंबर**

शुभमन गिल गत आठवड्यात कोलकाता येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात झालेल्या मानेच्या दुखापतीतून पुरेसा सावरला नसल्यामुळे तो शनिवारपासून गुवाहाटी येथे सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीला मुकणार आहे. उपकर्णधार ऋषभ पंत कर्णधारपदी राहील.

वैद्यकीय सल्ल्यानुसार, जर गिल इतक्या लवकर खेळला तर त्याला पुन्हा मानेच्या दुखापतीचा त्रास होण्याचा धोका जास्त आहे असे समजते. त्याला अधिक विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. या घटनेमुळे ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांसाठी त्याच्या एकदिवसीय संघातील निवडीवरही परिणाम होऊ शकतो. त्या मालिकेसाठी संघाची निवड २३ नोव्हेंबर रोजी होण्याची अपेक्षा आहे.

गिलला संधी न मिळाल्याने, भारताला त्याच्या जागी साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल आणि नितीश कुमार रेड्डी यांच्यापैकी एकाची निवड करावी लागेल.

कोलकाता कसोटीच्या दुसऱ्या दिवशी गिलला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. भारताच्या पहिल्या डावात केवळ तीन चेंडू खेळल्यानंतर त्याने जखमी निवृत्त होण्याचा निर्णय घेतला होता. गिल दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळणार नाही, असे बीसीसीआयने सकाळी सांगितले.

१२४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना असमान उसळी असलेल्या खेळपट्टीवर ९३ धावांवर बाद झाल्यानंतर भारताने ३० धावांनी सामना गमावला. गिलने ऑक्टोबर २०२४ मध्ये मानेच्या दुखापतीमुळे न्यूझीलंडविरुद्धची कसोटी गमावली होती. (वृत्तसंस्था)

### गिलची तंदुरुस्ती चाचणी आज

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात मानेला झालेल्या दुखापतीमुळे शुभमन गिल सराव करू शकलेला नाही, तो दुसऱ्या सामन्यासाठी उपलब्ध होण्यासाठी शेवटच्या प्रयत्नात शुक्रवारी फिटनेस चाचणी घेणार आहे, असे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी संकेत दिले आहेत.गिलला पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी हा त्रास झाला आणि त्यानंतर तो नेटमध्ये परतला नाही. त्याच्या शक्यता कमी असल्या तरी, बीसीसीआय क्रीडा विज्ञान चमू अंतिम निर्णय घेण्यापूर्वी शक्य तितका वेळ वाट पाहत आहे. दुसरी आणि शेवटची कसोटी शनिवारी सुरू होत आहे.पाहा, गिल निश्चितच बरा होत आहे, कारण मी काल त्याला भेटलो होतो, असे कोटक म्हणाले.

आता निर्णय शुक्रवारी सायंकाळी घेतला जाईल, कारण तो पूर्णपणे बरा झाला तरी, सामन्यादरम्यान पुन्हा दुखापत होण्याची शक्यता आहे का हे फिजिओ आणि डॉक्टरांनी ठरवायचे आहे. ते खूप महत्वाचे आहे, असे ते म्हणाले. गिल आणखी एका सामन्यासाठी विश्रांती घेईल याची मला खात्री आहे. त्याच्यासारखा खेळाडू व तो कर्णधार आहे म्हणून कोणत्याही संघाला त्याची उणीव भासेल, असेही ते म्हणाले.

जर गिल दुखापतीमुळे खेळत नसेल, तर आपल्याकडे बरेच पर्यायी चांगले खेळाडू आहेत व त्यांनी संघासाठी उत्तम कामगिरी करावी, असे कोटक म्हणाले. गिलच्या तंदुरुस्ती चाचणीनंतरच संयोजनांवर चर्चा केली जाईल.

# आयुष शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत; एच. एस. प्रणॉय बाहेर

**ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन**




♦ **सिडनी, २० नोव्हेंबर**

युवा भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने उच्च मानांकित जपानी प्रतिस्पर्धी कोडाई नाराओकाविरुद्ध सरळ गेममध्ये विजय मिळवत ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर वरिष्ठ खेळाडू एच. एस. प्रणॉय गुरुवारी येथे लवकर स्पर्धेतून बाहेर झाला.

**सात्त्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत**

सात्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या अव्वल मानांकित भारतीय पुरुष दुहेरी जोडीनेही चीन-तैपेईच्या सु चिंग हेंग आणि वू गुआन झुन यांच्याविरुद्ध ३७ मिनिटांत २१-१८, २१-११ असा सहज विजय मिळवत अंतिम आठमध्ये स्थान मिळवले. या वर्षाच्या सुरुवातीला योनेक्स अमेरिकन ओपन सुपर ३०० स्पर्धेचा विजेता आयुष शेट्टीने ६८ मिनिटांत चौथ्या मानांकित नाराओकाचा २१-१७, २१-१६ असा पराभव केला. या वर्षी जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकावर असलेल्या जपानी खेळाडूविरुद्धचा हा त्याचा दुसरा विजय होता आणि त्याने त्याचा देशाच्या लक्ष्य सेनसोबत उपांत्यपूर्वक्वार्टरफायनलमध्ये सामना खेळला. तथापि, या वर्षी उप-उपांत्यपूर्व फेरीच्या प्री-क्वार्टरफायनलच्या पुढे न पोहोचलेला प्रणॉय आठव्या मानांकित वआणि माजी कनिष्ठ विश्वविजेता ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन इंडोनेशियाच्या न फरहान अल्वीशी बरोबरी करू शकला नाही. त्याने ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या सुपर ५०० स्पर्धेत ४२ मिनिटांत १९-२१, १०-२१ असा पराभव केला.

बुधवारी, आशियाई खेळांचा कांस्यपदक विजेता व आणि २०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता ३३ वर्षीय प्रणॉयला जागतिक क्रमवारीत ८५ व्या क्रमांकावर असलेल्या योहानेस सौत मार्सेलीनोने ६-२१, २१-१२, २१-१७ असा विजय मिळवला.

या वर्षी हाँगकाँग ओपनमध्ये नारोकाला हरवणाऱ्या शेट्टीला उच्च मानांकित जपानी जोडीने जोरदार टक्कर दिली कारण आघाडी बदलत राहिली. त्यानंतर १८-१७ अशी आघाडी असलेल्या भारतीय जोडीने उर्वरित तीन गुण मिळवून पहिला गेम जिंकला. जपानी जोडीने १४-१४ पर्यंत शेट्टीसोबत खेळ सुरू ठेवला असला तरी दुसरा गेम स्पष्टपणे एकतर्फी होता. त्यानंतर भारतीय जोडीने काही गुणांनी खेळ वाढवत सलग पाच गुण जिंकून १९-१४ अशी आघाडी घेतली आणि शेवटी सामना संपवला.सात्त्विकत्विक-चिराग जोडीची उपांत्यपूर्व फेरीत पाचव्या मानांकित इंडोनेशियन जोडी फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिक्रीशी लढत होईल. (वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय पॅरा जलतरणात शश्रुती नाकाडेला ५ सुवर्ण



**अर्जुनी मोर** : तालुक्यातील नवेगावबांध येथील शश्रुती विनायक नाकाडे हिने हैदराबाद (तेलंगणा) येथे १५ ते १८ नोव्हेंबरदरम्यान घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत ५ सुवर्ण पदके प्राप्त करीत नेत्रदीपक यश मिळविले आहे. शश्रुतीने वैयक्तिक प्रकारात तब्बल ३ सुवर्णपदके पटकावित आपली नैसर्गिक प्रतिभा, मेहनत आणि जिद्द सिद्ध केली. तसेच सांघिक प्रकारात आणखी २ सुवर्णपदके जिंकत महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. जलतरण क्षेत्रात सातत्याने उत्तुंग झेप घेत असलेल्या शश्रुतीचे प्रशिक्षक व कुटुंबीय यांनी तिच्या यशाबद्दल कौतुक केले आहे. या पाच सुवर्णपदकांनी शश्रुतीने भविष्यातील आंतरराष्ट्रीय पॅरा स्पर्धांसाठी आपली दावेदारी निश्चित केली आहे.

# अंत्रोळी, वडापूर, अकोले, मनगोळी, येळेगाव, गावडेवाडी शाळांची सलामी

## कंदलगाव येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

इंडियन पब्लिक स्कूल कंदलगाव येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेस सुरुवात झाली. सलामीच्या दिवशी अंत्रोळी, वडापूर, अकोले, मनगोळी, येळेगाव व गावडेवाडी या शाळांनी सांघिक स्पर्धेत विजयी सलामी दिली.

या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य अशोक कोळेकर व मुख्याध्यापिका मोनिका सुरवसे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विस्तार अधिकारी आयुब कलबुर्गी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे, राष्ट्रीय खो खो पंच श्रीरंग बनसोडे, राजेंद्र कांबळे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. धुमाळी, प्रभाकर इंगळे, मधुकर राठोड, रमेश राठोड, रमेश घंटेनवरु, पंडित साबा आदी उपस्थित होते. या स्पर्धेत खोखो, कबड्डी, लंगडी, छोटा व मोठा गट मुले मुली या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या.





## राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी 'नेताजी'च्या हडपदची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० नोव्हेंबर-**

बारामती येथे होणाऱ्या राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयातील शिवा हडपद याची निवड झाली.

पुणे येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत हडपद याने तृतीय स्थान मिळविले. त्यास क्रीडा विभाग प्रमुख विठ्ठल कुंभार, सुरेश बिराजदार, अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आंळगे आंदीनी अभिनंदन केले.



### संगमेश्वर कॉलेजच्या दोघींची राज्य टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

शालेय विभागीय लॉन टेनिस स्पर्धेमध्ये आकृती सोनकुसरे, भक्ती जाधव यांनी अनुक्रमे द्वितीय व पाचवा क्रमांक संपादिला. या कामगिरीवर दोघींची लातूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद चव्हाण ,शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते , प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आंदींनी अभिनंदन केले.



## संगमेश्वर रात्र महाविद्यालयाची महाविद्यालयीन कुस्ती व वेटलिफ्टींग स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

अंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या मल्लांनी कामगिरी केली. मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेत अभिजीत लिंबाजी जाधव याने ६१ किलो वजनी गटात फ्री स्टाईल या कुस्ती प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच अकलूज येथे झालेल्या महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत अंजनकुमार श्रीनिवास पोतराज याने ६७ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक संपादिला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शरण वांगी तसेच जिम खाना विभाग प्रमुख डॉ.आनंद चव्हाण, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. संतोष खेंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. एस. डी गोठे, प्राचार्य डॉ.आर. पी. बुवा आदींनी अभिनंदन केले.

## व्हॅलेंटाईन स्कूलच्या तिघांची विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

शालेय शहर स्केटिंग स्पर्धेतून व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या तिघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. इनलाईन स्केटिंग व क्वाड स्केटिंग मध्ये लास्या शेरला, वसुधा सब्बन व हर्षा सब्बन हे निवडलेले विद्यार्थी आहेत. त्यांना क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव व शिवाजी आवताडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा आदींनी कौतुक केले.



### मॉडेल स्कूलच्या मानस गायकवाडची शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

सातारा येथे झालेल्या राज्य बुद्धिबळ स्पर्धेत मॉडेल पब्लिक स्कूलच्या मानस गायकवाड याने १७ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक पटकविला. या कामगिरीवर त्याची त्रिपुरा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास प्रशिक्षक सुमुख गायकवाड, उदय वगरे व क्रीडा शिक्षक रविकिरण आवटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

### 'वालचंद'च्या हर्षदा गोली हिची महाराष्ट्र संघात निवड

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**



राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या हर्षदा गोली हिने एक मीटर स्प्रिंग बोर्ड, तीन मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड या तिन्ही प्रकारांमध्ये रौप्यपदक पटकावले. तिला क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. या कामगिरीवर तिची दिल्ली येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली. तिचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्यअनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.



## 'वालचंद'च्या नांदुरकर, कुडगुंटी यांना राज्य तलवारबाजी स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

राज्य अंतर शालेय तलवारबाजी स्पर्धेमध्ये वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या नंदिता नांदुरकर हिने सेबर प्रकारात व हर्ष कुडगुंटी याने इपी प्रकारात रौप्यपदक संपादिले. त्यांना क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.

# अण्णाप्पा काडादी प्रशालेस तिहेरी मुकुट

## शालेय शहर टेनिक्वाईट स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

शालेय शहर टेनिक्वाईट स्पर्धेत के.ल.ई सोसायटी संचलित,अण्णाप्पा काडादी प्रशालेने तिहेरी मुकुट संपादिला. राजीव गांधी इंडोर स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेत प्रशालेने १४ वर्षाखालील मुले आणि १७ व १९ वर्षाखालील मुलींच्या गटात ही कामगिरी केली.

यशस्वी संघास क्रीडाशिक्षक नागप्पा मैंदर्गी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे के.ल.ई सोसायटी चेअरमन प्रभाकर कोरे, शालेय नियामक मंडळाच्या अध्यक्षा सिंधुताई काडादी, मुख्याध्यापक अनिल पाटील, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील यांनी अभिनंदन केले.

**विजेते संघ** : **१४ वर्षाखालील मुले** : रुद्र सुरवसे(कर्णधार),श्रीराज स्वामी, रेहान नदाफ,अभय भास्कर,यशवंत मग्रुखाने,अनुप थोरात. **१७ वर्षाखालील मुली** : अल्पिया शेख(कर्णधार),साक्षी डोळसे,संजना गुडे,वैभवी अवताडे,श्रावणी लंकेश्वर,ऋतुजा कांबळे.

**१९ वर्षाखालील मुली** : पल्लवी मिनकेरी(कर्णधार), आकांक्षा गुरुविनमठ, वैष्णवी ढाले, दीपमाला सोनवणे, साधना इब्रामपूर, पृथ्वी कोळी.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### होटगी स्टेशन ग्रामपंचायतीच्या वतीने विविध विकास कामांचे भूमिपूजन


**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

होटगी स्टेशन ग्रामपंचायत तालुका दक्षिण सोलापूर येथे गुरुवारी विविध विकास कामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. गावच्या सर्वांगिण विकासासाठी गावात मूलभूत सेवा सुविधा निर्माण करण्यासाठी रस्ते, गटारी, विजेचा डिपी, शाळा, शौचालय, स्मशानभूमी दुरुस्ती आशा कोट्यावधी रुपयांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. होटगी स्टेशन येथे जिल्हा परिषदेच्या विविध योजना, तसेच ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नातून आणि विविध आम दार, खासदार तसेच सीएसआर फंडातून अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये कॉंक्रीट रस्ता, शाळेत शौचालये बांधणे, पेव्हर ब्लॉक टाकणे, चर्च परिसरात पेव्हर ब्लॉक टाकणे, अहिल्यादेवी समाज मंदीर आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज मंदीरांची दुरुस्ती करणे अशी जवळपास १० कामांचे भूमिपूजन एकाच वेळी करण्यात आले. यावेळी सरंपच निलम भोसले, बाजार समितीचे संचालक तथा उपसरंपच सुभाष पाटोळे, ग्रामपंचायत सदस्य मिना पोरे, गायत्री ठक्के, जिजाबाई वाघमोडे, मोहतब्बी शेख, फातीमा नदाफ, ग्रामसेवक कांतु राठोड, नंदा कोकरे, अनिल रजपूत, संतोष गायकवाड, भगावान वावरे, युवराज कोकाटे, अविनाश दोडतोले, मोहन कचरे, लाला शेख, जाफर पटेल, सचिन पडोळकर, सुभाष लोखंडे, शैलेश रजपूत, पिंटू दंडगे, अनिल राठोड, कुणाल ठक्के, बप्पा भोसले, नितीन निंबाळकर, शशी गायकवाड आदी उपस्थित होते.

### सिमेंटसह अन्य रस्त्यांचे रूंदीकरण करा; संभाजी आरमारची मागणी

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

शहरातून विजय नगर, ठाकरे चौकापासून ते गोदूताई परुळेकर विडी घरकुल मधुन कुंभारी अश्विनी हॉस्पिटल रोड व अक्कलकोट हायवे उडानपुल ते गोदूताई परुळेकर क विभाग बसस्टॉप पर्यतचे रस्ते नव्याने सिमेंट रस्ते करून, रस्ते रूंदीकरण करून मिळण्यासाठी संभाजी आरमारच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील जुना कुंभारी नाका मार्गावर विजय नगर, ठाकरे चौक ते नवीन विडी घरकुल कुंभारी दरम्यान दाट लोकवस्ती वसलेली असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात विडी कामगार, हातमाग व यंत्रमाग कामगार वसाहत मोठ्या प्रम ाणावर आहे. तसेच ह्या मार्गावरून शहरातील आणि परिसरातील असंख्य नागरिक अश्विनी रुग्णालय, कुंभारी येथे उपचारासाठी येत-जा करीत असतात. नवीन विडी घरकुल परिसरातील नागरिक, वयस्क, कामगार आणि विद्यार्थी यांचे दैनंदिन कामकाज आणि शाळेनिमित्त, उपचारासाठी रूग्ण व गरोदर महिला सोलापूर शहर व कुंभारीकडे ये-जा करीत असतात. सध्या हा अरुंद रस्ता अतिशय खड्डेमय व धोकादायक झाला असून, या मार्गावरून प्रवास करणा-या नागरिकांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागत आहे. अलीकडच्या काळात या रस्त्यावर किरकोळ व गंभीर अपघात होऊन अनेक नागरिक जखमीही झालेले आहेत.तरी जुन्या कुंभारी मार्गावरील ठाकरे चौक ते नवीन विडी घरकुल येथील रस्ते तातडीने रूदींकरण करून सिमेंट रस्ते तयार करण्यात यावा. याबाबत प्रशासनाने योग्य ती दखल न घेतल्यास या परिसरातील नागरिकांसह संभाजी आरमारला रस्त्यावर उतरून सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी धरणे आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असाही इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर संभाजी आरमार कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, शहराध्यक्ष सागर ढगे, शाखा प्रमुख सागर दासी आदींच्या सह्या आहेत.



### ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात गुरुवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत संकल्प युथ फाउंडेशन सोलापूर आयोजित दोन अंकी ''स्पायडर मॅन'' नाटक सादरीकरण केले.

# जिल्ह्यात ५ डिसेंबरला व्यापारी पेठा राहणार बंद

## व्यापारी महासंघातर्फे इशारा; अन्नधान्यांवरील ५ टक्के जीएसटी रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने अन्नधान्य व खाद्यान्न वस्तूंवर लावलेला ५ टक्के जीएसटी आणि बाजार समितीचा सेस कायदा रद्द करावा. बाजार समितीचे सर्व परवाने ऑनलाईन व संगणकीकृत व्हावेत, या म ागणीसाठी ५ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांसह व्यापारी पेठा बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा व्यापारी महासंघाकडून देण्यात आला.

मुळात जीएसटी लागू झाल्यानंतर बाजार समितीचा सेस बंद व्हायला हवा. पण तो तसाच सुरु आहे. सेस बंद झाल्यास ग्राहकांसह व्यापाऱ्यांनाही त्याचा लाभ मिळणार आहे. बाजार समि त्यांसह व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांच्यादृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या या सर्व मागण्यांकडे शासनाने त्वरित लक्ष देवून त्या मान्य कराव्यात, अशी आग्रही मागणीही यावेळी करण्यात आली.



### शिखर संस्थेच्या सूचनेनुसार सहभागी

राष्ट्रीय बाजार समितीबाबत शासनाने प्रस्तावित केलेल्या अध्यादेशामधील त्रुटी दूर करण्यात याव्यात. पणन कायद्यामधील बदलांबाबत कृती समितीतर्फे यापूर्वी सुचवण्यात आलेल्या बदलांची तत्काळ अंम लबजावणी करावी. अशा आमच्या मागण्या आहेत. भुसार व्यापारी संघ ही आमची शिखर संस्था असून या संस्थेच्या सूचनेनुसार आम्ही सर्वजण या बंदमध्ये सामील होणार आहोत, असे ऑईल मिल असोसिएशनचे अध्यक्ष महालिंग परमशेट्टी यांनी सांगितले.

### जाचक अटी रद्द व्हायला हव्यात

बाजार समितीचा सेससह अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील जाचक अटी रद्द करण्यात याव्या. व्यापाऱ्यांचे परवाने तीन वर्षातून एकदा नूतनीकरण करण्यात यावे. शिवाय ते ऑनलाईन व्हायला हवेत यांसह शासन स्तरावरुन आश्वासन देण्यात आले. मात्र त्याची पुर्तता होईनासे झाले आहे. त्यामुळे ५ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात येत आहे, असे भुसार व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी सांगितले.

### बंदची वेळ येऊ देवू नये

५ डिसेंबर २०२५ रोजी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बंदमुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होवू नये असे शासनाला वाटत असेल तर तत्पुर्वी आमच्या सर्व मागण्या मंजूर करुन बाजार समित्या, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्या. जेणेकरुन आमच्यावर बंद ठेवण्याची वेळ येऊ देवू नये, असे दाल मिल असोसिएशनचे मार्गदर्शक राजेंद्र तापडिया यांनी सांगितले.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते भाजपाच्या प्रचाराचा उद्या होणार शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० नोव्हेंबर -**

भारतीय जनता पार्टी, पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी व मित्र पक्षाचे पंढरपूर नगरपरिषद नगराध्यक्ष व नगरसेवक प्रचारफेरी शुभारंभ शुक्रवारी (ता.२१ नोव्हेंबर) सकाळी ९ वाजता करण्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात येणार आहे.

यावेळी पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार सम ाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, युटेपियन शुगर्सचे अध्यक्ष उमेश परिचारक, नगरपालिका निवडणूकीचे प्रभारी तथा सोलापूर जिल्ह्या भाजपाचे उपाध्यक्ष प्रणव परिचारक, भाजपाचे तालुकाअध्यक्ष सुभाष मस्के, शहराध्यक्ष लाला पानकर आदी प्रमुख पदाधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.

यावेळी शहरातील मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून प्रचार फेरीचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे.

### असा आहे प्रचारफेरीचा मार्ग

छत्रपती शिवाजी महाराज चौक, संत नामदेव महाराज पायरी, मल्लिकार्जुन मंदिर, दर्शनमंडप चौक, रेणुका मंदिर, पालीमकर बोळ, दर्शन मंडप, पाण्याचा हौद, उमदे गल्ली, डॉं.कानडे दवाखाना, दिवटे घर, मंजुळ घाट, संभाजी चौक, तानाजी चौक, परिट गल्ली, पांडुरंग भवन, तानाजी चौक परिसर, संभाजी चौक परिसर, जुनी माळी गल्ली, स्वारगेट कॉंर्नर, भाजी मंडई, गंजेवार दुकान, ताकपिठे विठोबा, गोपाळकृष्ण मंदिर, स्वामी दुकान, आष्टेकर घर, कबाडे बोळ, घोंगडेगल्ली, तारेगल्ली, रानरुई बोळ, धुंडामहाराज मठ, उत्पात गल्ली, रुक्मिणी पटांगण, तांबेकर गल्ली, हरिदास वेस, डांगे घर, पटवर्धन वाडा, शामसुंदर बोळ, मुक्ताबाई मठ, कवठेकर गल्ली, महाव्दार.

### सोलापुरात नारदीय कीर्तन महोत्सव सुरू

**स्वरूप सखी मंडळाचे आयोजन**

**सोलापूर,दि.२० नोव्हेंबर-**

येथील स्वरूप सखी मंडळ व अनादि केटरर्सच्या वतीने हभप कै. सौ.सुनीती दाते तसेच कै. नागेश सहस्त्रबुध्दे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नारदिय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी दि.१९ नोव्हेंबर रोजी दीपप्रज्वनासह प्रतिमापूजनाने झाली याची सुरूवात झाली. कीर्तन महोत्सवाचे यंदा दहावे वर्ष आहे. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात हा महोत्सव सुरू आहे. पहिल्या दिवशी हभप नेहा उपाध्ये व हभप कैलासबुवा खरे यांचे कीर्तन झाले. गुरूवारी दि.२० नोव्हेंबर रोजी हभप सना साटेलकर व हभप विश्वासबुवा कुलकर्णी यांचे कीर्तन झाले. शुक्रवारी दि. २१ नोव्हेंबर रोजी हभप अमृता करंबळेकर यांचे दुपारी ४.३० ते ६ तसेच हभप लक्ष्मीप्रसाद कुलकर्णी-पटवारी यांचे सायंकाळी ६.१५ ते ८.३० पर्यंत कीर्तन होणार आहे.

## हमारा शौचालय, हमारा भविष्य अभियान यशस्वी करा : सीईओ

### १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर कालावधीत विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर..**

- केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागामार्फत जिल्ह्यात ''हमारा शौचालय, हमारा भविष्य'' विशेष मोहिम दिनांक १९ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली असून १० डिसेंबर मानवी हक्क दिनापर्यंत पर्यंत मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

या मोहिमे अंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्याचे सुचना केल्या आहेत. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली सार्वजनिक शौचालये यांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करून घेण्यात यावी.

या कालावधीत शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिस्सारण व



स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या सुचना दिले आहेत. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी सूचना देण्यात यावेत. जिल्हा स्तरावर उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये करणारे ग्रामपंचायतीना प्रोत्साहित करणेत येणार आहे. तसेच सार्वजनिक शौचालय उत्कृष्ट काम करणारे ग्रामपंचायती चे सरपंच व पंचायत अधिकारी यांचा विशेष गौरव दिनाक १० डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. तालुक्यातील सर्व ना दुरुस्त सार्वजनिक शौचालयाची माहिती तालुका स्तरावर संकलित करणेत यावी. ग्रामपंचायत स्तरावर १५ वा वित्त आयोग मध्ये दुरुस्ती साठी राखून ठेवलेला निधी सार्वजनिक शौचालय दुरुस्ती साठी वेळेत खर्च करणेत येणार आहे. या अभियानात कुठल्याही परिस्थिती हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घेणेत यावी. अशाही सुचना सिईओ जंगम यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे सूचना दिले आहेत.

### खर्च न करणाऱ्या ग्रामपंचायतींचा आढावा

जिल्हातील मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायतींनी १५ वा वित्त आयोगाचे आराखड्यात दुरुस्ती साठी तरतुद केली आहे. तरतुद करूनही खर्च न करणारे ग्रामपंचायतींचा आढावा सिईओ यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर घेणेत येणार आहे.

**- अमोल जाधव,**
प्रकल्प संचालक, जि.प. सोलापूर

### हलगर्जीपणा केल्यास कारवाई

मुख्यमंत्री समृध्द पंचायराज अभियानाची तपासणी करताना सार्वजनिक शौचालय दुरुस्ती मोहिमेची दखल घेणेत येणार आहे. गुणांकन देताना याचा विचार केला जाईल. नवीन बांधून बंद असलेली शौचालये सुरू करा. वीजेची व्यवस्था करा. ज्या ग्रामपंचायती हालगर्जी पणा करतील त्यांचे वर कारवाई करा. तसे अधिकार गटविकास अधिकारी यांना दिले आहेत.

**- कुलदीप जंगम,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर

## 'एकल मातांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडणार नाही'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० नोव्हेंबर :**

ज्या विद्यार्थ्यांचे वडील मयत आहेत किंवा विद्यार्थी ज्यांचा संपूर्ण सांभाळ एकल माता करत आहेत. अशा विद्यार्थ्यांचा शिक्षणात खंड पडू नये, यासाठी शासनाकडून विशेष आर्थिक मदतीचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडणार नाही. पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे, असे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले.

राज्यातील एकल मातांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती अत्यंत कठीण असल्यामुळे हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. एकल मातांना मोलमजुरी करुन संसाराचा गाडा ओढावा लागत आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक महिलांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवत नसल्याची बाब समोर आली. ही बाब लक्षात घेवून शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सदर योजना राबवण्याविषयी सर्वंकष माहिती संकलन करण्यात यावी, असे निर्देश शिक्षण संचालकांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी विशेष गुगल शीट भरून विद्यार्थ्यांची माहिती शासनाकडे पाठविण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

### शालेय खर्चाचा ताण, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या

शिक्षण मंत्र्यांच्या पुढाकारामुळे राज्यातील शेकडो एकल मातांच्या मुलांना शालेय खर्चाचा ताण कमी होणार आहे. त्यांना शिक्षणाचा हक्क सन्मानपूर्वक आणि अखंडित मिळण्यास मदत होणार आहे. तसेच शाळाबाह्य होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रभावीपणे कमी होणार आहे, शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

## इंधन जपून वापरणे ही आपली जबाबदारी : विद्याधर थाळणेकर

**स.हि.ने. प्रशाला विज्ञान व्याख्यानमाला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० नोव्हेंबर-**

आपल्या दैनंदिन जीवनामधील पेट्रोलियमचे महत्त्व आपण सगळेजण जाणतो. हे पेट्रोलियम भूगर्भाखाली सम ुद्री जीवांच्या जीवाश्म अवशेषापासून तयार होते. त्याचा शोध घ्यावा लागतो ,याचा शोध लागल्यावरआपल्याला तेल विहिरी तयार कराव्या लागतात. आपल्याला तेल- विहिरीतून तेल मिळते. हे इंधन जपून वापरणे ही आपली जबाबदारी आहे, असे मत ओ.एन.जी.सी.चे ड्रिलिंग विभागाचे निवृत्त महासंचालक श्रीयुत विद्याधर थाळणीकर यांनी व्यक्त केले. मराठी विज्ञान परिषद सोलापूर, रोटरी क्लब सोलापूर आणि सरस्वती मंदिर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स.हि.ने. प्रशाला येथे सुरू असलेल्या विज्ञान व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफताना



ते बोलत होते. ''भूगर्भातील पेट्रोलियम अन्वेषण ते उत्पादन :-तंत्र आणि मंत्र ''या विषयावर ते बोलत होते.

श्री थाळणेकर म्हणाले, भारताम ध्ये सध्या वर्षाला ३० मिलियन मॅट्रिक टन एवढेच कच्च्या तेलाचे उत्पादन होते. आपल्या देशाची एका वर्षाची कच्च्या तेलाची गरज २४० मिलियन मॅट्रिक टन एवढी आहे. सध्या आपल्याला ८५ टक्के तेल आयात करावे लागते. आपल्या सरकारने भविष्यामध्ये तेल शोधमोहीम ,तेल शुद्धीकरण प्रक्रिया यावरती जास्त निधी खर्च करायचा ठरवलेला आहे. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या कमी केल्या आहेत. अंदमान निकोबार बेटावर यासाठीचे संशोधन सुरू आहे .येथे तेलाचे साठे मिळाले तर भविष्यात आपली कच्च्या तेलाची सर्व गरज भागवून आपण तेल निर्यातही करू शकू. प्रास्ताविक प्रा. व्यंकटेश गंभीर यांनी केले. याप्रसंगी रोटरी क्लब सोलापूरचे अध्यक्ष धनश्री केळकर, उपाध्यक्ष संदीप झवेरी, रोटेरियन विजय जाधव हे उपस्थित होते. सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग देशमुख, उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी, ज्येष्ठ सदस्य श्री दामले, प्रशांत बडवे, मुख्याध्यापिका निता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### चंद्रकांत सातलगांवकर



**सोलापूर, दि.२० नोव्हेंबर-**

येथील अक्कलकोट रोडवरील गांधी नगरमधील चंद्रकांत शरणप्पा सातलगांवकर (वय-६९) यांचे निधन झाले. त्यांच्यावर लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

### जालिंदर इंगळे



**अकलूज दि.२० नोव्हेंबर-**

येथील सामाजिक कार्यकर्ते जालिंदर राजाराम इंगळे (वय ७०) यांचे वृधपकाळाने दु:ख निधन झाले. त्यांच्या पाश्चात्त्य पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. येथील अकलाईदेवी घाटावर त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या अकलूज डेपोमध्ये त्यांनी चालक म्हणून विनाअपघात ३६ वर्षे सेवा केली म्हणून त्यांना गौरविण्यात आले होते. डॉ. संजय इंगळे यांचे ते वडील होत.

# जिल्ह्यात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार करणार नव्या कारभाऱ्यांचा फैसला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी आता प्रचाराचा धुराळा सुरू झाला असून, या पालिका निवडणुकीत सोलापुरातील ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार नव्या कारभाऱ्यांचा फैसला करणार आहेत. यासाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे आणि दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबर २०२५ रोजी लगेच मतमोजणी होणार आहे.

मोठ्या प्रतिक्षेनंतर महाराष्ट्रात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणूक जाहीर झाली आहे. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींसाठी एकाच वेळी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. सोलापुरातील ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषद मतदारांची स्थिती पाहिली तर बार्शी नगरपरिषद २१ प्रभाग आणि १०९००७ इतके म तदार आहेत. तर पंढरपूर १८-९४५५९, अक्कलकोट १२-३८४६२, अकलूज १३-३४४०६, मैदर्गी १०-१२४७६, दुधनी १०-१०९०५, करमाळा १०-२२११६, कुर्डुवाडी १०-२३७९१, मंगळवेढा १०-२८७३८, सांगोला ११-३३६९८, मोहोळ १०-२४४१३, अनगर १७-११०३४ अशा एकूण १२ नगरपालिकांतील १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीतही अनेकजण २ हजाराच्यावर उमेदवार आपले नशीब अजमावत आहेत.

### असा चालू आहे निवडणूक कार्यक्रम

अर्ज-१० नोव्हेंबरपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली आणि १७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज केले. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर २०२५, अर्ज मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबर २०२५, अपिल असलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर २०२५, निवडणूक चिन्ह २६ नोव्हेंबर २०२५, मतदान - २ डिसेंबर २०२५ आणि मतमोजणी - ३ डिसेंबर २०२५

### अध्यक्षपदाच्या ३, सदस्यपदाच्या रेसमधून ४३ जणांची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी ११४ उमेदवारांचे अर्ज छाननीत वैध झाले असून, नगरसेवकपदाच्या २८९ जागांसाठी १७३८ जणांचे अर्ज वैध झाले होते. त्यापैकी गुरूवारी अध्यक्षपदाच्या रेसमधून ३ जणांनी माघार घेतली तर सदस्यपदाच्या निवडणुकीतून ४३ जणांनी माघार घेतली आहे.

अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ च्या १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. नगराध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल आहेत. मात्र मंगळवारी छाननीत उज्जला थिटे यांचा अर्ज बाद ठरल्याने नगराध्यक्ष पदही जवळपास अविरोध ठरले गेले आहे. सोमवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने त्या दिवशी तहसील कार्यालयांना यात्रेचे स्वरूप आले होते. रात्री उशिरापर्यंत अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर दाखल अर्जाची छाननी करण्यात आली.

मंगळवारी अध्यक्षपदाच्या एकाही उमेदवारांनी माघार घेतली नव्हती तर सदस्यपदाच्या ११ जणांनी आपले अर्ज या दिवशी काढून घेतले होते. आज गुरूवारी अध्यक्षपदाच्या ३ तर सदस्यपदाच्या ४३ जणांची निवडणुकीतून माघार घेतली आहे. तर उद्या शुक्रवार, दि. २३ नोव्हेबर पर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहे. त्यानंतर अंतिम उमेदवार ठरणार असून, २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. तर याचा निकाल दुसऱ्याच दिवशी लागणार आहे. आता निवडणुकीस उभे ठाकलेल्या काही उमेदवारांनी प्रचारही सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे.

## महत्वाचे...



### माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांना शिंदे कुटुंबाकडून श्रध्दांजली

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर**

अक्कलकोटचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे १३ नोव्होंबर रोजी निधन झाले आहे. स्व.सिद्रामप्पा पाटील यांनी राजकीय क्षेत्राबरोबरच, सहकार ,सामाजिक क्षेत्रात ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांची ख्याती सोलापूर जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. सहकार क्षेत्रातील लोकनेता म्हणून त्यांची ओळख आहे. म्हणून त्यांच्या निधनानिमित्त माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणितीताई शिंदे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार व शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी सोलापूर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी शिवानंद पाटील, संजय पाटील, रमेश पाटील, दिलीप पाटील आदीसह कुटुंबियातील सर्व सदस्य उपस्थित होते.



### बाळेच्या चंडक प्रशालेचे चित्रकला स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळे येथील ज. रा. चंडक प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी नवनीत युवा मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत विशेष पारितोषिके मिळविली. त्यांना संस्थेच्या अध्यक्ष व सचिवांच्या हस्ते रंगसाहित्य देवून गौरविण्यात आले. त्यांना कलाशिक्षक मुकुंद मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेच्या सचिवा शिल्पा ठोकळ, मुख्याध्यापक मोहन घोडके आदींनी कौतुक केले.यशस्वी विद्यार्थी : आर्या क्षीरसागर (पाचवी), वंश चव्हाण, आदिती खुर्द, तनुजा सोनटकले, सायली भवर, सई थोरात (सर्व सहावी), माहेश्वरी पिंगळे (सातवी) अंजली ढेकणे (आठवी), पूर्वा भोसले (दहावी).



### चोपडी येथील प्रतीक बाबर यांची सैन्यदलात अग्निवीर टेक्निकल पदावर निवड

**सांगोला,दि.२० नोव्हेंबर -**

सांगोला तालुक्यातील चोपडी गावचे सुपुत्र प्रतीक दत्तात्रय बाबर यांची ई.एम.ई सेंटर सिकंदराबाद येथे अग्नीवर टेक्निकल पदावर निवड झाली आहे. वडिलांचे छत्र हरपल्यानंतर जिद्द आणि चिकटीच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नांमध्ये त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या वडिलांनी पण सैन्य दलात सेवा केली होती. यानिवडीबद्दल भोजलिंग यात्रा कमिटी रानमळा, चोपडी यांच्यावतीने प्रतीक बाबर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी सैनिक अमोल बाबर, चंद्रकांत बाबर, दिलीप बाबर गुरुजी यांनी मनोगतातून प्रतीक बाबर यांच्या यशाचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना प्रतीक बाबर यांनी तरुणांनी विशिष्ट ध्येय समोर ठेवून त्या दृष्टीने वाटचाल करावी असा मौलिक सल्ला दिला. यावेळी अनेक मान्यवर, महिला भगिनी, युवावर्ग उपस्थित होते.



### अनगरची निवडणूक बिनविरोध नाही, जिल्हा न्यायालयात अपील : ॲड. दत्तात्रय घोडके

**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

अनगर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी निवडणूक बिनविरोध झाली नाही. उज्वला थिटे यांनी ॲड. दत्तात्रय घोडके यांच्या मार्फत सोलापूरच्या जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले आहे. ॲड. घोडके यांनी पत्रकार परिषद घेऊन नगरपंचायत निवडणूकीच्या कायद्यात काय तरदूत आहे, त्याबाबत महत्वपूर्ण माहिती दिली. उज्वला थिटे या अर्ज भरताना निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना त्रुटी सांगणे गरजेचे होते. तसेच न्यायालयाचा निकाल येईपर्यंत निवडणूक अधिकारी अनगर नगरपंचायतीची नगराध्यक्षा पदाची निवडणूक बिनविरोध झाली असे घोषित करता येत नाही, अशी माहिती ॲड घोडके यांनी दिली.

# सन २०१७ च्या तुलनेत यंदा २ लाख ५१ हजार मतदारांची वाढ

- महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी झाली प्रसिध्द
- सूचना व हरकतीसाठी २७ नोव्हेंबरपर्यंत मुदत
- मतदार यादी पाहण्यासाठी महापालिकेत मोठी गर्दी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी आज प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारूप यादीवर २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहे. ५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येणार आहे. सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण ६ लाख ७३ हजार मतदार होते. यंदाच्या २०२५ च्या निवडणुकीसाठी मतदार संख्येत २ लाख ५१ हजार मतदारांची वाढ झाली आहे. यंदा प्रारूप मतदार यादी मध्ये एकूण ९ लाख २४ हजार ७०६ मतदार असल्याचे दिसून येते.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम केले आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या अंतिम प्रभाग रचनेनुसार एकूण २६ प्रभागांकरिता प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आवश्यक ती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दरम्यान, सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण ६ लाख ७३ हजार मतदार होते. यंदाच्या २०२५ च्या निवडणुकी करिता मतदार मतदार संख्येत नैसर्गिक वाढ झाली आहे. २ लाख ५१ हजार मतदारांची वाढ यंदा झाली आहे. यंदा प्रारूप मतदार यादी मध्ये एकूण ९ लाख २४ हजार ७०६ मतदार असल्याचे स्पष्ट झाले आहे

हरकती / सूचना निवडणूक मुख्य कार्यालय, डॉ.कोटणीस हॉल, आयसीआयसीआय बँकेच्यावर, सोलापूर याठिकाणी स्वीकारण्यात येतील. हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २७ नोव्हेंबरपर्यंत आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या निवडणूक मुख्य कार्यालय, डॉ कोटणीस हॉल, आयसीआयसीआय बँकेच्यावर याठिकाणी नागरिकांना विक्रीकरिता उपलब्ध करण्यात आले आहेत. मतदार यादी प्रतिपृष्ठास दोन रूपये दराने विक्री करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागाचे मतदारयादीचे फोटो नसलेले मतदारयादी सीडी, पेन ड्राईव्हमध्ये १०० रुपये दराने उपलब्ध करण्यात येत आहे. प्रारूप मतदारयादीची प्रसिध्दी महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे सूचना फलक, विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ येथील सूचना फलक, स्थानिक वृत्तपत्र, स्थानिक टिव्हीवर करण्यात येणार आहे. ही यादी सोलापूर महानगरपालिका कौन्सिल हॉल याठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात येत आहे. याशिवाय महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात येणार आहे.

दरम्यान महापालिका कौन्सिल हॉल येथे लावण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्या पाहण्यासाठी राजकीय पक्षसंघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरिक गर्दी करीत असल्याचे दिसून आले. मतदार यादी खरेदी करण्यासाठीही मोठी वर्दळ होती.

### ५ डिसेंबरला होणार अंतिम मतदारयादी जाहीर

प्रारूप मतदार यादीवरुन दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रामाणित करून ५ डिसेंबर प्रसिध्द करण्यात येणार आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणी यादी प्रसिद्ध करण्याची तारीख ८ डिसेंबर आहे तर मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख १२ डिसेंबर ही आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी मतदारयादीबाबत जाहीर केलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार महापालिका स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

### प्रभाग क्रमांक २० मध्ये सर्वाधिक मतदार संख्या

प्रारूप मतदार यादीनुसार सर्वाधिक मतदार संख्या प्रभाग क्रमांक २० मध्ये असून येथे ४५ हजार ५८१ मतदार आहेत. त्या खालोखाल प्रभाग ८ मध्ये ४२ हजार ७१४ , प्रभाग १२ मध्ये ४०,६३७ तर प्रभाग २३ मध्ये ४०,४१८ मतदार संख्या असल्याचे दिसून येते. २६ प्रभागांमध्ये मिळून पुरुष मतदारांची संख्या ४ लाख ५७ हजार ९९ तर स्त्री मतदारांची संख्या ४ लाख ६७ हजार ४७१ आणि इतर मतदारांची संख्या १३६ इतकी आहे. प्रारूप मतदारांची संख्या ९ लाख २४ हजार ७०६ इतकी आहे.



# टाळाच्या गजरात हरिनामाचा जप

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७२९ व्या समाधी सोहळ्याचे व ७५० व्या जन्मोत्सव वर्षाचे औचित्य साधून हरिपाठ परिवार-सोलापूर यांच्यावतीने श्रीक्षेत्र अरण येथील श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज समाधी मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सुमारे १०० महिलांच्या उपस्थितीत टाळाच्या गजरात हरिनामाचा जप करण्यात आला.

संत शिरोमणी सावता माळी महाराजांच्या भक्तीची परीक्षा बघण्यासाठी साक्षात पंढरीचा पांडुरंग अरणला सावता महाराजांच्या मळ्यामध्ये दाखल झाले. त्यावेळेला त्यांना शोधत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत शिरोमणी नामदेवराय हे दोघेही देवाला शोधत त्याठिकाणी आले होते. अशा या त्रिवेणी संगमावर हा नामजप व्हावा, या उद्देशाने अरण येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी हरिपाठ परिवाराचे प्रमुख बळीराम जांभळे यांच्या हस्ते संत शिरोमणी सावता माळी महाराज समाधीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सचिन भोसले, चंद्रकांत जांभळे, तुकाराम जांभळे, गुरुनाथ ताटे, सौरभ बोंगे, सुरेश जांभळे उपस्थित होते. हरिपाठ परिवार शाखा लष्कर महादेव मंदिर प्रमुख मनोरमा पट्टमवार व महिलांच्या वतीने ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या पहिला अध्यायाचे पठण करण्यात आले.

श्रीसंत सावता माळी महाराज समाधी ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे यांच्यावतीने हरिपाठ परिवाराचे प्रमुख बळीराम जांभळे यांचा सन्मान करण्यात आला. बळीराम जांभळे, चंद्रकांत जांभळे, रेखा पवार, अश्विनी जांभळे, गीता क्षीरसागर, पुनम व्यवहारे, सुनीता गाढवे, सोनाली केसरे यांनी गायनसेवा बजाविली. अनिकेत जांभळे, सौरभ बोंगे, समर्थ कांबळे, शंभू जांभळे, अंजली लोखंडे, भक्ती परदेशी, अविराज जांभळे यांची साथसंगत लाभली.



**श्री दानम्मादेवी दीपोत्सव....** सोलापूर : विजापूर रोडवरील परिसरात गुरुवारी श्री.दानम्मा देवी मंदिरासमोर महिलांनी दीपोत्सव साजरा केला.



सोलापूर : मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड महाअधिवेशनासाठी सोलापूर जिल्ह्य़ातील महिला गुरुवारी सकाळी चंद्रपूर येथे रवाना झाल्या. जजाऊ ब्रिगेड प्रदेश कार्याध्यक्षा नंदाताई शिंदे, लता ढेरे, उज्वला साळुंखे, ज्योती शिंदे यांचा सहभाग आहे.

# नगरपालिका निवडणूक : ४९९ मतदान केंद्रांसाठी २७६० कर्मचाऱ्यांची नेमणूक

- ५५० सीयु आणि १०७० बीयु मशीन्स
- अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस




**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २० नोव्हेंबर-**

नगरपालिकांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सोलापूर जिल्ह्यातील ४९९ मतदान केंद्रांवर २ हजार ७६० कर्मचारी नेमण्यात आले आहे. मतदानासाठी ५५० कंट्रोल युनिट आणि १०७० बॅलेट युनिट मशीन्सचा वापर करण्यात येणार आहे. शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्याच दिवशी रात्री उशिरापर्यंत स्ट्राँग रुममध्ये पोलिस बंदोबस्तात नेण्यात येणार आहेत, अशी माहिती प्र.सह आयुक्त डॉ. योगेश डोके यांनी दिली.

राज्यात या निवडणुकीत अनेक ठिकाणी महायुती विरुध्द महायुती आणि मविआ विरुध्द मविआ अशाही लढती होणार आहेत. काही ठिकाणी उमेदवार आयात करून, तडजोडी करीत जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि अनगर नगरपंचायतीत भाजपने स्वबळावर उमेदवारी जाहीर केली आहे. कॉंग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना नेत्यांकडून आपापल्या परीने तयारी केली आहे. २१ नोव्हेंबर हा अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून, यानंतरच निवडणूक आखाड्यात उतरणाऱ्या पैलवानांचे चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, जिल्ह्यासह राज्यभरात अनेकजणांनी बंडखोरी केली असल्याने त्यांना थांबविण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडून मनधरणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि १ नगरपंचायतीच्या निवडणुका लागल्या आहेत. नगराध्यक्षपदांसाठी ११४ उमेदवारांचे अर्ज वैध झाले असून, नगरसेवकपदाच्या २८९ जागांसाठी १७१९ अर्ज दाखल झाले आहेत. अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ च्या १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. दरम्यान, बुधवारच्या छाननीमध्ये अध्यक्षपदाचे ३३ अर्ज आणि सदस्य पदासाठी ५५० अर्ज असे एकूण ५८३ अर्ज बाद ठरले आहेत. बुधवारी आणि गुरुवारी आणखी काहीजणांनी माघार घेतली असल्याचे सांगण्यात आले.

या निवडणुकीसाठी स्थानिक निष्ठावंत, आयात नेते आणि विशिष्ट सामाजिक समीकरणांच्या आधारे उमेदवार निवडले गेले आहेत. काही ठिकाणी घराणेशाही, निष्ठावंतांना प्राधान्य, ओबीसी कार्ड अशा राजकीय समीकरणांचा वापर करीत भाजपनेही स्वबळाची रणनीती राबविली आहे. इतर राजकीय पक्षसंघटनाही आपापल्या परीने उमेदवार उभे केले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, मोहोळ, बार्शी, पंढरपूर, अकलूज, सांगोला, मंगळवेढा, कुर्डुवाडी, करमाळा या ११ नगरपालिकांमध्ये आणि १ अनगर नगरपरिषदेत या निवडणुका पार पडणार आहेत. यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त राहणार आहे. मतदान प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांना आणि मतपेट्यांना घेवून जाण्यासाठी बसेसचेही नियोजन लावण्यात आले आहे.

२१ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे. २६ नोव्हेंबर रोजी चिन्ह वाटप, २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. चिन्ह वाटपानंतर प्रचाराला वेग येणार आहे. या निवडणुकीत हायटेक नेतेही प्रचारात उतरणार आहेत.

या निवडणुकीसाठी दिव्यांग मतदार, तान्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. काही मतदार केंद्र गुलाबी केंद्र असणार असून त्यात सर्व अधिकारी या महिला असतील. यंदा नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. त्यानुसार, अ वर्ग अध्यक्षपद - १५ लाख, नगरसेवक - ५ लाख, ब वर्ग अध्यक्षपद - ११ लाख २५ हजार, नगरसेवक - ३ लाख ५० हजार, क वर्ग अध्यक्षपद - ७ लाख ५० हजार, नगरसेवक - २ लाख ५० हजार तर नगरपंचायत उमेदवारांसाठी अध्यक्षपद - ६ लाख, नगरसेवक - २ लाख २५ हजार अशी खर्च मर्यादा निवडणूक आयोगाने दिली आहे.

**नगरपालिका निवडणुकीसाठी असे राहणार अधिकारी-कर्मचारी**

| अ.क्र. | नगरपरिषदेचे नाव | एकूण मतदान केंद्रांची संख्या | मतदान पथकातील सदस्य: मतदान केंद्राध्यक्ष संख्या |  | मतदान अधिकारी संख्या |  |
|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  | आवश्यक | उपलब्ध | आवश्यक | उपलब्ध |
| १. | बार्शी नगरपरिषद | ११२ | १२४ | १२४ | ३७० | ३७० |
| २. | पंढरपूर नगरपरिषद | ९७ | १०७ | १०७ | ४२८ | ४२८ |
| ३. | अकलूज नगरपरिषद | ३९ | ४३ | ४३ | १७२ | १७२ |
| ४. | अक्कलकोट नगरपरिषद | ४४ | ४९ | ४९ | १९६ | १९६ |
| ५. | सांगोला नगरपरिषद | ४० | ४४ | ४४ | १७६ | १७६ |
| ६. | करमाळा नगरपरिषद | २७ | ३० | ३० | १२० | १२० |
| ७. | कुर्डूवाडी नगरपरिषद | २९ | ३२ | ३२ | १२८ | १२८ |
| ८. | मोहोळ नगरपरिषद | २७ | ३० | ३० | १२० | १२० |
| ९. | मंगळवेढा नगरपरिषद | ३१ | ३४ | ३४ | १३६ | १३६ |
| १०. | मैंदर्गी नगरपरिषद | २० | २२ | २२ | ८८ | ८८ |
| ११. | दुधनी नगरपरिषद | १६ | १८ | १८ | ७२ | ७२ |
| १२. | अनगर नगरपरिषद | १७ | १९ | १९ | ७६ | ७६ |
|  |  | ४९९ | ५५२ | ५५२ | २२०८ | २२०८ |

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रस्त्यावर वाढदिवस साजरा करणाऱ्या ८ जणांवर गुन्हा दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी लातूर पोलिसांकडून विशेष गस्त वाढविण्यात आली आहे. याच अनुषंगाने वाढदिवसाचा बहाणा करून मध्यरात्री सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात आरडाओरडा करणे, फटाके फोडणे तसेच नागरिकांना त्रास देत गोंधळ निर्माण करणाऱ्या ८ जणांवर लातूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा लातूर शहरातील छत्रपती चौक ते पीव्हीआरकडे जाणाऱ्या रिंग रोडवर काही युवकांनी त्यांच्या मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी रस्त्याच्या मध्यभागी सार्वजनिक मार्गावर अडथळा निर्माण करत गोंधळ घा-तला. संगीत वाजवून, फटाके फोडून, आरडाओरडा व गडबड गोंधळ करीत अस-लेले गस्तीवरील पोलिसांच्या निदर्शनास आले. तसेच सार्वजनिक शांततेचा भंग केल्याबद्दल मयूर मारुती कावळे, आदित्य लक्ष्मण देशमुख, गौरीशंकर शिवमूर्ती दरेकर, श्रीकृष्ण राजाभाऊ बोराडे, समर्थ नवनाथ श्रीराम, सुदर्शन लक्ष्मण फुलगमवार, कृष्णा राजाराम ताटेवाड, अजय बनसिंग भुजबळ या आठ जणांवर एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाढत्या नागरी समस्यांनी लातूरकर त्रस्त

## नाना-नानी पार्क परिसरातील स्वच्छतागृहांची अवस्था 'बिकट'; मनपाच्या स्वच्छता विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष








**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २० नोव्हेंबर :** २०१९ मध्ये लातूर शहर मनपाला स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेचा प्रथम पुरस्कार मिळाला होता. आज लातूर शहरा-तील वाढत्या नागरी समस्यांनी सामान्य लातूरकर अक्षरशः त्रस्त झाले आहेत. शहराच्या अनेक भागात अस्वच्छतेचे साम्राज्य पाहायला मिळते. अन्य ठिकाणचेसोडा, लातूर शहर मनपाच्या अगदी पाठीमागे असणाऱ्या 'नाना-नानी पार्क'मधील स्वच्छतागृहांची अवस्था एवढी बिकट झाली आहे की विचारायलाच नको. सामान्य लातूरकरांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या मनपा प्रशासनावर आता जिल्हा प्रशास-नानेच कठोर कार्यवाहीचा बडगा उगारा-वा, अशी अपेक्षा सामान्यजनांतून व्यक्त होत आहे.

देशातील ड वर्ग महानगरपालिकांमध्ये कचरा व्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी मनपाला सदर पुरस्कार मिळाला होता. विद्यमान मनपा प्रशासन घनकचरा व्यवस्थापनाबद्दल आजमितीस फारशी प्रभावी कामगिरी करताना दिसत नाही. लातूर शहरात नगर परिषद अस्तित्वात असताना दररोज सकाळच्या दरम्यान शहराच्या विविध भागात स्वच्छता विभागाच्या महिला कर्मचारी हातात झाडू घेऊन परिसराची स्वच्छता करत असत. सध्यस्थितीत शहरात विविध भागात, प्रमुख रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा पडल्याचे पाहावयास मिळते. कचरा घेऊन जाणाऱ्या घंटागाड्या अनेक भागात वेळेवर येत नसल्याने घंटा गाड्यांची प्रतिक्षा करून कंटाळलेले नागरिक कचरा चक्क रस्त्यालगत टाकताना दिसतात. नागरिकांनी टाकलेला कचरा वाहनांमुळे तसेच हवेच्या झोतामुळे वातावरणात इतस्ततः पसरलेला दिसून येतो. पर्यायाने शहराच्या स्वच्छतेचे अगदी तीन-तेरा झाल्याची प्रचिती पदोपदी येते. लातूर शहर मनपाच्या अगदी पाठीमागे नाना-नानी पार्क आहे. मनपा आणि या पार्कमध्ये फक्त एका रस्त्याचे अंतर आहे. रस्ता ओलांडला की, मनपा आवारा-तून थेट नाना-नानी पार्कच्या प्रांगणात प्रवेश होतो. या पार्कच्या परिसरात दररोज सकाळच्या सत्रात लातूरचे एक ज्येष्ठ योग प्रशिक्षक दीपक गटागट हे नियमितपणे योगासन-प्राणायामाचे मोफत शिबीर चालवतात. त्यांच्या शिबिरास विविध स्तरातील नागरिकांची लक्षणीय उपस्थिती असते. हे सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, पार्क परिसरात अगदी सकाळपासूनच नागरिकांची ये-जा सुरु असते. पार्कच्या आवारात सार्वजनिक स्वच्छता गृह मनपाकडून उभारण्यात आ-लेले आहे. या स्वच्छतागृहाची आजची अवस्था अतिशय बिकट झाल्याचे पाहावयास मिळते. स्वच्छतागृहात लघुशंका करण्याची भांडे पूर्णतः फुटून गेलेली आहेत. शौचालयांची अवस्था तर त्याहून भीषण आहे. स्वच्छतागृहांचे दरवाजेच गायब आहेत. एवढेच नव्हे तर स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या नागरिकांसाठी पाण्याचीही सोय नाही. हे तर काहीच नाही, या स्वच्छतागृहातील वॉश बेसिन नळांसह गायब असल्याचे पाहायला मिळाले.

### प्रशासनासह लोकप्रतिनिधींचेही अक्षम्य दुर्लक्ष

लातूर शहरातील नागरी समस्यांकडे स्थानिक मनपा प्रशासनासह शहराचे विद्यमान आमदार माजी मंत्री अमित देशमुख यांचेही अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसतेय, हे वास्तव आहे. आ. देशमुखांच्या व्यस्ततेमुळे ते स्वतः याकडे गांभीर्याने पाहू शकत नसले तरी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थानिक नेते-पदाधिकाऱ्यांनी त्यांना याबाबत अवगत करणे गरजेचे आहे. नेत्यांकडून आ. देशमुख यांच्या कानावर हा प्रकार घातला गेला असता तर त्यांनी याकडे निश्चितच कानाडोळा केला नसता. आ. अमित देशमुखांनी विधानसभा निवडणुकीपासून स्वतःच्या स्वभावात-कार्यपद्धतीत बदल करून घेतल्याने अशा गोष्टी कानावर आल्यास त्यांनी नक्कीच मनपा प्रशासनाच्या अकार्यक्षमेवर तीव्र शब्दात ताशेरे ओढून समज दिली असती. आ. अमित देशमुख यांनी किमान आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना यापुढे मनपा निवडणुका पार पडेपर्यंत तरी नागरी समस्यांसारखे जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचे निर्देश द्यावेत, असा मतप्रवाह सामान्यांतून वाढीस लागला आहे.

मनपा मुख्यालयाच्या अगदी निकट असलेल्या या स्वच्छतागृहाची अशी अवस्था आहे. म्हणजे, स्वच्छतेबद्दल राष्ट्रीय पुरस्कार घेणाऱ्या या मनपातसध्या स्वच्छता विभाग, स्वच्छता कर्मचारी अस्तित्वात आहेत की नाही? असा प्रश्न सुजाण लातूरकरांना न पडल्यास नवलच.

### उपायुक्त वसुधा फड यांच्यापुढे आव्हान

लातूर शहर मनपाच्या नवनियुक्त उपायुक्त वसुधा फड यांच्याकडे मनपा स्वच्छता विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. फड यांनी एकदा संपूर्ण लातूर शहरात फेरफटका मारल्यास त्यांना शहराच्या विविध भागातील वाढत्या अस्वच्छतेची कल्पना येईल. त्यानंतर त्यांना स्वच्छता विषयक समस्यांची सोडवणूक कशी करायची हेही समजू शकेल. ज्याप्रमाणे लातूर शहराचा वाहतुकीचा प्रश्न बिकट आहे अगदी तसाच विषय नागरी समस्यांचाही आहे. सामान्यांशी संबंधित विषय असल्याने प्रसंगी वसुधा फड यांना नागरिकांच्या रोषाचाही सामना करावा लागू शकतो. स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीवरही त्यांना सूक्ष्म लक्ष ठेवावे लागणार आहे. एकंदर खऱ्या अर्थाने उपायुक्त फड यांना ही कामे करून घेताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे, हे निश्चित. त्यांनी यापूर्वी लातुरात कर्तव्य बजावल्याने येथील कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेचा त्यांना चांगला अभ्यास झाला आहे. त्यामुळे आपल्यासमोरील आव्हानांचा सामना त्या कशा प्रकारे करतात, हेही पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

लातूर शहरातील तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी शहराच्या काही भागात कारंजे उभारण्यात आले होते. हे कारंजे नाना-नानी पार्क च्या जवळ तसेच शहरातील महत्वाच्या चौकात उभारले गेले होते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी उपयोगात आणला गेला होता. तूर्तास शहरातील ही कारंजे बंद अवस्थेत आहेत. तापमानात घट करणे, हवा शुद्ध करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता. ही सगळी कामे आता अस्तित्वात नसल्यात जमा आहेत. त्या कामाचीही आता सखोल चौकशी होणे अगत्याचे बनले आहे.

मनपा कार्यालयालगत असणाऱ्या स्वच्छतागृहाची अशी अवस्था आहे, तर अन्य ठिकाणच्या स्वच्छतागृहांचे, नागरी समस्यांचे काय? असाही प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होऊ शकतो. पार्कच्या बाहेर पडल्याबरोबर अगदी गेटसमोर दरवाजे नसलेला उघडा विद्युत डीपी आहे. हा रस्ता अतिशय वर्दळीचा असल्याने एखादेवेळी वाहनधारकांचा किंवा मुक्या प्राण्यांचा त्याला स्पर्श होऊन जीवही जाऊ शकतो. त्याबाबतही प्रशासनाने संबधितविभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना माहिती देऊन डीपीला दरवाजा, कुलूप लावण्याची सोय करायला लावणे आवश्यक आहे. एकंदर लातूर शहरातील नागरी समस्यांकडे कोणीही गांभीर्याने पाहत नसल्याची सामान्य नागरिकांची तक्रार आहे.

## उपायुक्त फड यांनी घेतला स्वच्छता विभागाचा आढावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० नोव्हेंबर :** दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी याच्या आदेशानुसार नवनियुक्त उपायुक्त वसुधा फड यांनी स्वच्छता विभागाचा नुकताच पदभार घेतला आहे त्यांनी स्वच्छता विभागातील अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, कंत्राटदार यांच्या कडून दैनंदिन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील नेहमी कचरा पडणारी ठिकाणाचे सुशोभीकरण करण्यासाठी स्वच्छता निरीक्षक यांनी नाविण्यापुर्वक कल्पना सुचवणे व त्या अंमलात आणणेबाबत निर्देश देण्यात आले.



शहरातील मुख्य रस्त्यावरील साफसफाई सकाळी ९ च्या आगोदर झाली पाहिजे असे ठेकेदाराला निर्देश दिले. शहरातील मोकळ्या जागेत, रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही करणे. घरामधून ओला, सुका कचरा विलगीकरण करून न देणाऱ्या नागरिकांमध्ये जनजागृतीचे कार्यक्रम घेण्याचे सांगण्यात आले.

सदरील बैठकीस मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, शहर समन्वयक रोहित पांचाळ यांच्यासह इतर स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी याच्या आदेशानुसार लातूर शहरामध्ये सिंगल युज प्लास्टिक बंदीची मोहीम राबविण्यात असताना सिंगल युज प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदार, विक्रेते, फुल विक्रेते, स्थानिक बाजारपेठा, भाजीपाला मंडई, आस्थापना यांची तपासणी करण्यात आली त्यात एकूण ११० आस्थापानाची झडती घेण्यात आली तसेच दुकानदारांना १६५०० दंड आणि एकूण २०० किलो सिंगल युज प्लास्टिक जप्ती करण्यात आले.

## आ. देशमुख यांनी घेतला निवडणूक तयारीचा आढावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० नोव्हेंबर :** राज्याचे माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी निलंगा शहरातील काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित नाईकवाडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन निलंगा नगरपरिषद निवडणूक संदर्भात कार्यकर्त्यांशी सविस्तर संवाद साधला आणि निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष अभय साळुंखे आणि निलंगा शहर काँग्रेसचे अध्यक्ष अजित नाईकवाडे यांनी निलंगा न. प.वर काँग्रेसचा तिरंगा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## काशीलिंगेश्वर नगरात नागरी समस्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० नोव्हेंबर :** लातूर शहरानजीकच्या काशीलिंगेश्वर नगर परिसरामध्ये कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. परिसरात घंटा गाडी वेळेवर येत नाही. या परिसरामध्ये कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. तरी परिसरातील कचरा महानगरपालिकेच्या कचरा डेपोवर टाकण्याची परवानगी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात यावी अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांच्याकडे केली आहे. याबाबत प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी बुधवारी सकाळी महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी मीना यांना भेटून या मागणीचे निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, शहराच्या हद्दीलगत अंबाजोगाई रोड भागात काशीलिंगेश्वर नगर आहे. काही वर्षांपूर्वी या भागाची नव्याने ग्रामपंचायत निर्माण झाली आहे. शहरालगत असल्यामुळे ही मोठी वस्ती आहे. दरम्यान, या काशिलिंगेश्वर ग्रामपंचायतवरती प्रशासक असून नागरिकांना अनेक वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या परिसरामध्ये कचऱ्यांची समस्या गंभीर बनत चाललेली असून जागोजागी कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तरी येथील जमा होणारा कचरा महानगरपालिकेच्या कचरा डेपो वरती टाकू देण्याची परवानगी महानगरपालिकेने देण्यात यावी अशी विनंती महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

# रमेशआप्पा यांच्या नेतृत्वात रेणापूर शहर मॉडेल म्हणून उदयास येणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० नोव्हेंबर :** रेणापूर शहरात कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाली. नगरपंचायतीच्या निवडणुकीत भाजपाचा पुन्हा झेंडा फडकणार असून येत्या काळात मराठवाड्यात रेणापूर विकासाचे मॉडेल शहर म्हणून पुढे आल्याशिवाय राहणार नाही तेव्हा भाजपाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करून बहुमतासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान भाजपाचे जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरूमकर यांनी रेणापूर येथे बोलताना केले.

रेणापूर नगरपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे सर्व उमेदवार, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रेणापूर येथे बुधवारी झाली या बैठकीस जिल्हा निवडणूक प्रमुख आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंद-आण्णा केंद्रे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, चिटणीस दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडलाचे अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, प्रताप पाटील, सुरज शिंदे, उद्धव काळे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव आकनगिरे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे व शहराध्यक्ष अच्युत कातळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रमेशआप्पा कराड यांना विधानसभेत पाठवून मतदारांनी लातूर ग्रामीण मतदार संघाला नवी प्रतिष्ठा मिळवून दिली असल्याचे सांगून यावेळी बोलताना बस्वराज पाटील म्हणाले की, रमेशआप्पा यांनी लोकहितासाठी सातत्याने धाडस केले असून त्यांच्या नेतृत्वात रेणापूर शहरासह संपूर्ण मतदारसंघात विकासाचा डोंगर उभा केला आहे. केलेल्या कामाच्या आधारावर आपला विजय निश्चित असून रेणापूर भाजपाचा प्रतिष्ठेचा गड असल्याने सर्वांनी बहुमतासाठी प्रयत्न करून रेमशआप्पांची मान उंचवावी असे आवाहन केले.

यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील




निलंगेकर म्हणाले की, देशमुखांना जनतेने भरभरून दिले अनेक पदे त्यांच्याकडे असताना त्यांनी काय दिले? असा प्रश्न उपस्थित करून सर्व काही असताना विकासाच्या कोणत्याही योजना देऊ शकले नाहीत देशमुखांकडे दानतच नाही असे सांगून सर्व जाती-धर्माच्या घटकांना न्याय देण्याचे काम रमेशआप्पांनी केले. रेणापूरच्या विविध विकासासाठी अनेक योजना मंजूर केल्या. रेणापूरच्या विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेव्हा प्रत्येक कार्यकर्त्यांनी घराघरापर्यंत जाऊन मतदारांना विकासाचा विश्वास द्यावा. कार्यकर्त्याना पदावर बसविण्यासाठी आम्ही पूर्ण ताकतीने पाठीशी उभे आहोत असे बोलून दाखवले.

रेणापूर नगरपंचायतीचा पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान भाजपाला मतदारांनी दिला असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून रेणापूरच्या सर्वांगीण विकासासाठी ७० ते ८० कोटी रुपयाचा निधी आणून अनेक विकास कामे केली मात्र काँग्रेसच्या आमदारांनी पंधरा वर्षात ५० लाखाचाही निधी दिला नाही. जनता विकासाच्या पाठीशी आहे निश्चितपणे भाजपाला आशीर्वाद देणार यात शंका नाही तेव्हा विकास कामाच्या आधारावर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून प्रत्येकांनी कमळ चिन्ह प्रचंड बहुमताने विजयी व्हावे यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

### विजयासाठी कार्यकर्त्यांनी जिद्दीने काम करावे : जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील

रमेशआप्पा दिलदार नेते आहेत मागेल त्याला विकासाची कामे मंजूर करून दिली निधी मिळवून दिला. मतदार संघाचा कायापालट करीत आहेत केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे रेणापूर येथेही भाजपाची सत्ता आली तरच विकास होऊ शकतो हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असून नगरपंचायतीवर शंभर टक्के भाजपचा विजय झाला पाहिजे या ध्येयाने सर्वांनी काम करावे असे आ. अभिमन्यू पवार यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून रेणापूर शहरात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली तर दशरथ सरवदे यांनी भाजपाच्या सर्व उमेदवारांचा परिचय करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दत्ता सरवदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या बैठकीस भाजपाचे उमेदवार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न.प.निवडणूक भाजप ताकदीने जिंकणार : जिल्हाध्यक्ष पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २० नोव्हेंबर :** अहमदपूर नगर परिषदेची निवडणूक भाजप स्वबळावर संपूर्ण ताकतीने लढून जिंकणार असल्याचे मत माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी निर्धार व्यक्त करून भाजपाचे अहमदपूर शहराध्यक्ष अमित रेड्डी यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी जाहीर केले.

शहरातील सानवी मंगल कार्यालयात अहमदपूर नगर परिषद निवडणुक संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

पुढे बोलताना जिल्हा अध्यक्ष म्हणाले की या नगर परिषद निवडणुकीत भाजप ला विश्र्वासात घेऊन सन्मानपूर्वक जागा देतील ही अपेक्षा होती. आम्ही शेवट पर्यंत आशावादी होतो. महायुतीचा






धर्म पाळणार होतोत. अनेक त्या संदर्भात बैठका सुद्धा झाल्या परंतु त्यांनी अकेला चलोरे चा नारा अचानकपणे चालु केल्यामुळे भाजपाला स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घ्यावा लागला . शहराध्यक्षानी अचानक पक्षाला धोका दिल्यामुळे पाच सहा ठिकाणी आम्हाला उमेदवार देता आले नाही. याचा बदला आम्ही नक्कीच घेणार असुन केंद्रात भाजपा राज्यात भाजपाचे सरकार असून विकासाच्या मुद्दावरच आम्ही संपूर्ण ताकतीने निवडणूक लढून जिंकणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले आहे. यावेळी माजी पालकमंत्री आ. संभाजी भैय्या पाटील निलंगेकर, आ. रमेश अप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे,

भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, गणेश हाके पाटील, माजी नगराध्यक्ष ॲड.भारत चामे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, त्रंबक आबा गुट्टे,राजकुमार मजगे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ड. स्वप्निल व्हते, ग्रामीणचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी मनोगत व्यक्त करुन अहमदपूर नगर परिषदेवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे सांगितले.

यावेळी भाजपाचे गोविंद गिरी यांनी बैठकीचे प्रास्ताविक करून आभार मानले. यावेळी नगर परिषद प्रभारी बसवराज पाटील कौळखेडकर, विक्रम काका शिंदे, जिवणकुमार मद्देवाड, माजी नगराध्यक्ष संगमेश्वर ठेसे, बसवर-ाज धाराशिवे, वसंत डिगोळे, सज्जन लोणाळे, चंद्रप्रकाश हंगे, ओम पुणे, चंद्रशेखर डांगे, मणिषा नवने आदिसह भाजपाचे असंख्य पदाधिकारी, नगर सेवक पदाचे सर्व उमेदवार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विकासाच्या निवडणुकीला देशमुख विरुद्ध निलंगेकर असा रंग देऊ नका : आ. देशमुख

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २० नोव्हेंबर :** निलंग्यातील मतदाराच्या भवितव्याची व शहराच्या विकासाच्या निवडणुकीला देशमुख विरुद्ध निलंगेकर असा रंग देऊन आपली राजकीय पोळी भाजून घेवू नका. सुज्ञ मतदारांनी शहराच्या मूलभूत प्रश्र्न सोडविण्यासाठी अपयश आलेल्या सत्ताधारी भाजपच्या भुलथापांपासून सावध राहावे असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केले.

निलंगा येथे काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित नाईकवाडे यांच्या निवासस्थानी काँग्रेस पक्षाच्या निलंगा नगरपालिका निवडणुकीतील उमेदवाराच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी यावेळी लातूरचे काँग्रेस खासदार डॉ शिवाजी काळगे, जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख, अजित नाईकवाडे, डॉ. अरविंद भातांब्रे, विजयकुमार पाटील, लाला पटेल अजित माने, अंबादास जाधव, ॲड नारायण सोमवंशी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व सर्व उमेदवार उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षात कोणतीच गटबाजी नसून पक्षनेतृत्वाने निवड प्रक्रियेच्या माध्यमातून, सर्वांशी विचारविनिमय करून सर्व समाज घटकांना डोळ्यासमोर ठेवून उमेदवाराची निवड केली आहे. यामुळे पक्ष कार्यकर्त्यांनी व मतदारांनी विरोधकांच्या कोणत्याही अफवांना बळी पडू नये. पक्षात कुणाचीही नाराजी नाही. मागील पंधरा वर्षात पालिकेतील सत्ताध-ारी भाजपला रस्ते, वीज, पाणी, स्वच्छता, आदी मूलभूत प्रश्नही सोडवता आले नाहीत. शहराच्या विकासाबाबत नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. शहरातील विविध विकास कामातही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचा गंभीर आरोप यावेळी आमदार देशमुख यांनी केले.

शासकीय विकास निधीचे काही लोक मालक झाले असून सत्तेतून पैसा पैशातून सत्ता हे समीकरण मांडणाऱ्या विरोधकांना निलंग्यातील जनताच निवडणुकीत धडा शिकवतील. काँग्रेस पक्षाने शहरा-तील मूलभूत प्रश्र्नांची जाण असणाऱ्या व त्याची सोडवणूक करणाऱ्या लोकाभिमुख व कर्तृत्वान कार्यकर्त्याला उमेदवारी दिली आहे. पालिका निवडणुकीत पक्षाने दिलेला निर्णय मान्य करून सर्व पदाधिकारी कार्यकर्ते एक संघपणे विकासाचा अजेंडा घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहेत.

निलंग्यात खऱ्या अर्थाने लोकशाही रुजवायचे असेल तर भ्रष्टाचाराने बरबटलेल्या निलंगा नगर परिषदेत बदल हवा आहे. यासाठी पालिका निवडणुकीला निलंगेकर विरुद्ध देशमुख असा राजकीय रंग देऊन मतदारांची दिशाभूल करू नये असे आवाहन आमदार अमित देशमुख यांनी केले.

# प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेतून २ लाख, अपघाती विम्यातून ५० हजारांचा लाभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २० नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील मयत चंद्रशेखर महाजन यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना कार्यान्वित केली होती. त्यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतर या योजनेअंतर्गत त्यांच्या पत्नी सत्यवती महाजन यांच्या खात्यात २ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. याशिवाय, पीक कर्ज घेताना काढण्यात येणाऱ्या अपघाती विमा योजनेतूनही महाजन कुटुंबाला ५० हजार रुपये अतिरिक्त मिळाले आहेत. या दोन्ही विमा रकमेच्या माध्यमातून मृत व्यक्तीच्या कुटुंबाला आर्थिक दिलासा मिळून त्यांच्या संकट काळात मोठा हातभार मिळाला आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँक, वलांडी शाखेचे व्यवस्थापक भगवान संवडकर यांनी माहिती देताना सर्व खातेदारांना आवाहन केले की, फक्त २० रुपयांचे प्रीमियम असलेली प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना नक्की कार्यान्वित करा. अचानक अपघात, अपंगत्व किंवा मृत्यू यांसारख्या परिस्थितीत कुटुंब आर्थिक संकटात सापडू नये, यासाठी ही योजना अत्यंत महत्त्व-ाची असल्याचे त्यांनी सांगितले. संवडकर यांनी पुढे सांगितले की, बँकेमार्फत ४३६ रुपये मधे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजना देखील सुरू आहेत.

सर्व खातेदारांनी या योजनांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# डॉ.आंबेडकरांच्या'अस्थी कलशा'स तहसीलदार थोरातांकडून अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**पानगाव, २० नोव्हेंबर :** तालुक्यातील पानगाव येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब





आंबेडकर यांच्या अस्थी कलशास गुरुवार दि.२० रोजी भेट देवुन अभिवादन करून ६ डिसेंबर रोजी होणाऱ्या महापरिनिर्वाण दिना बाबत आढावा घेतला.

पानगाव ता. रेणापुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरात असलेल्या पं.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशास गुरुवार (दि.२०) रोजी सकाळी १२ वाजता रे-णापूर तहसीलदार प्रशांत थोरात, पानगाव महसुल मंडळ अधिकारी कमलाकर तिडके, ग्राम महसुल अधिकारी विकास बुबने, ग्राम महसुल अधिकारी सत्यपाल कांबळे, भिमा मामडगे यांनी भेट देऊन अस्थी कलशास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पानगावच्या वतीने ट्रस्टी माजी सैनिक पंडीत आचार्य यांनी थोरात यांचे पुष्पहार घा-लून स्वागत केले. यावेळी थोरात यांनी ६ डिसेंबर रोजी होणाऱ्या महापरिनिर्वाण दिन अस्थी अभिवादन कार्यक्रमा बाबत उपस्थितांशी चर्चा करून आढावा घेतला. यावेळी गोरोबा आचार्य, विष्णू आचार्य, अण्ण-ाराव आचार्य,हरिभाऊ आचार्य, पवन आचार्य, वसंत आचार्य, संघर्ष आचार्य, जयभिम आचार्य, कोंडाबाई तलवारे, मथुराबाई ओटले आदी उपस्थित होते.

# औसेकर विकास-विचारालाच साथ देणार : पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २० नोव्हेंबर :** औसा बदलण्यासाठी आम्ही व्यापक पातळीवर काम केले असून जाती धर्माच्या पलीकडे जावून विकासाचे राजकारण करणारी महायुती आहे. म्हणुन औसा शहरातील मतदार यावेळी काम, विकास आणि विचारालाच साथ देतील असा विश्र्वास माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी व्यक्त केला.

औसा येथे भाजप-शिवसेना-रिपाई युतीचा भव्य कार्यकर्ता मेळावा आणि नगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ झाला. आ.संभाजी पाटील निलंगेकर आणि आ. अभिमन्यू पवारआ. रमेश कराड, शिव-सेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डा, ज्योती बनसुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.





आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले, सरकारी योजना सर्व समाजघटकांसाठी समानपणे दिल्याचे सांगून विकास हेच मुख्य ध्येय असल्याचे स्पष्ट केले.लाडकी बहीण आणि आरोग्य योजना एका जाती-धर्मापुरत्या नाहीत. आम्ही टीम भाजप म्हणून एका दिशेने काम करतो आहोत.पण होणारी निवडणूक कार्यकर्त्यांची आहे आणि कार्यकर्त्यांना पदावर बसवण्यासाठी आम्ही पूर्ण ताकद लावत आहोत, असे आ, संभाजी पाटील म्हणाले.

आ. अभिमन्यू पवार यांनीआपल्या दमदार भाषणात विरोधकांवर निशाणा साधला. जिल्ह्यात भाजपचे वातावरण आहे. सबका साथ, सबका विकास या ब्रीदवाक्यावर आम्ही निवडणुकीला सामोरे जात आ-होत. औसा शहरासाठी तब्बल ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून विकास कामांची मालिका उभी केली आहे.शहरवासियांच्या आरोग्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा योजना, रस्ते विकास, नवीन बसस्थानक यांसारखी कामे जलद गतीने पूर्ण झाले आहेत.

### भाजप-शिवसेना-रिपाई युतीचा कार्यकर्ता मेळावा संपन्न

नगरपालिकेने विकास कामांसाठी आवश्यक प्रमाणपत्र दिले नसल्याचा आरोप करत पवार म्हणाले, हीच ती योग्य वेळ आहे. विकासाच्या आड येणाऱ्यांना घरी बसवा.असे आवाहन आ, अभिमन्यू पवार यांनी केले.

माजी नगराध्यक्ष किरण उटगे यांनी प्रास्ताविक केले. तर बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोन-वणे यांनी आभार मानले. यावेळी भाजपा, शिवसेना, रिपाईचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बाकी भरल्यास थकीत करावर मिळणार ५०% सवलत



**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर ताजबंद, २० नोव्हेंबर :** अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नमुना नंबर ८ च्या निवासी थकीत मालमत्ताधारकांनी सन २०२५- २६ ची चालू बाकी संपूर्ण भरल्यास थकीत करावर ५०% सूट देण्यात येणाऱ्या प्रचार व प्रसिद्धीच्या रथाचा शुभारंभ मंगळवारी सरपंच मच्छिंद्र वाघमारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी उपसरपंच सुरज भैय्या पाटील, शिक्षण सभापती किसन कापसे, शिवसेना नेते अनिल लामतुरे, माजी व्हाईस चेअरमन गोविंद कापसे, ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत घुगे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. उपसरपंच सुरज भैय्या पाटील यांनी सदरील योजना ही ३१ डिसेंबर अखेरपर्यंत असून जास्तीत जास्त थकीत मालमत्ताधारकाने सदरील योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. शुभारंभा प्रसंगी शेख पुतलाबी हाजीमलंग ह्या महिलेने आपला चालू वर्षाचा कर भरताच सरपंच, उपसरपंच यांच्या शुभहस्ते पावती देऊन कौतुक केले. याप्रसंगी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत लातूरचे वर्चस्व कायम

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २० नोव्हेंबर :** छत्रपती संभाजी नगर येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत लातूर च्या खेळाडूंनी आपले वर्चस्व कायम राखत स्पर्धेत सहा खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर निवड तर १८ सुवर्ण दोन रजत ११ कास्यपदकासह बाजी मारली.

दि. ११ ते १४ नोव्हेंबर २५ या दरम्यान क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा परिषद छत्रपती संभाजी नगर द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धा २०२५-२६ यात १९ वर्षाखालील मुलींमध्ये वैभवी माने ईप्पी या प्रकारात वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड, दिव्यांका कदम अदिती चवळे ईप्पी सांघिक सुवर्णपदक, फाईल मध्ये वैभवी माने, नंदश्री लहराळे, सिद्धी कदम यांना सांघिक प्रकारात कांस्यपदक, १९ वर्ष मुलं हर्षवर्धन सोमवंशी श्रेयश गरड ईप्पी सांघिक प्रकारात सुवर्णपदक तर गलाले करण फाईल सांघिक प्रकारात रजत



पदक प्राप्त. १७ वर्षाखालील मुलं साईप्रसाद जवळ इप्पी प्रकारात सांघिक व वैयक्तिक दोन्हीमध्ये सुवर्णपदक त्याचबरोबर १७ वर्षे मुलींमध्ये जानवी जाधव येथे सांघिक व वैयक्तिक सुवर्णपदक रोहिणी पाटील सांघिक सुवर्णपदक व वैयक्तिक रजत पदक, तर स्नेहा कश्यप आणि मयुरी वाघमारे यांना ईप्पी. या प्रकारात सांघिक मध्ये सुवर्णपदक, १४ वर्ष मुलांमध्ये वेदांत माने ईप्पीमध्ये सांघिक प्रकारात सुवर्णपदक, तर सेबर या प्रकारात वेदांत माने, आशीर्वाद भंडे, सुदर्शन जकवाड, घोगरे विराज यांना सांघिक मध्ये कास्यपदक त्याचबरोबर १४ वर्षे मुलींमध्ये माही कुलकर्णी स्मिता गुट्टे, भक्ती बिरादार यांना ईप्पी या प्रकारात सांघिक सुवर्णपदक तर माही कुलकर्णी ईप्पीमध्ये रजक पदक तर स्मिता गुट्टेला ईप्पी मध्ये वैयक्तिक मध्ये सुवर्णपदक त्याचबरोबर सेवर या प्रकारात अंकिता मोरे, संस्कृती शिंगडे, यशस्वी दहिफळे यांना कांस्य पदक प्राप्त केले.

राष्ट्रीय शालेय तलवारबाजी स्पर्धेमध्ये निवड झालेल्यांमध्ये वैभवी माने, साईप्रसाद जंगवाड, जान्हवी जाधव, रोहिणी पाटील, माही कुलकर्णी, स्मिता गुट्टे अशी विद्यार्थ्यांची नावे आहेत.

या सर्व खेळाडूंचे अभिनंदन व खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ता गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले, आकाश बनसोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत खेळाडूंचे जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर, शिवछत्रपती क्रीडा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त गणप-तराव माने, लातूर तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष अभिजीत मोरे, प्रशांत माने, संतोष कदम, वैभव कज्जेवाड, मेहफूजखान पठाण लातूरच्या सर्व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

# २६ नोव्हेंबरपासून मैलारा मल्लन्ना देवरा मेळ्याला सुरुवात

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २० नोव्हेंबर :** भालकी तालुक्यातील खानापुरा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मैलारा मल्लन्ना दे-वरा मेळा मोठ्या उत्साहात भरत असून, हा भव्य जत्रा महोत्सव २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर या काळात पार पडणार आहे. महिनाभर चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात विविध पालखी उत्सव, देवमूर्तींच्या भव्य मिरवणुका आणि पारंपरिक विधींनी भक्तिमय वाता-वरण रंगणार आहे.

२६ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजता मल्हारी-मालासकांते आणि भानू यांच्या विवाहसोहळ्याने जत्रेचा औपचारिक शुभारंभ होईल. दरवर्षीप्रमाणे या शुभारंभी कार्यक्रमाला भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे. महिनाभर विविध धार्मिक कार्यक्रम मेळ्याच्या कालावधीत खालीलप्रमाणे विशेष मिरवणुका व पालखी उत्सव आयोजित करण्यात आले आहेत: ३० नोव्हेंबर, रात्री ८.३०: पालखी उत्सव आणि नंदीवरील देवमूर्तीची मिरवणूक, ४ डिसेंबर, रात्री ८.३०: मोरावर असलेल्या देवमूर्तीची भव्य मिरवणूक, ७ डिसेंबर, रात्री ८.३०: पालखी उत्सव आणि घोड्यावर असलेल्या देवमूर्तीची मिरवणूक, १४ डिसेंबर: पालखी उत्सव आणि हत्तीवरील देवमूर्तीची मिरवणूक, २१ डिसेंबर: पालखी उत्सव आणि नंदीवरील देवमूर्तीची मिरवणूक या सर्व मिरवणुकांना स्थानिकांसह परिसरातील भाविक सहभागी होणार आहेत. या वर्षीच्या मैलारा मल्लन्ना जत्रा महोत्सवाचा समारोप २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. मल्लण्णा मंदिरा-चे प्रशासक मुकुल जैन तसेच कार्यकारी अधिकारी अनंतराव कुलकर्णी यांनी सर्व भाविकांना या भव्य जत्रा महोत्सवात सहभागी होऊन मैलारा मल्लन्ना देवाचे दर्शन घेण्याचे आवाहन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### रोसा शिवारात १४ एकर उसाला आग; चार लाखांचे नुकसान

**परंडा, दि.२० नोव्हेंबर -**

रोसा शिवारातील तब्बल १४ एकर उसाचे क्षेत्र अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याची गंभीर घटना घडली



असून यात अंदाजे ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती पुढे आली आहे. याबाबत माहिती अशी की, फिर्यादी अभिजीत पोपटराव पाटील (वय ४३ वर्षे), रा. रोसा यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वे क्र. ७४(१) मधील त्यांच्या शेतासह आजूबाजूच्या शेतकऱ्यांचा ऊस अज्ञात व्यक्तीने जाणीवपूर्वक जाळला. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले. अभिजीत पाटील यांच्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात भा.दं.सं. कलम ३२६ (एफ) अन्वये अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

### ट्रॅक्टरची पाठीमागून धडक; पादचारी जागीच ठार

**नळदुर्ग, दि.२० नोव्हेंबर -**

नरवडे तांडा रोडवर झालेल्या अपघातात पादचारी लक्ष्मण भुपाल शिंदे (वय ४७ वर्षे), रा. खुदावाडी




यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या प्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दि.१२ नोव्हेंबर रोजी सायं. ८ वाजता लक्ष्मण शिंदे हे अनंत गोविंदराव नरवडे यांच्या शेताजवळील वळणाच्या रस्त्यावरून पायी जात असताना ट्रॅक्टर क्रमांक चक २५ इऋ ४१६१ चा चालक विष्णु सुर्यकांत कदम यांनी ट्रॅक्टर हायगती व निष्काळजीपणे चालवून त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. फिर्यादी भरत नामदेव गुळवे (वय २८), रा. खुदावाडी यांच्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपी ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### नातेवाईकांना मुलीचा चेहरा पाहू न देण्यावरून मारहाण

**परंडा, दि.२० नोव्हेंबर -**

सिरसाव वाकडी येथे नातेवाईकांमध्ये वाद होऊन ११ जणांनी मिळून एका व्यक्तीस शिवीगाळ व मारहाण



केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शाम प्रल्हाद चव्हाण (वय ३६), रा. सवतगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर, ह.मु. अकलूज यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १०.३० वाजता, ते सिरसाव वाकडी येथे नातेवाईकांमध्ये मयत मुलीचा चेहरा पाहण्यासाठी आले होते. यावेळी केदार जाधव (रा. सिरसाव वाकडी) व इतर दहा जणांनी एकत्र येत गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस अडवले. आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच काठीने मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या मामाच्या मुलगा मेघराज पवार यालाही काठीने मारहाण करण्यात आली.

### धाराशिव शहरातून हिरो स्प्लेंडर मोटरसायकल चोरी

**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**

फिर्यादी अभिजीत पांडुरंग बोधनले (वय ३८, रा. बालाजी नगर, धाराशिव) यांच्या घरासमोर उभी असलेली



अंदाजे २०,००० किंमतीची हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी लांबविली आहे. ही घटना दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० वाजेपासून ते दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजेदरम्यान घडली. रात्री घरासमोर लावलेली मोटरसायकल सकाळी उठल्यानंतर गायब असल्याचे फिर्यादींच्या निदर्शनास आले. फिर्यादी अभिजीत बोधनले यांनी दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून अज्ञात आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### प्रतिबंधित गुटखा जप्त; सलीम शेख याच्यावर गुन्हा नोंद

**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका व्यक्तीस



आनंदनगर पोलिसांनी रंगेहाथ अटक केली. आरोपी सलीम युनुस शेख (वय ४०, रा. मिल्ली कॉलनी, धाराशिव) हा दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता कोहिनूर हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयितरित्या थांबलेला दिसला. पोलिसांनी तपास केला असता त्याच्याकडे विक्रीसाठी ठेवलेला प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या पदार्थांमध्ये सुहाना केसर गुटखा, प्रिमियम नछ-१, जाफरानी जर्दा, बाजीराव फ्लेवर्ड पान मसाला, रॉयल २२० तंबाखू, मस्तानी प्रिमियम च्युइंग टोबॅको, असा एकूण ६,२५५ किंमतीचा माल समाविष्ट आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात आरोपी सलीम शेख याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# परंड्यात भीषण अपघात : स्कूटीवरून पडून उसाच्या ट्रॉलीखाली महिला ठार

## रस्त्यावरील अर्धवट कामामुळे वाहतुकीत अडथळे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० नोव्हेंबर -**

सोनारी येथे देवदर्शन करून बार्शीला परत जात असताना स्कूटीवर मागे बसलेली महिला रस्त्यावर पडून उसाने भरलेल्या ट्रॉलीखाली सापडल्याने जागीच ठार झाल्याची भीषण घटना परंडा-सोनारी रोडवर घडली. अपघात इतका अचानक झाला की महिला कशी पडली हे स्कूटी चालक महिलेलाही समजले नाही.



स्कूटी चालक प्रियंका बांगर (रा. बार्शी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, बार्शी येथील सविता शंकर मुसळे व त्यांची भाडेकरू प्रियंका बांगर या दोघी सोनारी येथे देवदर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर परत जात असताना परंडा येथील सोनारी रोडवरील ए.पी. पंपाजवळ उस वाहतुकीच्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी समोरून वाहन आल्यानं स्कूटी बाजूला घेताना मागे बसलेल्या सविता मुसळे स्कूटीवरून कशा पडल्या हे लक्षातच आले नाही. पडताना त्या थेट ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली आल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

दरम्यान, परंडा ते काशिम बागदरम्यानचा रस्ता गेल्या वर्षभरापासून रखडलेला असून, ठिकठिकाणी अर्धवट कामामुळे वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. स्थानिकांकडून या रस्त्याच्या कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# भुममध्ये सोन्याच्या व्यवहाराच्या बहाण्याने चाकूचा धाक

## दोन मोबाईल व रोकड लुटल्याचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२० नोव्हेंबर -**




सोन्याची खरेदी करण्यासाठी भुम येथे आलेल्या उत्तरप्रदेशातील तिघांना चाकूचा धाक दाखवून दोन मोबाईल फोन व रोख रक्कम लुटल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राधेश्याम फलेंद्र सरोज (वय ४५ वर्षे) रा. चिरकोट, ता. लालगंज, जि. आगड (उत्तरप्रदेश), ह.मु. यादव नगर, भोईसर, पालघर हे आपल्या साथीदार मिश्र बहादुर व अखिलेख यांच्यासह १२ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १०.३० वाजता ते १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५.३० वाजता दरम्यान भुम येथील आरोपींच्या घरी सोन्याच्या खरेदीसाठी गेले होते.


सोन्याच्या व्यवहाराबाबत चर्चा सुरू असताना आरोपी बाळासाहेब पवार, शोभा गणेश काळे, काजल व चिवाबाई अतुल काळे (सर्व रा. भुम) यांनी पैसे आणले का? असा जाब विचारला. फिर्यादीने सध्या पैसे नसल्याचे सांगताच आरोपींनी चाकूचा धाक दाखवून फिर्यादी व त्याच्या मित्रांच्या खिशातील दोन मोबाईल फोन तसेच रोख १५०० जबरदस्तीने घेतल्याची तक्रार आहे.

या तक्रारीवरून भुम पोलीस ठाण्यात भा.दं.सं. कलम ३०९(६) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# २२ नोव्हेंबरला लोहारा शहर बंदचे आवाहन

## चिमुकलीवरील अत्याचारप्रकरणी कठोर शिक्षेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० नोव्हेंबर -**



मालेगाव येथील तीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेचा तीव्र निषेध करत आधुनिक लहुजी सेना आक्रमक झाली असून लोहारा शहर बंदची हाक २२ नोव्हेंबर रोजी देण्यात आली आहे.

मालेगाव येथील अवघी तीन वर्षांची निरागस चिमुरडी विकृत प्रवृत्तीच्या आरोपीने अत्यंत क्रूरपणे ठार केल्याच्या घटनेने संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात केवळ निषेध किंवा मेणबत्त्या पेटवून न्याय मिळणार नाही; ३० दिवसांच्या आत फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी आधुनिक लहुजी सेनेने केली आहे.या संदर्भात तहसील कार्यालय आणि पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले असून, आरोपीला फाशीची शिक्षा मिळाल्यासच या चिमुरडीला खरी श्रद्धांजली ठरेल, असे सेनेतर्फे सांगण्यात आले. कायद्यात तातडीने सुधारणा करुन अशा प्रकारच्या भयंकर गुन्ह्यांमध्ये आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या प्रमुख मागण्यांसाठी दि.२२ नोव्हेंबर रोजी लोहारा शहरात शांततेत बंद पाळावा, असे आवाहन आधुनिक लहुजी सेनेने केले आहे.

# शाळांना शंभर टक्के मोफत पाठ्यपुस्तके व पॅट प्रश्नपत्रिका द्याव्यात

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**

मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक-माध्यमिक शाळांमधील शंभर टक्के विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच पॅट परीक्षांच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून द्याव्यात, अशी ठाम मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केली आहे. या मागणीसंदर्भात राज्य एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांना निवेदन देण्यात आले. या संदर्भातील निवेदन धाराशिव डायटचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांच्या मार्फत बुधवारी (ता. १९) देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शासनाकडून पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके देण्यात येतात. मात्र, युडायसवरील विद्यार्थीसंख्येनुसार शंभर टक्के विषयांची पुस्तके शाळांना प्रत्यक्षात मिळत नाहीत, अशी तक्रार शिक्षक परिषदेने केली आहे.

त्याचप्रमाणे, एससीईआरटी पुणे तर्फे पॅट परीक्षांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांची संख्या मागवूनही सर्व वर्गांसाठी सर्व विषयांच्या शंभर टक्के पॅट प्रश्नपत्रिका शाळांना उपलब्ध होत नाहीत, अशी बाबही संघटनेने निदर्शनास आणली.



शंभर टक्के विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि पॅट प्रश्नपत्रिका उपलब्ध न केल्यास आगामी काळात पॅट परीक्षांवर बहिष्कार घालण्याबाबत विचार करू.
- उमाकांत कुलकर्णी, राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद

हा महत्त्वाचा प्रश्न निकाली काढून आगामी काळात कोणतीही कमतरता राहू नये, अशी मागणी शिक्षक परिषदेने केली आहे. निवेदन देताना शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, महादेव खामकर, प्रवीण माळवदे, आनंद वीर, रितेश जाधव, सतीश कुंभार, दिगंबर नाईकनवरे आणि सचिन हुलसुरकर उपस्थित होते.

शाळांमध्ये सर्वसामान्यांच्या मुलांचे शिक्षण होत असून, शासनाकडून पाठ्यपुस्तके वेळेवर न मिळाल्यास ती बाजारातही उपलब्ध नसतात. तसेच पॅट प्रश्नपत्रिका मागणीनुसार न मिळाल्यामुळे अनावश्यक आर्थिक भार शिक्षकांवर पडतो. चुकीच्या नियोजनामुळे शिक्षकांना दरवर्षी मानसिक त्रास सहन करावा लागतो, असे शिक्षक परिषदेने स्पष्ट केले आहे.

# अणदूरमध्ये खंडोबा यात्रेनिमित्त भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२० नोव्हेंबर -**

ग्रामदैवत मल्हार मार्तंड श्री खंडोबा यात्रेनिमित्त अणदूर येथे शनिवारी दुपारी दोन वाजता भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी जवाहर महाविद्यालय मैदानावर आखाडा सज्ज करण्यात आला आहे. अणदूर परिसरातील पैलवानांनी या कुस्ती स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयमल्हार तालीम संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री खंडोबा यात्रानिमित्त होणाऱ्या कुस्त्या या वर्षी अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मर्यादित स्वरूपात घेण्यात येणार आहेत. शुक्रवारी अणदूरमध्ये श्री खंडोबाची भव्य यात्रा पार पडणार असून, त्यानंतर शनिवारी दुपारी दोन वाजता नामवंत आणि दमदार मल्लांच्या कुस्त्यांनी रंगत आणखी वाढणार आहे.

या स्पर्धांसाठी मैदानाची तयारी पूर्ण करण्यात आली असून, आयोजनासाठी जयमल्हार तालीम संघाचे सदस्य तसेच ग्रामस्थ-कल्याणी मुळे, धनराज मुळे, प्रवीण घोडके, बाबुराव मुळे, मनोज मुळे, सुंदर जवळगे, मार्तंड मोकाशी, नागनाथ परीट, शामराव गायकवाड, लक्ष्मण घुगे, गुरुनाथ मिटकरे, अनंत घुगे, खंडू म. मुळे, बाळू घोडके, म्हाळाप्पा गळाकाटे आदी मान्यवर परिश्रम घेत आहेत. या पारंपरिक कुस्ती स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी आणि सहभाग नोंदवण्यासाठी अणदूर तसेच परिसरातील पैलवान व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



## तुळजापूरमध्ये गर्दीचा फायदा घेत १.४० लाखांचे सोन्याचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० नोव्हेंबर -**

जुने बसस्थानक परिसरात बसमधून उतरत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे १,४०,००० रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरून नेल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी फुलावती शंकर राठोड (वय ५५ वर्षे) रा. श्रीनाथ मंगल कार्यालयाजवळ, नळदुर्ग रोड, तुळजापूर या १८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता जुने बसस्थानक येथे बसमधून उतरत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण लंपास केले.

या प्रकरणी फुलावती राठोड यांनी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# येरमाळा येथे जिल्हा स्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२० नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि येडेश्वरी स्पोर्ट्स क्लब, येरमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ रोजी येरमाळा येथे जिल्हा स्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तालुक्यासह जिल्हाभरातील कबड्डी संघांनी या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. ज्ञानोद्योग विद्यालयाच्या मैदानावर सकाळपासूनच खेळाडूंची मोठी गर्दी पाहायला मिळाली. निवड चाचणीमध्ये कुमार गटातील १५ आणि कुमारी गटातील ६ संघांनी सहभाग घेतला. पंचांच्या देखरेखीखाली सामने तांत्रिकदृष्ट्या उच्च पातळीवर पार पडले.

जिल्हा पातळीवर आपली कामगिरी सादर करण्याची संधी मिळाल्याने युवा खेळाडूंमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण होते. राज्यस्तरीय स्पर्धांसाठी उत्कृष्ट खेळाडूंची निवड करण्यात येणार असल्याची माहिती आयोजन समिती सदस्य संतोष जमदाडे यांनी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सहकार्याध्यक्ष महादेव साठे आणि धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण मोहिते यांच्या हस्ते झाले. यावेळी येडेश्वरी स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे प्रतिनिधी तसेच स्थानिक क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्तम नियोजनामुळे संपूर्ण स्पर्धा सुरळीत पार पडली. स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार असून हे खेळाडू २५ ते २९ नोव्हेंबरदरम्यान पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. नितीन हुंबे, संतोष पुरी, शाम जाधवर आणि लक्ष्मण मोहिते यांनी निवड समितीची जबाबदारी पार पाडली. तर पंच म्हणून मोहन पाटील, रोहन जगताप, दत्ता जावळे, रमेश माळी, औदुंबर जगताप, संतोष चव्हाण आणि सय्यद यांनी काम पाहिले.

या स्पर्धेमुळे येरमाळा कबड्डी केंद्र म्हणून अधिक सक्षम आणि बळकट झाले असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. आयोजक संतोष जमदाडे, प्रितेश बारकुल, गणेश पवार, आकाश बारकुल, अनिकेत पवार, सुजीत गुप्ता, रविकिरण आगरसे, सोहेल पठाण तसेच येडेश्वरी स्पोर्ट्स क्लबच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

# धाराशिवमध्ये २ डिसेंबरला न.प. निवडणूक; शांतता व सुव्यवस्था राखण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**

नगर परिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत आहे. निवडणूक काळात जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी किरत्रृती किरण पूजार यांनी दिल्या.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय निवडणूक संनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी पूजार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कक्षात झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, सहआयुक्त त्रिंबक ढेगळे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास, उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एन.व्ही. भंडे, पोलीस उपअधीक्षक (गृह) डी.बी. पारेकर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पूजार यांनी म्हटले की, निवडणूक काळात पोलीस यंत्रणेने अलर्ट मोडवर कार्य करावे. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विशेष दक्षता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



निवडणूक काळात रोख रकमेचे व्यवहार, पैशांची देवाणघेवाण यावर पोलीस व संबंधित यंत्रणांनी बारीक लक्ष ठेवावे.

मतदारांना प्रलोभन देण्यासाठी दारू वा पैशाचा वापर होऊ नये यासाठी जप्तीची कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतदान व्हावे, यासाठी व्यापक स्तरावर मतदार जनजागृती मोहीम राबविण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

निवडणूक ड्युटीवरील कर्मचाऱ्यांची नावे ज्या नगरपालिकेच्या मतदार यादीत आहेत, त्यांच्यासाठी पोस्टल मतदानाची सुविधा उपलब्ध करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी पूजार यांनी दिली.

बैठकीत उपस्थित सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची माहिती दिली.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शितल लोकरे यांचा प्रभाग ८ मधून नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा
**तुळजापूर, दि.२० नोव्हेंबर -**
नगर परिषद निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक आठ अ मधून अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला उमेदवार म्हणून शितल भोलेनाथ लोकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

उच्चशिक्षित असलेल्या शितल लोकरे या एम.ए.बी.एड. असून सध्या त्या शहरातील तुळजामाता इंग्रजी स्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.



सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या शितल लोकरे सामाजिक कार्यामध्ये त्या आवर्जून घेत असतात.

अशा उच्चशिक्षित उमेदवारांची शहराच्या विकासासाठी गरज असून प्रभाग क्रमांक आठ मधून शितल लोकरे यांना मतदारांचा चांगला पाठिंबा मिळत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन' साजरा

**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**
१७ नोव्हेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा केला जातो. विद्यार्थ्यांचे हक्क, अधिकार, सुरक्षा आणि स्वातंत्र्य यासाठी त्यांनी दिलेल्या ऐतिहासिक संघर्षाची आठवण ठेवण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. १९३९ मध्ये प्राग (चेकोस्लोवाकिया) येथे नाझी अत्याचारांविरोधात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर नाझी सैन्याने नऊ विद्यार्थी नेत्यांची हत्या केली होती, तर १,२०० हून अधिक विद्यार्थ्यांना छळछावण्यांमध्ये पाठवण्यात आले आणि सर्व चेक विद्यापीठे बंद करण्यात आली. या दुःखद घटनांची नोंद म्हणून १९४१ मध्ये लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संघटनेने या दिवसाला अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून मान्यता दिली. या पार्श्वभूमीवर पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्कूलचे उपप्राचार्य निलेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

### तेरखेडा जि.प. गटातून ठाकरे गटाकडून श्रीराम घुले यांच्या नावाची चर्चा

**वाशी, दि.२० नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सर्वात महत्त्वाचा मानला जाणारा तेरखेडा जिल्हा परिषद गट पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या गटातून वेगवेगळ्या पक्षांकडून संभाव्य उमेदवारांची नावे जोरदार चर्चेत आहेत. सोशल मीडियावरही जोरदार युद्ध सुरू आहे. या गटातून स्वातंत्र्यपूर्वी उद्धव ठाकरे गटाची जागा निवडून आली होती. नंतर सत्तांतरानंतर विद्यमान सदस्य शिंदे गटात गेले. त्यामुळे तेरखेडा गटात उद्धव ठाकरे गटाची पारंपरिक ताकद असल्याचे ठाकरे गटाकडून सातत्याने सांगितले जात आहे. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून तेरखेडा गावचे श्रीराम घुले यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. घुले हे यावेळी ठाकरे गटाची मशाल हाती घेऊन निवडणूक रिंगणात उतरू शकतात, अशी कुजबुज राजकीय वर्तुळात सुरू आहे.





### श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**तुळजापूर, दि.२० नोव्हेंबर -**
रक्तपेढ्यांमधून रक्तपुरवठ्याचा तुटवडा जाणवत असल्यामुळे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये १९ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तुळजापूरचे मुख्याधिकारी अर्जिक्य रणदिवे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर, उपप्राचार्य आर.जी. मुदकन्ना, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विवेक गंगणे, एनएसएस विभागाचे प्राध्यापक सुतार नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे विश्वास मोठे, रक्तपेढीचे मुख्य समन्वयक सत्यम गायकवाड आदी उपस्थित होते. आयोजित शिबिरामध्ये महाविद्यालयातील ७० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले आजच्या या रक्तदानाचे वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयातील १५ मुलींनी आज रक्तदान केले. शिबिर यशस्वी व्हावे यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी तसेच सर्व शिक्षक व विभाग प्रमुखांनी प्रयत्न केले.

### प्रशांत अपराध यांची रोटरी असिस्टंट गव्हर्नरपदी निवड

**तुळजापूर, दि.२० नोव्हेंबर -**
तुळजापूर येथील रोटरीचे माजी अध्यक्ष प्रशांत अपराध यांची रोटरीच्या असिस्टंट गव्हर्नरपदी निवड करण्यात आली आहे. रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेश पटेल यांनी अपराध यांना निवडीचे पत्र दिले आहे. या निवडीबद्दल अपराध यांच्यावर तुळजापूर तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. तुळजापूर रोटरी क्लबचे अध्यक्ष असताना त्यांनी विविध प्रकारे सामाजिक उपक्रम राबवले होते. त्याबद्दल त्यांना जालना येथे देखील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. प्रशांत अपराध यांचा रोटरी क्लबमधील अनुभव नेतृत्व व रोटरीबद्दलची कमिटमेंट या पार्श्वभूमीवर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आल्याचे गौरव उद्गार डिस्ट्रिक गव्हर्नर जयेश पाटील यांनी निवडीचे पत्र देताना काढले. त्यांच्या या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# नळदुर्ग न.पा. निवडणूक : बहुरंगी स्पर्धा तापली

### पाटील-जगदाळे यांच्यात प्रतिष्ठेची लढत

तभा वृत्तसेवा / विलास येडगे
**नळदुर्ग, दि.२० नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक सध्या जोरात असून, महायुती आणि महाविकास आघाडी दोन्हीही समीकरणे न जमल्याने ही निवडणूक पूर्णपणे 'बहुरंगी' झाली आहे. त्यामुळे निवडणूक थेट तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि काँग्रेस नेते अशोक जगदाळे यांच्या प्रतिष्ठेची बनली आहे. अंतिम निकालाचा फैसला ३ डिसेंबरच्या मतमोजणीत होणार आहे.

महायुती किंवा महाविकास आघाडी न झाल्याने ही निवडणूक भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), एम आयएम आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात बहुकोनी लढत झाली आहे. निवडणुकीला अवघे २० दिवस राहिले असताना शहरात प्रचाराचा धुरळा उडाला आहे. सर्व पक्षांनी प्रभागांत पदयात्रा, गाठीभेटी आणि कॉर्नर सभा यांना मोठा वेग दिला असून शहरातील वातावरण तापले आहे.

काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अशोक जगदाळे हे प्रचारात आघाडीवर आहेत. काँग्रेस-शिवसेना (ठाकरे) युतीची धुरा त्यांच्या खांद्यावर असून शहरात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. भाजपने ही निवडणूक 'जिंकायचीच' या भूमिकेतून साम, दाम आणि दंड यासह पूर्ण ताकदीने रणांगणात झेप घेतली आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे हे स्वच्छ प्रतिमा असलेले आणि जनमानसात चांगली ओळख असणारे नाव आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वामुळे भाजपचे पारडे जड दिसत असले तरी जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना तिकीट न मिळाल्याने निर्माण झालेली नाराजी भाजपला फटका देऊ शकते. पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, श्रमिक पोतदार, अजय देशपांडे यांनी उमेदवारी मागितली होती; मात्र त्यापैकी कोणालाही उमेदवारी मिळाली नाही.



अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी (अजित पवार गट) निवडणूक प्रतिष्ठेची करण्याच्या तयारीत असून नगराध्यक्ष पदासाठी माजी नगरसेवक संजय बताले यांची निवड करण्यात आली आहे. युवकांना संधी देत नवखे आणि उत्साही उमेदवारांसह काही अनुभवी माजी नगरसेवकांनाही बताले यांनी संघात घेतले आहे. शफीभाई शेख व शहराध्यक्ष अजित जुनेदी यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा प्रचार जोर पकडत असून शहरातून त्यांना चांगला प्रतिसाद मिळतोय. हीच स्थिती कायम राहिली तर हा गट या निवडणुकीत चमत्कार घडवू शकतो, अशी चर्चा शहरात आहे. पहिल्यांदाच शक्तीने उतरलेल्या एमआयएम पक्षाला मुस्लिम बहुल भागात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार माजी नगराध्यक्ष शहेबाज काझी हे अनुभवी, अभ्यासू आणि नगरपालिका कारभारात पारंगत असल्याने त्यांच्याकडून चांगल्या लढतीची अपेक्षा आहे. वंचित बहुजन आघाडीदेखील या निवडणुकीत आपले वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न करत असून काही प्रभागांत त्यांचा प्रचार वेगात आहे.

ही निवडणूक जरी बहुरंगी असली तरी मूळ स्पर्धा थेट आमदार राणा जगजितसिंह पाटील आणि अशोक जगदाळे यांच्या प्रतिष्ठेची बनली आहे. त्यातच संजय बताले व शहेबाज काझी हेही चमत्कार घडवू शकणारे उमेदवार मानले जात आहेत. सध्या सर्वच पक्षांनी जोरदार प्रचाराला वेग दिला असून पुढील दिवसांत ही निवडणूक आणखी रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

## धाराशिवचे माजी नगराध्यक्ष दत्ता बंडगर यांची भाजपात घरवापसी



तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**
डॉ. पद्मसिंह पाटील यांचे जुने कार्यकर्ते, धाराशिवचे माजी नगराध्यक्ष, उबाठा गटाचे नेते दत्ता बंडगर, उबाठाचे जिल्हा समन्वयक दिनेश बंडगर आणि त्यांच्या शेकडो सहकारी कार्यकर्त्यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करत घरवापसी केली.

यावेळी प्रवेश करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने लक्ष्मी दत्ता बंडगर, गुड्डू हैदर शेख, शिवसेना शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार कुलकर्णी, पाताळ देवकते, कल्याणी सम्राट माने, शकील तांबोळी, जावेद तांबोळी, विजय आवाड, अक्षय जाधव, अजय विंचुरे, आकाश तोडकरी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे. प्रतिष्ठान भवन, भाजपा कार्यालय येथे संपन्न झालेल्या पक्ष प्रवेश समारंभात सर्वांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी दत्ताभाऊ कुलकर्णी,नितीन काळे, नेताजी पाटील, सुनील काकडे, संपतराव डोके, अभय इंगळे, नितीन भोसले, प्रा. चंद्रजीत जाधव, नितीन शेरखाने, इंद्रजित देवकते, विलास लोंढे, बापू पवार यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्र माघारीसाठी २१ नोव्हेंबरपर्यंत मुदत

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२० नोव्हेंबर -**
नगर परिषद धाराशिव सार्वत्रिक निवडणूक २०२५साठी दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून वैध ठरलेल्या उमेदवारांना उद्या दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत माघार घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

माघार घेण्यास इच्छुक उमेदवारांनी नगर परिषद धाराशिव येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे स्वतः किंवा सूचकामार्फत उपस्थित राहून जोडपत्र-५ भरून माघार प्रक्रिया पूर्ण करावी. निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषद तथा उपविभागीय अधिकारी धाराशिव यांनी कळविल्यानुसार, वैध उमेदवारांना उद्या दुपारी ३ वाजेपर्यंतच माघार अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

### तुळजाई नगरीत भाजपाची रेकॉर्डब्रेक रॅली!

# तुळजापूर विकासासाठी जनतेने भाजपाला साथ द्यावी : आ. राणादादा



तभा वृत्तसेवा
**तुळजापूर, दि.२० नोव्हेंबर -**
तुळजापूरकरांचे उत्पन्न वाढवणे ही आपली जबाबदारी आहे. आगामी काळात शहराचा कायापालट करण्याचा निर्धार व्यक्त करत, शहराच्या विकासासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक असून तुळजापूरच्या सर्वांगीण विकासाठी भारतीय जनता पक्षाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतानी विजयी करण्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नागरिकांना केले.

तुळजाई नगरीत नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगान भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरवासियांचा आशीर्वाद घेण्याकरिता काढण्यात आलेल्या रॅलीला रेकॉर्डब्रेक रॅलीस नागरिकांचा उत्स्फूर्त आणि प्रचंड प्रतिसाद मिळाला. रॅलीला संबोधित करताना आमदार राणादादा म्हणाले की, तुळजापूर शहरातील प्रभाग क्र.३ मधून डॉ. अनुजा अजित परमेश्वर यांची जिल्ह्यातील पहिली बिनविरोध नगरसेविका म्हणून निवड झाली असून आपल्या सर्वांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. हा विजय म्हणजे तुळजापूरकरांनी आपल्यावर दाखवलेला विश्वास आणि आई तुळजाभवानीचा आशीर्वाद आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी २०१४ साली रेल्वेची घोषणा केली. धाराशिव-तुळजापूर रेल्वे मार्गाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून आपल्या महायुती सरकारने या प्रकल्पासाठी तब्बल ३२९५ कोटींचा निधी दिला आहे.

तुळजाभवानी मंदिर परिसराच्या विकासासाठी सरकारकडून १८०० कोटींचा ऐतिहासिक निधी देण्यात आला आहे. सर्व पुजारी, व्यापारी आणि नागरिकांना विश्वासात घेऊन शहरातील विकासकामे होत आहेत. विरोधकांनी त्यांच्या सत्ताकाळात तुळजापूरसाठी नेमके काय केले याचे स्पष्ट उत्तर द्यावे. वैयक्तिक टीका आणि खोटारडेपणाला स्थान दिले जाणार नाही.

### बदनामी नको विकास हवा!

तुळजापूर विकासाच्या मार्गावर आहे आणि आमचा विश्वास भाजपवर आहे. आजची रॅली म्हणजे केवळ सभा नव्हती, तो तुळजापूरच्या जनतेचा निकाल होता. नकारात्मक राजकारण चालणार नाही. तुळजापूरची प्रतिमा मलिन करण्याचा 'आरोपांचा बाजार' मांडला आहे. त्यांना आजच्या सभेतील गर्दीने स्पष्ट संदेश दिला आहे.

**- विनोद पिटू गंगणे,**
(नगराध्यक्ष पदाचे उमेदवार)



यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद (पिटू) गंगणे, नगरसेवक पदाच्या बिनविरोध विजयी उमेदवार डॉ. अनुजा परमेश्वर आणि ईतर उमेदवार यांच्यासह दत्ताभाऊ कुलकर्णी, सुनील चव्हाण, नितीन काळे, सचिन रोचकरी, बाळासाहेब शिंदे, आनंद कंदले, सज्जनराव साळुंके, शांताराम पेंदे, संदीप गंगणे, विशाल रोचकरी यांच्यासह तुळजापूर शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारोंच्या संख्येने नागरिक, महिला भगिनी उपस्थित होते.

## येरमाळा जि.प. गटात शिवसेना उबाठा पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या वाढली

### येरमाळा गट महिला आरक्षणात; भाग्यश्री जमदाडे दावेदार म्हणून आघाडीवर...



तभा वृत्तसेवा / सुधीर लोमटे
**येरमाळा, दि.२० नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी आरक्षण सोडत जाहीर झाले असून येरमाळा जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित ठरला आहे. यामध्ये येरमाळा गण सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी तर चोराखळी गण हा अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव जाहीर झाला आहे.

आरक्षण जाहीर होताच येरमाळा गटात विविध पक्षांतील महिला इच्छुकांच्या नावांची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाकडूनही अनेक महिला दावेदारांची नावे पुढे येत आहेत, त्यामध्ये भाग्यश्री नेहरू जम दाडे या सर्वाधिक संभाव्य उमेदवार म्हणून आघाडीवर असल्याचे चित्र दिसत आहे.



उच्चशिक्षित, सामाजिक भान जपणाऱ्या आणि कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाग्यश्री जमदाडे यांना माहेरचा राजकीय वारसा लाभला आहे. त्या महिला संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षा असून त्यांनी महिलांच्या न्याय आणि हक्कासाठी सातत्याने लढा दिला आहे. गरीब व वंचितांना शासकीय योजनांची माहिती देणे, त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे, दुर्बल घटकांपर्यंत शासनाचे उपक्रम पोहोचवणे अशा सामाजिक कार्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर चांगली लोकप्रियता मिळाली आहे. येरमाळा गटात महिला आरक्षण सुटल्याने पक्षांतर्गत हालचालींना वेग आला असून, कोणत्या पक्षातून कोण उमेदवार उतरते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाग्यश्री जमदाडे यांनी गटातील विविध गावांना भेट देऊन महिलांशी चर्चा सुरू केली आहे. त्यामुळे त्यांची पक्षांतर्गत दावेदारी अधिक मजबूत झाल्याचे बोलले जात आहे.

माझ्या सामाजिक कार्याच्या जोरावर सर्वसामान्य जनतेतून माझ्या उमेदवारीची मागणी होत आहे. समाजकार्य हीच माझी सेवा आहे. माझे दिर संतोष जमदाडे यांनी कबड्डी, कुस्ती या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात जे कार्य केले, तेच कार्य पुढे नेण्याचा मीही प्रयत्न करीन. गोर-गरीब नागरिकांची सेवा करण्याची संधी मिळेल अशी मनापासून अपेक्षा आहे.

**- भाग्यश्री जमदाडे**

येत्या काही दिवसांत उमेदवार निवड प्रक्रियेला वेग येणार आहे. अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी घेणार असले तरी येरमाळा गटातील जनतेच्या मनातील उमेदवार भाग्यश्री जमदाडे आहेत, अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. यामुळे येरमाळा गटातील ही निवडणूक अधिक रंगतदार होणार हे निश्चित.

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगात परंड्याची मोठी बाजी

## श्रद्धा टोंपे पहिल्या प्रयत्नात राज्यात ५ वी; सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार



तभा वृत्तसेवा
**परंडा, दि.२० नोव्हेंबर -**
सार्वजनिक बांधकाम उपविभाग परंडा येथील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता सौदागर टोंपे यांची कन्या व भाजपा माजी जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे यांची पुतणी श्रद्धा सौदागर टोंपे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत थेट पहिल्याच प्रयत्नात राज्यातील सर्वसाधारण गुणवत्ता यादीत ५वा क्रमांक मिळवला असून मुलींमध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.

वयाच्या अवघ्या २२ वर्षांतच श्रद्धा हिने ही कठीण परीक्षा उत्तीर्ण करत उपविभागीय जलसंधारण अधिकारी (वर्ग-१) या उच्च पदासाठी निवड मिळवली. परंडा तालुक्यातील ही अत्यंत अभिमानाची बाब असून श्रद्धाच्या यशाची सर्वत्र चर्चा आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भाजपा नेते मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी आपल्या निवासस्थानी श्रद्धा हिचा सत्कार करून तिच्या उज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे विकास कुलकर्णी, न.प. माजी गटनेते सुबोधसिंह ठाकूर, सुखदेव टोंपे, कृष्णा चैतन्य, सौदागर टोंपे, भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.